# ॥ विष्णुमूर्ते नमस्तुभ्यम् ॥

(सगुणाचेनि आधारे निर्गुण पाविजे)



गो. बं. देगलूरकर

भारतात विष्णू या देवतेचे असंख्य उपासक आहेत. ही देवता सत्त्वगुणी आणि जगताचे पालनपोषण करणारी, समृद्धी देणारी म्हणून मानली गेली. विष्णुपुराण, विशेषतः भागवत पुराण यांनी याची महती गायिली आणि भक्तांना उपासने मार्गे भौतिक जीवन सुखी करण्याचा मंत्र सांगितला. याच्या आणि याच्या लीलांवर आधारीत शेकडो मूर्ती घडविल्या गेल्या. मात्र याचा यथास्थित परिचय सर्वांना असतोच असे नाही. किंबहुना त्यांच्या प्रयोजनासंबंधी तर जवळजवळ अज्ञानच असते. येथे 'विष्णू' ची संकल्पना, स्थान, तत्त्वज्ञान ज्यातून समूर्त झाले, रूपासी आले, त्या मूर्तींचा परिचय करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

जीवनासाठी कलेचा उपयोग कसा करावा याचे मूर्तिशास्त्र हे उत्तम उदाहरण ठरावे. या आधारे उत्तमोत्तम प्रतिमातून देवादिक प्रगटले गेले एवढेच नव्हे तर भारतीय तत्त्वज्ञानही मूर्तींच्या रूपाने आकाराला आले, दृश्य झाले असे दिसते. अरूपाचे रूप आणि अजन्म्याचे जन्मास येणे मूर्तिशास्त्राने शक्य करून दाखविले असेच म्हणावे लागते.

वेदापासून ते पुराणापर्यंत आलेली माहिती अमूर्त अशा विष्णूची होय. या माहितीची सांगड विष्णूच्या विविध प्रकारच्या मूर्तींशी घालण्याचा प्रयत्न प्रस्तुत ग्रंथात केलेला आहे. हे करीत असता श्रीविठ्ठल, वैकुंठ इत्यादी देवतांच्या मूर्ती संदर्भात वेगळा विचारही येथे केलेला आहे. त्यांचे संबंधी विस्तृत विवेचनही केले आहे. थोडक्यात म्हणजे विष्णूची इत्थंभूत आणि तीही सचित्र माहिती देण्याचा प्रयत्न येथे केलेला आहे, किंबहुना विश्वरूप विष्णूचे लघुदर्शन येथे घडविलेले आहे.

पृष्ठे - १२८, चित्रे - ३२

# ।। विष्णुमूर्ते नमस्तुभ्यम् ।।

(सगुणाचेनि आधारे निर्गुण पाविजे)

गो. बं. देगलूरकर
पीएच.डी, डी.लिट्

२००७

श्रीद्वारकाधीश चॅरिटीज
कर्नाळा, जि. रायगड

● प्रकाशक
श्रीद्वारकाधीश चॅरिटीज,
'साई हरिक्षेत्र' आपटा फाटा,
कर्नाळा, जि. रायगड

● ©श्रीद्वारकाधीश चॅरिटीज

● लेखक
गो. बं. देगलूरकर
९०१, पुरूषोत्तम अपार्टमेंटस्,
भांडारकर रोड, पुणे - ४११ ००४
दूरध्वनी - ०२०-२५६७६६९३

● मुखपृष्ठ व मलपृष्ठ
ग्रॉफी ॲडव्हर्टायझिंग, पुणे - ४

● मुद्रक
श्री. दिपक मराठे,
आयडियल प्रिंटर्स,
शिवाजीनगर, पुणे - ५

● प्रथमावृत्ती :
जानेवारी २००७

● मूल्य : रुपये १५० =००

## हरि भक्ती परायण
## बंधुद्वय
## वै. ती. धुंडामहाराज
## आणि
## वै. ती. बंडामहाराज

- वहातो ह्यांची मी गाथा माथ्यावरती

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रकाशकाचे निवेदन | पाच |
| लेखकाचे मनोगत | १ |
| उपोद्घात | ६ |
| हरि:ॐ | १७ |
| विष्णुमूर्ती | ३४ |
| विष्णूच्या चतुर्विंशति (चोवीस) मूर्ती | ३९ |
| - विभव किंवा अवतार मूर्ती | ४४ |
| - संकीर्ण मूर्ती | ७० |
| - संयुक्त मूर्ती | ८२ |
| विष्णूचे वाहन गरुड | ८९ |
| वैष्णव शक्तिदेवता | ९२ |
| विष्णुमूर्तींच्या समवेतच्या कांही प्रतिमा, काही प्रतीके | १०१ |
| मूर्तिशास्त्रीय परिभाषा | १०७ |
| परिशिष्टे | |
| १ पुरूषसूक्त | १११ |
| २ श्रीसूक्त | ११५ |
| ३ विष्णूच्या एकोणचाळीस अवतारांची नामावली | ११७ |
| वेचक संदर्भ ग्रंथ सूची | ११८ |


ऋणनिर्देश : या ग्रंथातील चित्रांचा सर्वाधिकार ज्यांच्याकडे आहे त्या सर्व ग्रंथ लेखकांचा लेखक आभारी आहे.

# प्रकाशकाचे निवेदन

डॉ. गोरक्षनाथ बं. देगलूरकर हे भारतीय पुरातत्त्वशास्त्र तसेच मंदिर स्थापत्य आणि शिल्पशास्त्रातले एक तज्ज्ञ आणि ऋषितुल्य व्यक्तिमत्व मानले जाते. ह.भ.प. धुंडामहाराज देगलूरकर यांच्या सारख्या भागवत संप्रदायातील अधिकारी व्यक्तीच्या घराण्याचा आध्यात्मिक वारसा आणि संस्कार त्यांना लाभले आहेत. नुकताच त्यांनी सकर्तृत्वावर प्राप्त केलेला डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूटच्या कुलपती पदाचा अधिकार हा खरे तर "कुलपति" या पदाचाच सन्मान आहे. एवढी अमाप विद्वत्ता असूनही त्यांच्या अंगी असलेल्या असीम विनम्रतेपुढे नतमस्तकच व्हावेसे वाटते. अशा या महनीय व्यक्तिशी माझा ऋणानुबंध जडला तो रामनवमीचे दिवशी आणि तोही आमच्या द्वारकाधीश मंदिरात. भगवान द्वारकाधीशाची रामनवमीचे दिवशी महापूजा करण्यासाठी सपत्निक येण्याचे आमंत्रण मी त्यांना दिले आणि माझ्या विनंतीला मान देवून ते आले. द्वारकाधीश चॅरिटीजतर्फे सुरू केलेले समाज प्रबोधनाचे काम व गीतेवर आत्तापर्यंत प्रसिद्ध केलेल्या दोन पुस्तकांचा चर्चेच्या ओघात उल्लेख झाला. आपण आमच्यासाठीही शिल्प आणि मूर्तीशास्त्रावर एखादा ग्रंथ लिहावा अशी विनंती मी त्यांना केली आणि त्यांनीही ती तत्काळ मान्य केली. कामाचा प्रचंड व्याप असूनही त्यांनी द्वारकाधीशाची वाङ्मयसेवा म्हणून "विष्णुमूर्ते नमस्तुभ्यम्" हा ग्रंथ लिहिला. आज मराठी शारदेच्या दरबारात तो सादर करताना आनंद होत आहे आणि या ग्रंथाच्या रूपाने सर्वसामान्यांना मूर्ती आणि शिल्पशास्त्रावरील ज्ञानाचा खजिनाच उपलब्ध करून दिल्याचे समाधानही लाभते आहे.

या ग्रंथात अत्यंत मर्यादित पृष्ठाच्या चौकटीत देगलूरकर यांनी मूर्तिशास्त्र आणि मूर्तिपूजा यांचा इतिहास, विष्णूपासना आणि वैष्णव संप्रदाय यांचा उगम, श्रीविष्णूची असंख्य रूपे, त्याची आयुधे तसेच श्रीविष्णुमूर्तीचे विविध प्रकार यांचा परिचय करून दिला आहे. भगवान विष्णूचे दशावतार आपणा सर्वांना परिचित आहेतच. पण या व्यतिरिक्त भगवंतांनी अन्य एकोणतीस अवतार घेतले ही महत्वपूर्ण माहितीही या ग्रंथात ग्रथीत झाली आहे. 'भगवान श्रीकृष्णांचे सर्वात प्राचीन रेखांकन म्हणजे इंडो-ग्रीक राजा ॲगॅथोक्लियस याच्या नाण्यावर सापडलेल्या श्रीकृष्ण आणि बलराम यांच्या प्रतिमा'' हा उल्लेखही या ग्रंथात सापडतो. भारतीय शिल्प आणि मूर्तिशास्त्राचा

देगलूरकर यांचा अभ्यास आणि अधिकार सर्वश्रुतच आहे. पण त्याचा उपयोग करतानाच विविध पुरातत्त्वस्थळे, शिल्पे आणि लेणी यांचा समक्ष भेटी देऊन तेथील शिल्पांचे, मूर्तींचे अवलोकन व संशोधन करून त्यांच्या स्वानुभवातून, संशोधनातून शिल्प व मूर्तिशास्त्रातील ज्ञानाचा अमूल्य ठेवा या ग्रंथाच्या रूपाने समाजाला दिला आहे आणि एवढे करूनही 'फोडिले भांडार धन्याचा जो माल। मी तो हमाल भार वाही ॥'' अशी विनम्र भूमिका त्यांनी घेतली आहे. त्यांच्या या ग्रंथात जागोजागी आढळणाऱ्या संतपुरूषांच्या उक्ती व दाखले वाचून त्यांचे संतवाङ्मयाचे वाचन किती सखोल आहे याचीच प्रचिती येते.

संस्कार भारती सारख्या संस्थेचे एक अग्रणी म्हणून शिल्प व मूर्तिशास्त्राचा अभ्यास करणारा एक मोठा शिष्य संप्रदाय त्यांनी निर्माण केला आहे. हा ग्रंथ भारतीयत्व व भारतीय संस्कृती जपण्यास इच्छूक असलेल्या प्रत्येक नागरिकास आणि विशेषत: तरूणवर्गास मार्गदर्शक ठरेल यात शंकाच नाही. या ग्रंथमालिकेतील उर्वरीत दोन ग्रंथ लवकरच आपल्या समोर आणण्याचा मानस आहे. देगलूरकरांचे लिखाण पूर्ण होताच ते विनाविलंब प्रसिद्ध करण्यास आम्ही वचनबद्ध आहोत.

देगलूरकरांनी आपल्या मनोगतात नमूद केल्या प्रमाणे हा ग्रंथ व्हावा हे कार्य घडावे ही खरोखरच भगवंताचीच इच्छा होती व त्यानेच अनंत हस्ते ती पुरी करून घेतली. या ग्रंथाच्या निर्मितीसाठी ज्यांचा ज्यांचा हातभार लाभला त्या सर्वांचा मी व्यक्तिश: ऋणी आहे. शालेय जीवनातील माझी सहाध्यायी सौ. कल्पना रायरीकर हिचा या ठिकाणी विशेष ऋणनिर्देश करावासा वाटतो.

॥श्रीकृष्णार्पणमस्तु॥

**अजित कारखानीस**
अध्यक्ष व कार्यकारी विश्वस्त
श्रीद्वारकाधीश चॅरिटीज



# मनोगत

दोन-तीन वर्षापूर्वी योगायोगाने श्री. अजित कारखानीस यांची एका समारंभात ओळख झाली. पुढे भेटीत त्यांनी आपटा फाट्यावरील 'श्रीद्वारकाधीश चॅरिटीज'ने उभारलेल्या श्रीकृष्णमंदिराची माहिती दिली तसेच तेथे चाललेल्या समाज प्रबोधनाच्या उपक्रमांची माहितीही दिली. चॅरिटीजने प्रकाशित केलेल्या श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील ग्रंथांचा उल्लेख 'बहुधा' ओघानेच केला गेला असावा. नंतर ठरले असे की देव-देवतांच्या विविध प्रकारच्या मूर्तींच्यावर कांही लिखाण जिज्ञासूंचेसाठी उपलब्ध करून दिले पाहिजे. त्या संबंधात काही प्रमाणात तरी अज्ञान वा अल्पज्ञान असते. चर्चेतून निष्पन्न झाले ते असे की श्रीविष्णूच्या मूर्तीवरचा ग्रंथ आधी प्रकाशित केला जावा आणि त्यानंतर शिवादी देवतावरील ग्रंथ प्रकाशित करावेत. भारतात असंख्य मंदिरे आहेत आणि मंदिरात जावून देवतामूर्तींचे दर्शन घेणारेही भरपूर आहेत. पण मंदिरांचे प्रकारासंबंधी, अंगोपागांचे संबंधी, त्यावरील प्रतिमा नि प्रतिकासंबंधी असावी इतकी माहिती असणारे भक्त मात्र अत्यल्प आहेत. तेव्हां मंदिरासंबंधीही एखादे पुस्तक प्रकाशित करण्याचे श्रीद्वारकाधीश चॅरिटीजने ठरविले आहे.

श्री. रा. अजित कारखानीस यांनी हे ग्रंथ लिहिण्याचे काम मजवर सोपवले आहे हे मी भाग्याचेच समजतो. श्रीद्वारकाधीशाची वाङ्मयरूपाने सेवा करण्याची ही संधी मिळते आहे. या त्रिग्रंथ योजनेतील हा पहिला ग्रंथ होय. तो विष्णू या देवतेसंबंधीचा आहे. यात विष्णूसंबंधी ऋग्वेदापासूनची माहिती नि त्यावर आधारलेल्या मूर्ती/प्रतिमा यांचा समावेश आहे. वेगळ्या शद्बात म्हणजे विष्णूच्या निर्गुण आणि सगुण रूपांची माहिती देण्याचा हा एक प्रयत्न आहे. श्रीविठ्ठल म्हणजे योगस्थानक विष्णू हे कळले नाही तर 'चोविसाहूनी वेगळा। हा पंचविसावा' याचा यथार्थ कळणार नाही आणि वैकुंठाची मूर्ती असते हे माहित झाल्याशिवाय 'ज्ञानदेव म्हणे हरि हा वैकुंठ' म्हणजे काय हे ध्यानात येणार नाही.

भारतात विष्णू या देवतेचे असंख्य उपासक आहेत. ही देवता सत्त्वगुणी आणि जगताचे पालनपोषण करणारी, समृद्धी देणारी म्हणून मानली गेली. विष्णुपुराण, व विशेषत: भागवतपुराण यांनी याची महती गायिली आणि भक्तांना उपासने मार्गे भौतिक जीवन सुखी करण्याचा मंत्र सांगितला. याच्या आणि याच्या लीलांवर आधारीत

शेकडो मूर्ती घडविल्या गेल्या. मात्र त्यांचा यथास्थित परिचय सर्वांना असतोच असे नाही. किंबहुना त्यांच्या प्रयोजनासंबंधी तर जवळ जवळ अज्ञानच असते. येथे 'विष्णू' ची संकल्पना, स्थान, तत्त्वज्ञान ज्यातून समूर्त झाले, रूपासी आले, त्या मूर्तींचा परिचय करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

प्राचीन काळी मूर्तिशास्त्राचा अनेक परिने उपयोग करून घेतला गेला. या शास्त्राच्या अनेक आयामांचा देशकालपरिस्थितीनुसार विचारही करण्यात आला. सामाजिक सामंजस्य, प्रबोधन, विविध गटांचे सम्मीलन, एकोपा इत्यादीसाठीचे या शास्त्राचे प्रयोजन यांचा दूरदर्शीपणाने समाज धुरिणांनी, पंडितादींनी, तत्त्ववेत्त्यांनी अत्यंत परिणामकारकपणे उपयोग करून घेतला. याच काळात मूर्तींच्या प्रकारात वाढ झाली, रामायण-महाभारतादी ग्रंथ, अनेक पुराणे आणि मूर्तिशास्त्रावरील ग्रंथही याच काळातले. या शास्त्राने सर्वांगाने बाळसे धरले ते याच काळात. त्या काळी जीवनासाठी कलांचा उपयोग करण्याचा प्रघात असल्यामुळे उत्तमोत्तम प्रतिमातून देवादिक प्रगटले एवढेच नव्हे तर भारतीय तत्त्वज्ञानही मूर्तींच्या रूपाने आकाराला आले, दृश्य झाले. थोडक्यात म्हणजे अरूपाचे रूप आणि अजन्म्याचे जन्मास येणे या शास्त्राने या प्राचीन काळातच शक्य करून दाखवले.

मध्ययुगात मात्र परिस्थिती बदलत गेली. परकीय आक्रमणामुळे आणि सत्तेमुळे पांडित्य क्षीण झाले; पराक्रम आश्रित झाला, समाज तेजोहीन झाला, जीवनरसाला ओहोटी लागली. सहाजिकच मूर्तिशास्त्राकडे कमालीचे दुर्लक्ष झाले. ते स्थितगती झाले. अशी कळाहीन स्थिती साधारणपणे अठराव्या शतकापर्यंत होती. एकेकाळच्या समृद्ध भारतीय संस्कृतीच्या कांही अंगांना पक्षाघात झाला. तेहतीस कोटी देव म्हणजे संख्येने तेहतीस कोटी असा अनेकांना भ्रम झाला. कोटी म्हणजे प्रकार या अर्थाने तेहतीस प्रकारचे देव असे ज्ञान लोपले होते. पुराणातील रूपकाधारे सांगितल्या गेलेल्या कथांचा शद्बार्थाने विचार केल्यामुळे त्यांचे विपरीत अर्थ समाजमनात घर करून बसले. तशात संस्कृत पंडितांच्या साहाय्याने शद्बश: भाषांतर करणाऱ्या पाश्चात्य विद्वानांनी पुराणकथांचे जे अर्थ लावले, त्यांचा संदर्भहीन विचार केला, तोंच तथाकथित पुरोगामी भारतीयांनी गृहीत धरला. ब्रिटिशांनी बहुमुखी, बहुहाती मूर्तीना अमानवी म्हटले, पाषाणातील निर्जीव प्रतिमांची हिंदूधर्मीय मंडळी उपासना करतात असे हेटाळणीने म्हटले; तथाकथित बुद्धिवाद्यांनी त्यांची री ओढली. मूर्तिशास्त्राचा सांगोपांग अभ्यास, त्याचे प्रयोजन,



त्यामुळे झालेले प्रबोधन याचा कांहीच विचार या मंडळींनी का केला नसेल हे एक कोडेच आहे. ''जी मंडळी मूर्तिपूजा मानीत नाहीत किंवा तिचा विरोध करणे हे धार्मिक कृत्य समजतात त्यांच्यापैकी कोणीही ऐतिहासिक तसेच मानसिक दृष्टीने मूर्तींचा प्रत्यक्ष उपयोग कसा होतो याचा विचार केलेला दिसत नाही. सर्व जातीजमातींच्या लोकांनी सर्व काळ भक्तीसाठी मूर्तिपूजेचा आसरा का घेतला असेल या संबंधीचा तर्कही या मंडळींनी केला नसेल. त्यांनी मूर्तिपूजेच्या संकल्पनेचाही विचार केला नसेल. वस्तुत: ज्यांनी मूर्तींचा उपयोग केला तो कोणत्या प्राप्तव्यासाठी, कोणत्या कारणासाठी या संबंधीचा विचारही मोलाचा ठरू शकतो. प्रत्यक्ष श्रीकृष्णाने या दृष्टीने सांगितलेल्या सत्याचा बोध त्यामुळे होऊ शकतो 'माणसं चोखाळत असलेला कोणताही मार्ग मजकडेच येतो' 'The path men take from everyside is mine'. डॉ. कुमारस्वामींनी मांडलेले हे विचार विचारप्रवृत्त करणारे खचितच आहेत. (१९९४.१५)

उपनिषदे आणि भक्तिपर व तत्त्वज्ञानपर स्तोत्रे व सूत्रे सांगतात की अंतिम सत्य वा परमात्मा (ब्रह्म) कोणत्याही प्रकारात अगम्य आहे, त्याचे वर्णन कोणत्याही विधानाने करता येत नाही. म्हणूनच उपनिषदांतून आलेले 'मी आहे म्हणजे मी आहे' (I am that I am) असे एक विधान फार बोलके आहे. (कुमारस्वामी, १९९४.१५८) खरे तर ''परमात्मस्वरूपाचा निर्णय करण्यास केवल मानवी बुद्धीस स्वातंत्र्य नाही; 'मनाची नखी न लगे । बुद्धीची दृष्टी न रिघे । इंद्रिया कीर जोगें । काय होईल ।।ज्ञानेश्वरी, १२.४१' ज्या ब्रह्माच्या ठिकाणी मनाचा प्रवेश होत नाही, आणि बुद्धीची दृष्टी जेथे प्रवेश करीत नाही, ते इंद्रियाना खरोखर गोचर होईल काय? ब्रह्म असे आहे. वेदच केवळ त्याच्या स्वरूप निर्णयास प्रमाण आहेत. 'शास्त्र योनित्वात् । ब्रह्मसूत्र १.१.३' या सूत्राच्या द्वारे व्यासांनी हेच सांगितले. 'ज्या परमात्म्याच्या यथार्थ स्वरूपज्ञानाविषयी ऋग्वेदादी शास्त्र हेच प्रमाण आहे त्या शास्त्र प्रमाणावरूनच जगजन्मादिकारण ब्रह्म अवगत होते' (धुंडामहाराज, १९९८.५) यथोक्तं ऋग्वेदादि शास्त्रं योनि: कारणं प्रमाणं अस्य ब्रह्मणो यथावत्स्वरूपाधिगमे । शास्त्रादेव प्रमाणाज्जगतो जन्मादिकारणं ब्रह्माधिगम्यते इत्यभिप्राय: । ब्रह्मसूत्र शांकरभाष्य १/१/३. एक शैव स्तोत्रकार मणिक्क वाचगर म्हणतात 'तो शब्दाधारेच सांगितला जाऊ शकतो, मनाने उमजत नाही, डोळ्याने दिसत नाही (कुमारस्वामी १९९४.१५८).

मूर्तिशास्त्रावर आलेले मळभ हळू हळू कमी व्हायला लागले ते विसाव्या शतकाच्या पहिल्या चतुष्कापासून. पाश्चात्य पंडितांचीही दृष्टी निवळली. त्यांनी चिकित्सकपणे मूर्तींचा अभ्यास सुरू केला. आपल्याकडील विद्वानांनीही प्राचीन ग्रंथाचे आलोडन आरंभिले. टी. ए. गोपीनाथराव हे यांतले अग्रणी, मग आले जितेंद्रनाथ बॅनर्जी, आता या संदर्भात नाव घेता येईल अशी बरीच विद्वान मंडळी पुढे आली. मूर्तिशास्त्राच्या अभ्यासाला बहर आला, त्याकडे पहाण्याची दृष्टी निकोप झाली. उत्तमोत्तम ग्रंथ आणि संशोधनपर चिकित्सक लेख लिहिले गेले. श्री. विनोबा भावे यांच्या सारखे सर्व धर्मांचा मूलगामी अभ्यास असलेले विद्वानही म्हणू लागले की सर्वच धर्माचे अनुयायी कोणत्या ना कोणत्या प्रकारे मूर्तिपूजा करीत असतात (गीता प्रवचने)

मूर्तिविज्ञानकार श्री. ग .ह. खरे आणि भारतीय मूर्तिशास्त्र या ग्रंथाचे लेखक डॉ. नी. पु. जोशी यांचे तर अनेक प्रकारे साहाय्य झाले आहे. या उभय विद्वानांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाचा लाभ लेखकाला झाला आहे. मूर्तिविज्ञानाच्या संबंधातील कांही जटिल प्रश्न त्यांच्यामुळे सोडवता आले. त्यांचे ऋण शद्बातीत आहे. शिवाय त्यांचे ग्रंथ फार उपयोगी ठरले. त्यांना वाट पुसतच हा लेखनप्रपंच केला आहे हे नम्रपणे येथे नोंदवू इच्छितो.

प्रस्तुत पुस्तकासाठी काही आधारभूत ग्रंथ पाहिलेत ते या उभय विद्वानांनी दिलेल्या संदर्भांच्या आधारेच. या सर्व ग्रंथांचा अभ्यास करून त्यांनी जे शास्त्रशुद्ध लिखाण केले त्याचाच मुख्यत: येथे आधार घेतला आहे. संत एकनाथांच्या शद्बात सांगायचे तर 'फोडिले भांडार धन्याचा जो माल । मी तो हमाल भार वाही ' अशी प्रस्तुत लेखकाची भावना आहे. कारण येथे आलेली श्रीविष्णू संबंधातली बरींचशी माहिती ही थोडीसंशोधनपर आहे,थोडी संकलनात्मक आहे.

श्रीविष्णू या देवतेची माहिती वेदांपासून ते पुराणापर्यंत तसेच महाभारतादी ग्रंथातून आलेली आहे, ती अमूर्त अशा विष्णूची माहिती होय आणि तीवर आधारलेल्या मूर्तींना मी त्याचे सगुणात वा मूर्तीत झालेले रूपांतर मानतो. वाङ्मयातून येणाऱ्या विष्णू वर्णनांशी मूर्तींची या ग्रंथात सांगड घातलेली आहे. ह्या लिखाणाने विष्णूला दृष्य करण्याचा एक प्रयत्न येथे केला आहे. हे करीत असता मूर्तिशास्त्रासंबंधातील काही बाबीवर थोडा नवा प्रकाश टाकलेला आहे. वैकुंठ व विठ्ठल या देवतामूर्तींसंदर्भातील विस्तृत विवेचन याची यथोचित साक्ष देईल. काही दुर्मिळ वा अल्पज्ञात अशा मूर्तींचीही



ओळख येथे करून दिलेली आहे. थोडक्यात म्हणजे विष्णूची इत्थंभूत आणि तीही सचित्र माहिती देण्याचा प्रयास येथे केलेला आहे. गीतेतून विश्वरूपाचे वर्णन आपण वाचतो येथे आपण ते समूर्त झाल्याचे पहातो. किंबहुना विष्णूच्या विश्वरूपाचे लघुदर्शन घडविणारे हे पुस्तक होय असे म्हणणे वावगे ठरू नये.

**माझे चुलते वै.ती.धुंडामहाराज यांच्या ज्ञानेश्वरी प्रवचनांचा आणि लिखाणांचा तसेंच त्यांनी आणि वडील वै.ती.बंडामहाराज यांनी केलेल्या संस्कारांचा परिणाम म्हणजे हा ग्रंथ होय. तो मी या उभय बंधूंच्या चरणी विनम्रभावे अर्पण करतो आहे. खरे तर गंगोदकानेच गंगेला अर्घ्य देण्याचा हा प्रकार होय.**

आमचे स्नेही आणि श्रीद्वारकाधीश चॅरिटीजचे अध्यक्ष व कार्यकारी विश्वस्त श्री. रा. अजित कारखानीस यांच्या इच्छेप्रमाणे श्रीविष्णूच्या अनेक प्रकारच्या मूर्तींची शास्त्रशुद्ध माहिती तसेंच श्रीविष्णूच्या विभवांची (अवतारांची), चतुर्विंशति मूर्तींची, त्याच प्रमाणे विष्णूच्या इतर प्रकारच्या विशेषमूर्तींची ओळख येथे करून दिली आहे. मात्र त्यांच्या इतका उरक माझ्यात नसल्यामुळे त्यांना दोन-तीन वर्षे ताटकळत राहावे लागले.

या ग्रंथ लेखनाचे कामी मला अनेकांचे सहाय्य झाले. माझी विद्यार्थिनी सौ.कल्पना रायरीकर यांनी सतत तगादा लावला म्हणून हे लिखाण आता तरी पूर्ण होऊ शकले. त्यांनी वेळोवेळी केलेल्या सूचना फार मोलाच्या ठरल्या. या ग्रंथातील रेखाचित्रे आणि छायाचित्रे देखण्या रूपात आणण्याचे तसेंच मुद्रणप्रत तयार करण्याचे काम श्री. गिरीश मांडके यांनी तत्परतेने केले. सुरेख मुखपृष्ठ व मलपृष्ठ आमचे परममित्र श्री. रवी देव यांनी करून दिले आहे. हस्तलिखित वाचून उपयुक्त सुधारणा सुचविल्या आहेत श्रीमती पुष्पा लिमये यांनी. या ग्रंथातील रेखाचित्रे 'भारतीय मूर्तिशास्त्र' यातून घेण्यास अनुमती दिली म्हणून लेखक डॉ. नी. पु. जोशी यांचा आभारी आहे. आमचे स्नेही श्री. अजित कारखानीस यांनी मनावर घेतले म्हणून श्रीद्वारकाधीश चॅरिटीजकडून हा ग्रंथ प्रकाशित होतो आहे. तेव्हा याचे सर्व श्रेय श्री.अजित यांचेकडेच आहे. श्री.मराठे यांनी अत्यल्प वेळात ग्रंथ छपाई करून दिली. त्यांची कार्यक्षमता विस्मयचकित करणारी आहे. जगन्नियंत्याच्या संबंधातले हे कार्य असल्यामुळे या ग्रंथ-रथाला वरील सर्वांनी हातभार लावला, अशी माझी श्रद्धा आहे. हे कार्य व्हावे ही श्रींची इच्छा होती हेंच खरे.

****

# उपोद्‌घात

मूर्तिपूजा हे भारतीय संस्कृतीचे एक ठळक आणि व्यवच्छेदक लक्षण होय. इतर कांही संस्कृतीतही मूर्तीपूजेला स्थान होते व सध्याही असल्याचे आढळते. पण ते ठळक लक्षण मानले जात नाही एवढेच ! मूर्तिपूजेसंबंधीची संकल्पना, तिचा प्रारंभ आणि प्रयोजन यांचा साकल्याने विचार केल्यास त्या संबंधीचे अपसमज नाहीसे होऊन तिचे महत्त्व ध्यानी येते.

भारतीय मूर्तिशास्त्र आणि भारतीय संस्कृती यांचा अन्योन्याश्रयी संबंध असल्यामुळे मूर्तिशास्त्राचा विचार करताना देश, काल आणि परिस्थिती यांचा विचार करावा लागतो. उत्तर भारतात अगदी कोणार्कच्या सूर्यमंदिरातील सूर्यप्रतिमा सुद्धा इराणी वेश परिधान केलेल्या, एवढेच नव्हे तर पायात पावसाळी जोडे घातलेल्या असतात, या संबंधीची चर्चा महाभारतातही आढळते. हे असे कां याचा खुलासा मूर्तिशास्त्राधारे होतो. तसेच दक्षिणेतच नटराजमूर्तींचे प्राचुर्य, चंडेशानुग्रह, उर्ध्वलिंगयुक्त अर्धनारीश्वर प्रतिमा प्रामुख्याने आढळतात, ते का हे ही कळते.

मूर्तिशास्त्रावर प्रादेशिकतेचा प्रभाव जसा जाणवतो तसाच तो कालमानाचाही आढळतो. वैदिक काळात इंद्र, वरूण, अग्नि या देवता प्रमुख होत्या तर पौराणिक काळात त्यांचे स्थान विष्णू, शिव इत्यादी देवतांकडे आले, एवढेच नव्हे तर इंद्रादी देवतांना दिक्पालांचे स्थान पत्करावे लागल्याचे दिसते. तद्वतच पूजनीय सृष्टीकर्त्या ब्रह्मदेवाला त्या स्थानावरून ढळावे लागले. तसेच गुप्तकाळाच्या म्हणजे इसवीच्या सहाव्या शतकापर्यंत विष्णूच्या हाती कमळ नसे, पण शंखचक्रगदादी समवेत ते जेव्हा त्याचे हाती विलसू लागले तेव्हा या चार आयुधांच्या स्थान परिवर्तनाचे आधाराने त्याच्या केशव-नारायणादी चोवीस मूर्तींची निर्मिती केली गेली. एवढेच नव्हे तर रामायणातील केवळ पांच अवतारांची संख्या १०,१४,१७ अशी वाढत वाढत ती अहिर्बुध्न्यसंहिता काळात ३९ पर्यंत गेली. हा सर्व काळाचा महिमा होय.

देशातील त्या त्या प्रदेशांतील तसेच वेगळाल्या कालखंडातील परिस्थितीचाही परिणाम मूर्तिशास्त्रावर झाल्याचा आढळतो. यात वेगळाल्या संप्रदायांच्या अनुयायांचा अभिनिवेशही दृष्टोत्पत्तीस येतो. वैष्णवांना श्रीविष्णू देवाधिदेव वाटतो तर शैवांना शिव. अशामुळे मूर्तिशास्त्रावर तीन प्रकाराने प्रभाव पडल्याचे दिसते. (१) आपलेच अराध्य दैवत श्रेष्ठ कसे हे दाखविणाऱ्या मिथ्यकांची निर्मिती व त्यानुसार मूर्ती घडविणे, (२)इतर



पंथाच्या देव-देवतांना आपल्याच पंथात सामावून घेणे आणि (३) त्यांना गौण स्थान देणे. या सर्वांचा सविस्तर विचार पुढे योग्य स्थानी केलेलाच आहे.

मूर्तिशास्त्राच्या अभ्यासाने असेही लक्षात येते की पारस्परिक पंथीय स्पर्धेमुळे म्हणा की 'न्यून ते पुरते' करून घेण्यास्तव म्हणा वेगळाल्या पंथांच्या मूर्तीवर परिणाम झालेला आहे. व्याघ्रांबरधारी, भस्मविलेपित शिवाच्या मूर्ती विष्णूच्या मूर्तिप्रमाणे सालंकृत झाल्या तर कल्याणसुंदर, अर्धनारीश्वर स्वरूपात विष्णूच्या, व गणेशाच्या प्रतिमा निर्माण झाल्या. असे होण्यास त्या त्या देवतांचे संबंधातील पुराणे व तत्सम वाङ्मय कारणीभूत असू शकते. उदाहरणार्थ विष्णुधर्मोत्तर पुराणातल्या वर्णनानुसार इन्द्र आणि वरुणाच्या प्रतिमा पत्नीसमवेत दिसू लागल्या.

मूर्तिशास्त्राचे एक वैशिष्ट्य आणि माहात्म्य लक्षात घेण्यासारखे आणि स्पृहणीय असे आहे. ते म्हणजे सकृत्‌दर्शनी विरोध असणाऱ्या पंथात सामंजस्य संस्थापित करण्याचा प्रयास हे होय. त्या काळच्या समाजधुरिणांच्या सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीचे दर्शन त्यातून घडते. या विचारसरणीतूनच समजुतदारपणा व परमतसहिष्णुता प्रत्ययास येते. हरिहर, ब्रह्मेशानजनार्दनार्क, सूर्यनारायण, पंचायतन एवढेच नव्हे तर शिव-बुद्ध या सारख्या मूर्ती हेच दर्शवितात. कांही पंथीयांनी एकमेकाचा पाणउतारा करण्याचा प्रयत्न केल्याचेही कांही मूर्तीच्यावरून लक्षात येते. पण समाजाने ते फार मनावर घेतल्याचे आढळत नाही.

भारतीय आध्यात्मिक विचारसरणीवर तंत्रमार्गा (वाममार्ग)चा प्रभाव पडल्याचेही आढळते. शाक्त, कौल, कापालिक हे ते मार्ग होत. उच्छिष्ट गणेश, छिन्नमस्ता (लज्जागौरी), अशा मूर्तींचा उल्लेख या संबंधात करता येईल. अशा मूर्तींची खरी ओळख व्हायची तर तंत्रमार्गासंबंधीची योग्य माहिती असायला हवी नाहीतर अशा मूर्तीकडे पाहून अपसमज होण्याची शक्यताच अधिक असते.

मूर्तिशास्त्राचा विचार करताना आणखी एका मुद्याचा विचार करावा लागतो. भारतीय परंपरेचा इतर देशातील विशेषत: आग्नेय आशियायी देशांतील परंपरेवर झालेला परिणाम तसेच बाहेरील देवतांचा आपल्याकडील दैवतशास्त्रावर पडलेला प्रभाव विचारात घेण्यासारखा आहे. कुषाणकाळात म्हणजे इसवीच्या प्रारंभीच्या दोन-तीन शतकात वायव्येकडून आलेले ऑरडोक्शो व फॅरो गांधारकलेत हारिती व कुबेर झाले. तर हेलिओस या नावाने सूर्याने भारतात प्रवेश केला, एवढेच नव्हे तर सूर्यवाचक 'हेली' हा शब्दही

संस्कृत कोशात समाविष्ट झाला. याच काळात येथील शिव, विष्णू इत्यादी देवतांनाच नव्हे तर बुद्ध व मैत्रेय यांना मिशा दाखवल्या गेल्या.खट्वांग, कार्नुकोपिया (निधीशृंग) या वस्तूही हातात दिल्या गेल्या, तर सूर्याच्या नि क्वचित कार्तिकेयाच्या पायात बूट आले, अव्यंग (इराणी भाषेतील यावियांग) कटिसूत्र आले.

मूर्तिशास्त्र अर्थातच धर्माशी निगडीत असते. मात्र मूर्तींचा, त्यांच्या उद्भव-प्रक्रियेचा डोळसपणे विचार केला तर त्यांचेमुळे समाज-परिवर्तन, सामाज प्रबोधन आणि सामाजिक अभिसरण कसे होत गेले या संबंधीचा एक सुंदर आलेख तयार करता येतो. उदाहरणादाखल आदिवासी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शबर, भिल्ल, किरात इत्यादीं समाजाचे परिवर्तन होऊन त्यांच्या देवतासह ते शिष्ट समजल्या जाणाऱ्या समाजात समाविष्ट झाले. तर देव आणि दैत्य यांच्या संघर्षावर आधारलेल्या कथाद्वारे प्रबोधन घडवून आणले गेल्याचे स्पष्ट संकेत अशा मिथ्यकावरून निर्माण केलेल्या प्रतिमांचे आधारे दाखविता येतात. तसेंच महाविलयन प्रक्रिया म्हणून मूर्तिशास्त्रात ओळखली जाणारी पद्धत अभिसरणाचे सुंदर उदाहरण ठरते. लिंगपूजकांचे शिवोपासकांशी झालेले सम्मीलन, अवैदिक असलेल्या वृक्ष, नाग इत्यादी उपासना प्रतिकांना शिष्ट समाजाकडून मिळालेली मान्यता, बुद्ध व ऋषभ यांची विष्णूच्या अवतारात झालेली गणना ही सारी सामाजिक अभिसरणाचीच उदाहरणे होत.

**मूर्तिपूजेची प्राचीनता :**

मूर्तिपूजेविषयीच्या प्रत्येक अंगाचा ऊहापोह प्रस्तुत विष्णूवरील ग्रंथात अभिप्रेत नसल्यामुळे आपण त्यांचा केवळ उल्लेख करणार आहोत. उद्देश हा, की उपासकाला या शास्त्राची तोंड ओळख असावी.

सुमोर पांच हजार वर्षापूर्वी म्हणजे सरस्वती-सिंधू संस्कृतीच्या काळीं भारतात मूर्तिपूजा प्रचलीत होती. मोहेनजोदडो व हडप्पा येथील उत्खननात आढळलेल्या मुद्रांवर पशुपती शिव, मातृका, गृहदेवता यांची अंकने आहेत. तेव्हा या काळातील प्रत्यक्ष मूर्ती पहायला मिळतात.

भारतातीलच नव्हे तर जगातील सगळ्यात प्राचीन वाङ्मय म्हणून वेदांकडे पहाता येते. ऋग्वेदात इन्द्र, वरुण, वायू इत्यादी देवतांचा उल्लेख येतो, तसेच त्यांच्या प्रतिमांचाही उल्लेख आढळतो. पण त्यांची पूजा होत असल्याचा उल्लेख मात्र आढळत नाही. प्रतिमा, प्रतिकृती, बिंब, मूर्ती असे शब्द तेथे येतात पण ते स्मृतिचिह्नाच्या



अर्थानेच घ्यावे लागतात असे नी.पु.जोशी सांगतात (१९७९,१७) वैदिक काळात मूर्तिपूजा नव्हती असे मॅक्सम्यूलर, मॅकडोनल्ड, विल्सन तसेंच भारतरत्न पा.वा.काणे, जितेन्द्रनाथ बॅनर्जी इत्यादींचे म्हणणे आहे. तर बोलेनसन् व व्यंकटेश्वर यांचे म्हणणे त्या काळी मूर्तिपूजेचे अस्तित्व होते. या शिवाय एकमत असेही आहे, की त्या काळी आर्य म्हणवल्या जाणाऱ्यांत मूर्तिपूजा नव्हती पण आर्येतर मंडळी, उदाहरणार्थ शिश्नदेव, मूरदेव, अनृतदेव या नावाने संबोधिली जाणारी, मूर्तिपूजा करीत असावी.

वैदिक यज्ञांचे महत्त्व कमी झाल्यावर प्रतिमापूजनाला प्रारंभ झाला असावा असे पां.वा.काणे यांचे मत आहे. वेदोत्तर काळात तर मूर्तिपूजेविषयीचे भरपूर उल्लेख आढळतात. निद्देस सारख्या बौद्ध टीकेतही ते आहेत. नंतर पाणिनीच्या अष्टाध्यायीत देवतामूर्तीसाठी प्रतिकृती व अर्चा असे शब्द आले आहेत. तर कौटिल्याच्या अर्थशास्त्रात देवगृहे, देवप्रतिमा, उपास्यदेवता इत्यादींचा स्पष्ट उल्लेख आढळतो. अपराजिता (दुर्गा), अप्रतिहत (विष्णू), जयन्त (सुब्रह्मण्य), वैजयन्त (इन्द्र) यांचे उल्लेखही आहेत. (सविस्तृत माहितीसाठी नी.पु.जोशी पृ.२२). मूर्तिपूजेचा प्रारंभ व प्राचीनता या संबंधीचा थोडक्यात आढावा येथे घेतला आहे.

नंतर मनुस्मृती, वृद्धहारीतस्मृती इत्यादी स्मृतिवाङ्मयात मूर्ती व मूर्तिपूजेचे उल्लेख आढळतात. पुराणांनी तर वैदिक देवतांना मागे टाकतील अशा अनेक देवता पुढे आणल्या आणि त्यांच्या संबंधीच्या अनेक कथा निर्माण केल्या. पौराणिक देवतांचाच पगडा जनमानसावर मोठ्या प्रमाणात आढळतो. किंबहुना या काळात इंद्रवरु णादी वैदिक देवतांना दुय्यम स्थानावर यावे लागले.

स्मृतिवाङ्मय, रामायण, महाभारत व पुराणे या शिवाय मूर्तिशास्त्रावरही कालौघात अनेक ग्रंथ तयार झाले. बृहत्संहिता, अपराजितपृच्छा, विष्णुधर्मोत्तर, समरांगणसूत्रधार, चतुर्वर्गचिंतामणि, प्रतिमालक्षण, श्रीतत्त्वनिधी, शिल्परत्न, रूपमंडन आणि वैखानसागम, पूर्व व उत्तरकामिकागम इत्यादी आगम ग्रंथ निर्माण झाले.

प्रत्यक्ष मूर्ती उपलब्ध होतात त्या इसवीपूर्व तिसऱ्या-दुसऱ्या शतकापासून. म्हणजे स्थूलमानाने शुंग काळापासून आणि कुषाणकाळी म्हणजे इसवीच्या पहिल्या ते तिसऱ्या शतकात तर या शास्त्राने बाळसे धरले. डॉ.नी.पु.जोशी म्हणतात,'ब्राह्मण, बौद्ध, जैन तिन्ही धर्माच्या मूर्तिशास्त्राचा पाया येथूनच पुढे स्पष्टपणे वर येताना दिसतो. मूर्ति घडविण्यासंबंधी निरनिराळे प्रयोग सुरू झाले, ध्यानाचे स्वरूप ठरू लागले, आराखडे

बांधले जाऊ लागले व वाङ्मय आणि कला दोन्ही क्षेत्रांत मूर्तिशास्त्र वाढीस लागले,'(१९७९.२३).

देव-देवता, मूर्तिपूजा आणि मूर्तिशास्त्र यासंबंधी मध्ययुगात आणि तद्नंतर आपल्या मध्ये बरेच अपसमज निर्माण झाले. त्यांपैकी बहुतेक अज्ञानोद्भव असावेत असे वाटते. मूर्तिपूजा म्हणजे अंधश्रद्धा समजणारी मंडळी याबद्दल हेतुपुरस्सर गैरसमज पसरविणाऱ्या, 'आंतर:कोऽपी हेतु' ठेऊन दिशाभूल करणाऱ्यांवर मात्र डोळे झाकून विश्वास ठेवू लागली.

वस्तुत: ब्रह्म वा परब्रह्म याची कल्पना उपनिषद्कालात दृढ झाली. बुद्धिवादी मंडळी ईश्वर न मानता साऱ्या विश्वाचे नियंत्रण करणारी एक निसर्गशक्ती असल्याचे मानतात, त्यालाच परब्रह्म म्हणता येईल, कारण त्याचेही विश्व-नियंत्रण हेच कार्य आहे. या दृष्टीने पाहाता परमात्मा एकच आहे हेच सनातन धर्मास अभिप्रेत आहे. पंचरात्ररक्षा याचा आधार घेतल्यास असे दिसते की वैष्णवागमात देवतांचा संकर नाही. परमात्मा एकच होय. हे 'एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति ' यावरूनही कळते. या संबंधात आणखी एक उदाहरण देता येईल. भागवतपुराणातल्या नागपत्नीस्तुती (अध्याय १०,प्रकरण १६.४५) मधील एका श्लोकात ही संकल्पना यथार्थपणे मांडलेली आहे. कालियाच्या पत्न्या कृष्णास विनवितात 'नम: कृष्णाय रामाय वासुदेवसुतायच । प्रद्युम्नाय अनिरूद्धाय सात्वताम् पतये नम:।' यातील सूत व पती या एकवचनी संबोधनावरून या चारही देवता एकच समजून त्यांना प्रार्थिले गेले आहे. चारात एक पहाण्याची ही संकल्पना संप्रदायावरील ग्रंथात चतुर्व्यूह वा विष्णु चतुर्मूर्ती म्हणून संबोधिली जाते. ही संकल्पना वैकुंठ मूर्तीत समूर्त झाली. मात्र आपले कार्य, ईप्सित साध्य व्हावे म्हणून उपासकांनी त्याला विविध रूपात काल्पिले आहे. रामतापनीय उपनिषदात म्हटले आहे-

चिन्मयस्याद्वितीयस्य निष्कलस्याशरीरिण:।
उपासकांनां कार्यार्थं ब्रह्मणो रूपकल्पना ।।

(अर्थ : परब्रह्म हे चिन्मय, अद्वितीय, निष्कल व अशरीरी आहे. त्याची रूपकल्पना केली गेली, ती केवळ उपासकांच्या कार्य सिद्धीसाठी होय). (महादेवशास्त्री जोशी,१९८०,पृ.३). गीतेत देवतांच्या रूपासंबंधीचे असे वर्णन आले आहे-

यो यो यां यां तनुं भक्त: श्रद्धयार्चितुमिच्छति ।
तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ।।७.२१



(अर्थ : जो जो सकामी भक्त ज्या ज्या देवतेच्या स्वरूपाला श्रद्धेने पूजायाची इच्छा करितो त्या त्या भक्ताची मी त्याच देवतेच्या ठिकाणी श्रद्धा स्थिर करतो.)
अव्यक्त, अविभाज्य, अकथनीय अविनाशी असे जे निर्गुण निराकार ब्रह्म आहे, त्याची उपासना सामान्य जनांच्या आवाक्यापलीकडची असते. 'क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तांसक्तचेतसाम्। गीता, १२.५' तेव्हा सामान्यासाठी सगुण साकार देवाची म्हणजेच मूर्तीची उपासना सांगितली गेली. वस्तुत: मूर्तिपूजा हे साध्य नसून साधन आहे. तिला प्रतिष्ठा प्राप्त झाली ती 'एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते। ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमा: ।। १२.१. (अर्थ : जे भक्तगण तुज सगुणरूप परमेश्वराची श्रेष्ठ भावाने उपासना करतात आणि जे अविनाशी निराकाराचीच करतात त्या भक्तामध्ये अत्युत्तम योगवेत्ते कोण होत? ) या प्रश्नाच्या उत्तरात भगवंताने 'मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते । श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मता: ।।१२.२.' (अर्थ : मला एकाग्रचित्ताने निरंतर जे भजतात, अतिश्रेष्ठ श्रद्धेने मज सगुणरूप परमेश्वराला भजतात ते मला योग्यामध्येही अति उत्तम योगी वाटतात.) असे सांगितल्यामुळे मूर्तिपूजेला बळकटी आली. सगुणोपासना ही चित्त एकाग्र करता यावे म्हणूनच प्रतिपादिली आहे हे एकदा मानले की मूर्तिपूजेला विरोध असण्याचे कारण नाही. जो पर्यंत भक्ती व श्रद्धा आहे तोपर्यंत ती बंद होणार नाही. तिच्यात काळानुरूप सुधारणा करण्याचे प्रयत्न झाल्यास ते स्वागतार्हच ठरतील.

येथे मूर्तीचे संबंधी आणखी कांही स्पष्टीकरणांची आवश्यकता आहे.

**मूर्त व अमूर्त :**

बृहदारण्य उपनिषदात (२.३.१) 'द्वे वाव ब्रह्मणो रूपे मूर्तं चैव अमूर्तंच' म्हणजे ब्रह्म साकार नि निराकार (मूर्त नि अमूर्त) असल्याचे म्हटले आहे. श्रीज्ञानेश्वर वेगळ्या शब्दात हेंच सांगतात 'पै मूर्तीचेनि मेळे । मूर्तचि होऊनि खेळे । परि अमूर्तपण न मैळे दादुलयाचे ।। ५.८१' म्हणजे अमूर्त ब्रह्म मूर्तीच्या मेळाव्यात मूर्ती म्हणून वावरले असले तरी त्याचे अमूर्तपणास बाधा येत नाही. तुकाराम महाराजही 'सगुण निर्गुण तुज म्हणे वेद । तुका म्हणे भेद नाही नामीं ।।' असेच म्हणतात.

**मूर्ती आणि मिथ्यके : पारस्परिक संबंध**

या संबंधातही तपशीलवार विचार अभिप्रेत आहे. आपणास हे माहीत असते, की पुराणांनी देव-देवतासंबंधीच्या अनेक कथा प्रसृत केल्या आहेत. पैकी काही एका

देवतेपेक्षा दुसरी लहान वा मोठी ठरवण्याच्या संबंधातील असतात, तर काही भक्ताची देव परीक्षा घेऊन त्याला वर देण्यासंबंधीच्या असतात, कांही दुष्ट प्रवृत्तीला शाप देण्यासंबंधीच्या कथा असतात, तर काही रूपकात्मक असतात. या कथांना मिथ्यकथा वा मिथ्यके म्हणायचे. त्यांचे प्रयोजन असते भक्तांना नीतिमार्ग दाखविणे हे. यासंबंधीचा सोपपत्तिक विचार करू या.

एक कथा पुराणात आली आहे. ती शेषशायी विष्णूसंबंधीची. भगवान विष्णूच्या या शयन प्रकारच्या मूर्तीच्या नाभीतून उद्भवलेल्या कमळावर ब्रह्मदेव बसलेला असतो. म्हणजे ब्रह्मदेवाला गौण स्थान देऊन विष्णूकडे उच्चस्थान गेल्याचे यातून सांगितलेले असते.

पुत्रप्राप्तीसाठी विष्णूने शिवाची उपासना केल्याची कथा शैवपुराणात आलेली आहे. विष्णू प्रतिदिनी एकसहस्त्र कमळं शिवचरणी वहात असतो. एकदा एक फूल कमी निघाले. तेव्हा त्याने त्याऐवजी नेत्रकमल वाहिल्याची ती कथा आहे. वीरासनात खाली जमिनीवर बसलेला विष्णू उच्चासनावर बसलेल्या शिवाला वहाण्यासाठी म्हणून शस्त्राच्या साहाय्याने एक डोळा काढतो आहे असे दाखविणारी एक मूर्ती कांचीपुरम् येथील कैलासनाथ मंदिरात पहायला मिळते. तसेच प्रल्हादाच्या भक्तीने प्रभावित होऊन नृसिंहरूपाने प्रगट झालेल्या विष्णूने हिरण्यकशिपू या शिवभक्ताला मारल्याची कथा लोकप्रिय आहे. यातून शिवापेक्षा विष्णू श्रेष्ठ हे दाखविणे अभिप्रेत आहे. अर्थात भक्ताला संकटमुक्त करण्यास देव तत्पर असतो हे ही यातून सांगायचे असते.

वर प्राप्त झाल्यावर (सामर्थ्य प्राप्त झाल्यावर) एखादा भक्त अहंकाराने उतला मातला तर त्याला नामोहरम करण्याचे, शिक्षा देण्याचे देवाच्या हातात असते. भस्मासुराला नाहीसे करण्यासाठी विष्णूला मोहिनीरूप घ्यावे लागले. विष्णूने मोहिनीचे रूप घेऊन भस्मासुराला नाहीसे केले होते.

या आणि अशासारख्या कथावर आधारलेल्या मूर्ती आढळतात. तसेच मूर्तीवर आधारलेली काही मिथ्यकेही आहेत. एखादी मूर्ती 'अशी का' हे नक्की कळत नसेल तर, वा मूर्तीतून दृग्गोचर होणाऱ्या एखाद्या अनाकलनीय बाबीचे निराकरण करण्यासाठीही एखादे मिथ्यक रचले जाते. उदाहरणार्थ पंढरपूर येथील श्रीविठ्ठलमूर्तीच्या अधोवस्त्रांचा सोगा त्याच्या दोन्ही मांड्याच्या मध्ये दिसतो तो न कळल्यामुळे ती गोपाळाची कांठी आहे असे समजणे वा तलम पारदर्शक वस्त्राचा अंदाज न आल्यामुळे त्याला दिगंबर



समजणे आणि त्यावर आधारित मिथ्यके रचणे, ही या प्रकारची उदाहरणे होत.

**महाविलयन :**

प्रख्यात मूर्तिशास्त्रज्ञ नी.पु.जोशी यांनी मूर्तिशास्त्राचा एक आयाम फार परिणामकारकपणे पुढे आणला आहे. भारतीय विचारधारेचे एक वैशिष्ट्य सांगताना ते म्हणतात (१९७९.२०) की, नवीन सिद्धान्ताचा स्वीकार करताना जुन्याचा समूळ उच्छेद न करता त्याला स्वीकारार्ह ठरवण्यासाठी योग्य ते रूप/स्थान दिले जाते. ही बाब मूर्तिशास्त्रालाही लागू पडते. कालौघात येथे नवीन संप्रदाय निर्माण झाले. त्याचे सिद्धान्तास वा विचारसरणीस अनुकूल अशा देवतांचे संकल्पनेवर आधारित मूर्ती निर्माण झाल्या-देवतासंघ वाढतच गेला.

या संबंधातील विचार जोशी यांनी पुढील प्रमाणे मांडले आहेत 'भारतात प्राचीनांचा विलय व नवीन मतांची स्थापना तलवारीच्या धारेवर झालेली नाही. निरनिराळ्या परंपरांचे परस्पर संपर्क, शास्त्रार्थ, विचार स्वातंत्र्य, रूढी आणि मानसशास्त्राप्रमाणे प्रभाव हे त्याचे आधार होत. ह्या दीर्घकालीन प्रक्रियेचा एक परिणाम असा झाला की परस्पराविरूद्ध अशा संप्रदायांची कटुता काळाच्या प्रभावाने चांगलीच कमी झाली व दोघेही शेजारधर्माचे अनुसरण करीत नांदताना दिसू लागले. यज्ञांच्या अनुष्ठानांना व वेदप्रामाण्याला आवाहन करणारे गौतम बुद्ध व आदिनाथ ऋषभ हे विष्णूच्या अवतारमालिकेत गणले जाऊ लागले. निऋति आणि कुबेरासारखे राक्षस सर्वास मान्य असे लोकपाल झाले.........'

ही जी प्रक्रिया आहे हिलाच महाविलयन असे संबोधायचे. पुराणातून याचे अनेक दाखले उपलब्ध आहेत.

या प्रक्रियेतूनच वेदातील रूद्र, पुराणातील शिव झाला. लिंगपूजकांना शिष्ट समाजात स्थान मिळाले ते लिंगाची शिवाशी सांगड घातली गेली म्हणून. गणेश, कार्तिकेय, नृसिंह ह्यांच्या उपासकांना मुख्य प्रवाहात आणायचे म्हणून ही दैवते स्वीकारली गेली. महाभारताप्रमाणे मुळात राक्षस असलेल्या कुबेराला देवांचा धनपती, उत्तर दिशेचा मालक आणि विशेष म्हणजे शिवाचा स्नेही असे स्थान दिले गेले. विद्याधर, यक्ष, पिशाच, गुह्यक या सर्वांचा अंतर्भाव देवयोनीतच केला गेला.

सम्राट अशोकाच्या एका शिलालेखात (मास्की लेख) जम्बुद्वीपातील अमिसा (अमिश्र) देवांना मिसीभूता (मिश्रीभूत) केले असा उल्लेख आहे; म्हणजेच इतस्ततः

विखुरलेल्या लोकदेवांना शिष्टमान्य देवतासंघात अंतर्भूत करून घेतले गेले. हा झाला महाविलयनाचा ऐतिहासिक सज्जड पुरावा (जोशी १९७९.२१). अमरकोषात अशा लोकदेवतांचा उल्लेख देवतासंघातच केला गेला आहे (१.११).

डॉ.जोशी यांनी या महाविलयन प्रक्रियेला कारणीभूत ठरलेल्या गोष्टींची नोंद अशी घेतली आहे :

१. वैदिक आणि पौराणिक देवतांचे एकीकरण.
२. वृक्ष, नाग, शिवलिंग इत्यादी मुळातल्या अवैदिक उपासना प्रतीकांना शिष्ट समाजाकडून मान्यता.
३. जन्म, मृत्यू, रोगराई इत्यादींशी संबंधित पांचवी, सटवी, मरीआई, शीतला तसेंच मातृका, जिवत्या, यक्ष इत्यादींचा समावेश.
४. परदेशी शासकांच्या काळात ग्रीक आणि इराणी देवतांनी येथील देवतासंघात प्रवेश केला मात्र कालांतराने त्यांची नांवे व रूपे बदलली. उदाहरणार्थ फॅरो हा कुबेर झाला. ऑरडोक्शो लक्ष्मी झाली, नना वा ननैय्या ही सिंहवाहिनी दुर्गा झाली. **मग** लोक इराणातून भारतात आले आणि त्यांच्या सूर्यमूर्ती प्रकाराला येथे मान्यता मिळाली.

ही महाविलयनाची प्रक्रिया पुढेही चालूच राहिली. (१९७९.२०,२१)

मूर्तींना दोहोपेक्षा अधिक हात का, त्या बहुमुखी का, त्यांचे बहुपत्नीत्व आणि त्यांची वाहने या संबंधीचे स्पष्टीकरण असे करता येईल :

प्रारंभी देवतामूर्तीला दोनच हात दाखवीत पण मग भक्तांना त्यांचेकडून अधिक गोष्टींची अपेक्षा जाणवली, त्यांच्या हातांतील आयुधांची संख्याही वाढली. तेव्हा सहाजिकच भक्तांनी देवांच्या अगणित कार्यांची नि पराक्रमांची या रूपकांच्या द्वारे कल्पना दिली. देवांच्या अनेक अवस्थितींची ओळख व्हावी म्हणून अनेक तोंडे त्यांना दिली. एका देवतेची अनेक रूपे दाखवायची तर अनेक मूर्ती घडवाव्या लागतात, अनेक तोंडे देऊन तीच संकल्पना साकार केलेली असते. सभेला पन्नास डोकी उपस्थित होती म्हणजेच पन्नास व्यक्ती होत्या म्हणण्यासारखेच हे आहे. उदाहरण देता येईल ते 'सदाशिव' या प्रकारच्या शिवमूर्तींचे. शिवाला जेव्हां चार वा पांच तोंडे असतात तेव्हां त्याला सदाशिव म्हणतात; म्हणजेच सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरूष आणि ईशान् या त्याच्या पांच अवस्थिती, त्या तोंडांच्या द्वारे दाखविल्या जातात. सामान्यत: देव



एक पत्नीच असतात. पुराणातील काही रूपकात्मक कथांच्यामुळे कांही भक्तांचा अपसमज होतो की ते द्विभार्या असलेले आहेत. याचे चांगले उदाहरण ब्रह्मदेवासंबंधीचे देता येईल. त्याला सावित्री व गायत्री अशा दोन पत्न्या आहेत असे मानले गेले. तशा त्याच्या प्रतिमाही घडविल्या गेल्या. कोल्हापूर जवळच्या खिद्रापूर या गांवात कोपेश्वराचे एक शिवालय आहे. तेथे त्याच्या मंडोवरावर ब्रह्माचे आजूबाजूस या दोघी बसलेल्या दाखविल्यात. पुराणात एक कथा आहे. एकदा ब्रह्मदेव यज्ञाला बसले. त्यासाठी लागणारे पाणी आणण्यास सावित्री सरोवरावर गेली. तिला परतण्यास विलंब होतो आहे हे पाहून ब्रह्मदेव क्रोधाविष्ट झाले नि त्यांनी गायत्रीशी लग्न केले व तिच्यासह यज्ञ केला (यज्ञाचे वेळी पत्नीची उपस्थिती आवश्यक असते). आता या कथेतील वैय्यर्थ पहा. ब्रह्मदेव कधी इतका रागावत नाही. रागावला तरी लगेच दुसऱ्या बाईशी लग्न शक्य नाही नि केले तरी पाण्याचे काय ? तात्पर्य हे की ही कथा वेगळेच काही दर्शवते. गायत्री (मंत्र) ही ब्रह्मदेवाची शक्ती आहे. हा शब्द स्त्रीलिंगी म्हणून तिला स्त्रीरूपात घडवावी लागते. समज त्यामुळे असा होतो की ती त्याची पत्नी होय. असे दुसरे कार्तिकियाचे उदाहरण देता येईल. त्याला देवसेना आणि महावल्ली अशा दोन बायका असल्याचे दक्षिण भारतात मानतात. वस्तुत: तो देवांचा सेनापती म्हणजे देवांची सेना ही त्याची शक्ती झाली. म्हणजे महावल्ली ही एकच त्याची पत्नी ठरते. देवतांच्या वाहना संबंधी श्री.कै.ग.ह.खरे यांनी जो विचार मांडला आहे तो त्यांच्याच शब्दात पण संक्षेपाने देतो.

देवादिकांची वाहने मूलत: चिन्हे वा लांछने होती. उदाहरणार्थ गरूत्मन् अथवा सुपर्ण अर्थात सूर्य हे प्रकाशरूप विष्णुदेवतेचे चिन्ह आहे. पक्ष्यांप्रमाणे सूर्य आकाशात सर्वांत उंच चालतो व उडतो म्हणून त्यास गरूत्मन् वा सुपर्ण व पक्ष्यांचा राजा म्हटले. सूर्य चक्राकार असल्याने सूर्यचक्र हे विष्णूचे चिन्ह म्हटले पाहिजे. विष्णूला मनुष्यरूप दिल्यावर गरूड या पक्ष्यांच्या राजाला त्याचे वाहन केले गेले. पशुपतीचे चिन्ह बैल म्हणायला हवे, तोच बैल पशुपतीस मानवरूप दिल्यावर त्याचे वाहन बनला, पार्वती पर्वतसंबद्ध आहे हे समजण्यास वन्य पशूंचा राजा सिंह याच्या इतके चांगले चिन्ह दुसरे नाही. ब्रह्माचे शुद्ध स्वरूप लक्षात घेऊन हंस-तितकाच शुद्ध व स्वच्छ असल्याने त्याचे चिन्ह ठरविले. ही बाब जैन मूर्तींचा विचार केला तर अधिक स्पष्ट होऊ शकेल. काही तीर्थंकरांचे चिन्ह चंद्र, धर्मचक्र असे आहे. त्यांना वाहन कसे समजायचे ? तेव्हां वाहन म्हणजे चिन्ह वा लांछन असेच समजावे लागते. या देवतांचे

ध्वजावर हीच चिन्हे असतात. म्हणून तर वृषभध्वज, गरूडध्वज असे शिवाला व विष्णूला संबोधायचे असते. काही ठिकाणी देवतांचेमूर्तिसमवेत असे ध्वज असतात. वेरूळच्या कैलासलेणीतील मागील ओवरीत त्रिपुरान्तकशिवाच्या जवळ वृषभध्वज आहे. एवढेच नव्हे तर सांची (मध्यप्रदेश) जवळील बेसनगर येथे तर इसवीपूर्व पहिल्या शतकात गरूडध्वज उभारला होता अन् तोही हेलिओडोरोस या भागवत झालेल्या ग्रीकाने.

****



# हरि: ॐ

सृष्टीच्या तीन अवस्था मानल्या आहेत. उत्पत्ती, स्थिती आणि लय/संहार व या अवस्थांना कारणीभूत ठरणाऱ्या देवता म्हणजे क्रमाने ब्रह्मा, विष्णू आणि शिव या होत. कालांतराने या देवतांचे उपासक या तिन्ही अवस्थांचे श्रेय आपापल्या उपास्य देवतेला देऊ लागले-ही बाब वेगळी. विष्णूकडे सृष्टीचे पालन करण्याचे कार्य मानले आहे. विश् म्हणजे व्यापक व व्यापनशील. तो चराचर भूतांच्या ठिकाणी प्रविष्ट असल्यामुळे त्याला विष्णू असे म्हटले जाते. (चराचरेषु भूतेषु व्यापानाद्विष्णुरूच्यते-विष्णुसहस्रनामाची एक टीका).

विष्णूचा प्रथम उल्लेख अर्थातच ऋग्वेदात आढळतो. तेथे एकूण सहा सूक्तांत त्याचा उल्लेख असला तरी त्याच्या वाट्याला स्वतंत्रपणे तीनच सूक्ते आली आहेत. असे असले तरी त्यांतील विष्णूचे वर्णन अत्यंत उदात्त व भव्य स्वरूपाचे आहे. मूर्तिशास्त्राचे दृष्टीने या सूक्तांचा फारसा उपयोग नसला तरी त्याने तीन पावलात पृथ्वी, अंतरिक्ष व इतर सर्व लोक व्यापले असे म्हटले आहे. त्याला उरुगाय, उरुक्रम अशी विशेषणे दिली आहेत. त्रिविक्रम असेही म्हटले आहे. वेदाच्या साकपुनी नामक प्राचीन टीकाकाराने या तीन टप्प्यांचा, सूर्य ज्या विश्वाच्या तीन भागांतून विहार करतो, त्या टप्प्यांकडे निर्देश केला आहे. तो पृथ्वीवर अग्नी, अंतराळात इन्द्र वा वायू व आकाशात सूर्य असतो. अरुणभाव नावाचा दुसरां टीकाकार मात्र सूर्याच्या उदय, मध्यान्ह व अस्त या तीन अवस्थाकडे निर्देश करतो. (वर उल्लेखिलेली उरुगाय, उरुक्रम ही विष्णूची वैदिक नावे पौराणिक काळातील त्रिविक्रम (वामन अवतार) रूपाशी संबंधित आहेत) हीच विशेषणे मूलत: सूर्याची आहेत. सूर्य तीन पावलात त्रिभुवने व्यापतो. तो दोन पावलांनी द्यौ व अंतरिक्ष व्यापतो आणि त्याचे तिसरे पाऊल हे परमोच्च पद होय. (बॅनर्जी, १९८५.३८५)

वरील सर्व विशेषणांवरून आणि वर्णनावरून विष्णूचे मूळ सौररूप स्पष्ट होते. सूर्याचे किती तरी गुणधर्म विष्णुरूपात आढळतात. सूर्याला पक्षीरूपात पाहून उरुगाय (विस्तीर्ण गती असलेला) व उरुक्रम (लांब ढांगा टाकणारा) असे म्हटले आहे. या सूर्यरूप पक्ष्याला ऋग्वेदात सुपर्ण व गरूत्मन् अशी नांवे दिलेली आहेत. आणि विष्णुसहस्रनामात सुपर्ण असे विष्णूचे एक नाव आले आहे. ऋग्वेदातील एका

सूक्ताप्रमाणे (७.१००,४) शेतीसाठी व मनुष्यांना राहाण्यासाठी विष्णूने पृथ्वीचे तीन वेळा आक्रमण केले. दुसऱ्या एका सूक्तात म्हटले आहे की त्याचे जवळ अत्यंत चपळ आणि अनेक शिंगे असलेल्या गाई आहेत. या अशा वर्णनावरून कळते की विष्णूकडे कालांतराने पृथ्वीच्या पालनपोषणाचे दायित्व आलेले असणार. विष्णूला हाक मारल्यास (म्हणजे उपासना केल्यास) तो येतो व भक्तांचे रक्षण करतो, ही कल्पना वैदिक काळातच रूढ झाली होती असे मानावे लागते.

ऋग्वेदात 'इन्द्रा-विष्णु' अशा जोडनावाने या देवतांचा उल्लेख आहे. त्यांचे स्तवन केलेले आहे. तो इन्द्राचा मित्र असून त्याच्या इतकाच तो पराक्रमी आहे. त्यांचे घोडे शत्रूला चिरडून टाकू शकतात. या दोघांनी मिळून दासाच्या मायेचा नाश केला.सैनिकांचा धुव्वा उडवून दिला. (७.९९४-५). वृत्राविरूद्धच्या युद्धात इन्द्राने विष्णुलाच साहाय्यासाठी पाचारिले होते. त्यामुळेच वृत्राला तो मारू शकला. पृथ्वीवरील लोक विष्णूने निर्माण केले व आकाश अस्थिर होते ते स्थिर केले. एवढेच नव्हे तर स्त्रीच्या ठिकाणी गर्भसंभव विष्णूच निर्माण करतो व त्याचे रक्षणही तोच करतो. असे असूनही ऋग्वेदात विष्णूची भूमिका दुय्यमच आहे. त्याला उपेन्द्र व इन्द्राचा आज्ञाधारक असेच मानले आहे. ऋग्वेदातील इन्द्रा-विष्णू म्हणजेच पुढील काळातील नर नारायण किंवा कृष्णार्जुन होत.

यजुर्वेदाच्या काळापासून स्वतंत्रपणे विष्णूचे माहात्म्य वाढीस लागले. पुढे ब्राह्मण काळात यज्ञ संस्थेचा उत्कर्ष झाला नि विष्णूचे महत्त्व आणखीनच वाढले; कारण ब्राह्मणग्रंथांनी यज्ञ म्हणजे विष्णूच होय (यज्ञो वै विष्णु:) असे ठासून सांगितले. ऐतरेय ब्राह्मणात तर सर्व देवतात विष्णू सर्वोच्च आहे (विष्णु: परम: ।) असे त्याचे वर्णन आले आहे. शतपथ ब्राह्मणानेही या विधानाला पुष्टी दिली (१४.१.,१) याच काळात विष्णूची तीन पावले पृथ्वी, अंतरिक्ष व आकाश यांच्याशी स्पष्टपणे जोडली गेली आणि यज्ञकर्त्या यजमानाला विष्णुस्वरूप मानले गेले.

उपनिषदांच्या काळात विष्णू संबंधीच्या कथा वा सूक्ते (स्तोत्रे) मागे पडली. आता तत्त्वज्ञानाने त्यांची जागा घेतली. मैत्री उपनिषदाने सांगितले की प्राणीमात्रांचे पोषण करणारे अन्न हे परब्रह्म म्हणजेच विष्णूस्वरूप होय; तर साधकांचे अंतिम साध्य जे श्रेय ते म्हणजेच विष्णूचे परमपद होय असे कठोपनिषदाने सांगितले. येथपावेतो त्याच्या प्रतिमा करून झाल्या नव्हत्या की तो एखाद्या संप्रदायाच्या केन्द्रस्थानीही



नव्हता.

गृह्यसूत्रांच्या काळात विष्णूची पूजा नियमितपणे होऊ लागली. कालांतराने त्याला पंचायतनात प्रमुख स्थान मिळाले. या सुमारासच ब्रह्मा, विष्णू,महेश या त्रिमूर्तींची कल्पना पुढे आली. सांख्य मतानुसार विष्णू हा सत्त्वगुणी होय. सहाजिकच सृष्टीचे धारण-पोषण त्याच्याकडे आले. विष्णूचे महत्त्व वाढण्याचे श्रेय पांचरात्र मताकडेही जाते. पांचरात्राची निर्मिती शुक्ल यजुर्वेदाच्या काण्वशाखेतून झाली नि पांचरात्र वाङ्मयाचा विस्तार अनेक संहिता, आगम इत्यादींच्या रूपाने झाला. महाभारतादी ग्रन्थ नि पुराणे यावरही त्यांचा प्रभाव पडला. विष्णू हा देवांचा देव आहे, वैकुण्ठात राहाणारा हा देव भक्तांच्या सहाय्याला धावून जातो, साधूंचे रक्षण व दुष्टांचा संहार करण्यासाठी हा अवतार घेतो, हे अवतार आवश्यकतेप्रमाणे पशू, पक्षी, अर्धमानवी वा मनुष्य यांच्या रूपातील असतात, हा देव लोकमंगल करतो अशी जनमानसाची दृढ श्रद्धा आहे.

वर उल्लेखिलेल्या पांचरात्र मताप्रमाणे वासुदेव विष्णूसह संकर्षण, प्रद्युम्न आणि अनिरूद्ध असे चार व्यूह कल्पिण्यात आले आणि त्यातूनच पुढे विष्णूची चोवीस रूपे, एकोणचाळीस पर्यंत अवतारांची संख्या व परिवार देवता या सर्वांचा उदय झाला.

शास्त्रांचा निखळपणे विचार केला तर लक्षात येते की सृष्टीचा पालनकर्ता किंवा वैष्णव संप्रदायाची मुख्य देवता विष्णू, हिची संकल्पना मिश्र वा संयुक्त स्वरूपातून झालेली आहे. वैदिक सूर्यदेवता-विष्णू , ब्राह्मण ग्रंथातील वैश्विक (cosmic) देव नारायण आणि मानवी रूपातील वासुदेव विष्णू या तिन्ही संकल्पनातून विष्णू-पालनकर्ता-उद्भूत झाला आहे.

सूर्याचेच एक रूप म्हणून विष्णू संबंधीचा थोडासा विचार वर आलेलाच आहे. मानवी रूपातील वासुदेव-विष्णूचा विचार पुढे केला जाणार आहे. येथे नारायण-विष्णूचा थोड्याशा तपशिलाने विचार करू या.

नारायण ही वेदांच्या नंतरच्या कालातील देवता होय. विशेष म्हणजे मुळात ती द्राविड देवता होय. अगदी आधीच्या काळात विष्णूपासून हिला अलग मानले जाई. वैकुंठ हे विष्णूचे वास्तव्यस्थान समजले जाते. तर क्षीरसागर हे नारायणाचे निवासस्थान मानण्यात येते. नार + अय + अन् मिळून नारायण हा शब्द (नाम) झाला आहे हे लक्षात घेतले की वरील म्हणण्याचा अर्थबोध होतो. नार म्हणजे पाणी, अय म्हणजे

पहुडण्याची जागा. अन् हा पुरूषवाचक प्रत्यय. विशेष म्हणजे हे तिन्ही शब्दांश द्राविडच होत. यावरून नारायण हा द्राविडांचा सागराशी संबंधित असा देव असल्याचे कळते. द्राविड लोक सागरसंचारी होते हे कळले की नारायणाशी त्यांची सांगड घालता येते.(महादेवशास्त्री,१९८९,भगवान विष्णू,३) (दक्षिण भारतातील अगदी तिरूअनंतपुरम्च्या पद्मनाभस्वामी मंदिरापासून ते थेट श्रीरंगम्च्या श्रीरंगनाथस्वामी मंदिरापर्यंतच्या मंदिरांच्या गाभाऱ्यात शेषशायी नारायणाची प्रतिष्ठापना का झाली असावी ते आता कळते. शिवाय ऐहोळे, पट्टद्कल येथील मंदिरांच्या गाभाऱ्यांच्या दारावरील उत्तरांगावर शेषशायी नारायण प्रतिमा पाहिली की ही द्राविड शैलीतील मंदिरे होत हे ठरते) यापुढील टप्पा म्हणजेच शेषशायी नारायणाची संकल्पना. शेष व नारायण यांचा संबंध जुळून आजची शेषशायीची मूर्ती निर्माण झाली.

महाभारतात नारायणाला देवांचा देव मानले आहे. शांतिपर्वात नारायणीय नामक एक उपाख्यानही आलेले आहे. त्यावरून या काळात विष्णू व नारायण यांच्यातील भेद नाहीसा झाल्याचे स्पष्ट होते. श्वेतद्वीपांत जाऊन नारदाने नारायणाकडून एकांतिक धर्म समजावून घेतला असेही महाभारतात आलेले आहे.

महाभारतकालानंतरच्या काळात विष्णुमहिमा वाढवणाऱ्या अनेक कथा पुराणांतून आढळतात. अठरापैकी पांच पुराणे वैष्णव आहेत. यातून गजेन्द्रमोक्ष, प्रल्हादरक्षण, पृथ्वीविमोचन, मोहिनीरूपधारण इत्यादी कथांद्वारे विष्णूचे अतुलनीय सामर्थ्य व भक्तवत्सलता यांचे माहात्म्य पुराणकारांनी विशद केले. आपल्या अनन्य भक्तांची तो सर्वतोपरी काळजी घेत असतो. गीतेत म्हटले आहे 'अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जना: पर्युपासते । तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्' (अर्थ : जे भक्त अनन्यपणे माझे स्मरण आणि भजन करतात, त्या नित्ययुक्त भक्तांचा योगक्षेम मी चालवतो) गीता,९.२२.

**वैष्णव संप्रदाय :**

भागवत, रामानुज, माध्व, निंबार्क इत्यादी संप्रदाय भारतात शतकानुशतकापासून प्रचलित आहेत. पैकी काही साक्षात् विष्णूला, तर काही विष्णूच्या कृष्ण या अवताराला उपास्य मानतात. या सर्वांपेक्षा पांचरात्र संप्रदाय प्राचीन होय. वरील सर्व वैष्णव संप्रदायाची ती गंगोत्रीच होय म्हणाना ! सर्वांना प्रेरणा पांचरात्राचीच.

पांचरात्र हा सगुण भक्ती मानणारा, पण तंत्रमार्गी असा संप्रदाय आहे. शिव



आणि विष्णू या सगुण रूपात ईश्वराची उपासना सुरू झाली. विष्णू व त्याचा कृष्णावतार यांच्या उपासनेला महाभारतात पांचरात्र हे नाव दिले गेले. शतपथ ब्राह्मणात पांच दिवस चालणाऱ्या सत्राला पांचरात्र असे संबोधिले आहे. हे सत्र नारायणाने केले म्हणून तो सर्वश्रेष्ठ देव ठरला. परमतत्त्व, भक्ती, मुक्ती, योग व विषय या पांचाचे पांचरात्रमतात निरूपण येते. दर्शन, मंत्र, यंत्र, माया, योग, मंदिरनिर्माण, प्रतिष्ठाविधी, संस्कार, वर्णाश्रमधर्म व उत्सव अशा दहा विषयांची त्यात चर्चा आहे. नारदानंतर शांडिल्य, भारद्वाज, मौंज्यायन, औपगायन व कौशिक हे पांच ऋषी पांचरात्र मताचे प्रचारक बनले. (महादेवशास्त्री, १९८९,भगवान विष्णू,१७)

पांचरात्रिकमताप्रमाणे वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न नि अनिरुद्ध हे विष्णूचे चार व्यूह आहेत. ह्यांचा नातेसंबंधही आहे नि यांना आध्यात्मिक अर्थही आहे. उदाहरणार्थ संकर्षण हा विष्णूचा भाऊ आहे व **जीव** मानलेला आहे, प्रद्युम्न हा मुलगा आहे नि तो **मन** मानलेला आहे तर अनिरूद्ध हा नातू **अहंकाराचे** प्रतीक मानलेले आहे. स्वत: वासुदेव म्हणजे भगवंत, परमात्माही आहे. पांचरात्रिकांनी विष्णूच्या अवतारांना विभव मानले आहे, हे एकूण - अधिकात अधिक एकोणचाळीस आहेत. यांचा विचार पुढे केला जाणारच आहे.

येथे आणखी एका गोष्टीचा विचार करण्यासारखा आहे. इसवी पूर्व सहाव्या शतकात बुद्ध आणि महावीरांनी वैदिकांच्या पशुहिंसायुक्त यज्ञ संस्थेला विरोध जसा केला, तसाच तो सात्वत लोकांनीही त्या काळात वा त्या आधी केला. हे लोक कृष्णाच्या वंशातीलच होत. यांनी कृष्णालाच आपला भगवान मानून (पूर्वजाला) त्याची उपासना केली आहे. कंसवध करणारा कृष्ण आणि बळीला पाताळात दडपणारा विष्णू हे याच काळात एकरूप झाले व दोघेही वासुदेव म्हणूनच ओळखले जाऊ लागले. (महादेवशास्त्री : पंचदेवउपासना,पृ.१८-१९)

**वैष्णव संप्रदायाविषयी वाढीस लागलेली भक्तप्रियता :**

हा संप्रदाय बराच प्राचीन आहे हे सर्वज्ञात आहे. भारतातील हा एक महत्त्वाचा आणि लोकप्रिय असा भक्तिमार्ग आहे. नामसंकीर्तन, वैष्णव क्षेत्रांच्या यात्रा हे या संप्रदायाचे मुख्य आचारधर्म आहेत. सर्व प्राणिमात्रांचे ठायी समभाव, रंजल्या गांजल्याविषयी कळवळा ही त्याची शिकवण आहे. तुळस, गोमाता, ही त्याची श्रद्धास्थाने आहेत. अन्नदानास या सांप्रदायात विशेष महत्त्व आहे. भारतातील सर्व राज्यांत तसेच

सर्व भाषामध्ये वैष्णव संतांची परंपरा अविरतपणे चालू असून वैष्णव सांप्रदायिकात सर्व जातीजमातींच्या लोकांचा समावेश आहे. येथे वैष्णव संप्रदायाच्या इतिहासाचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

हेलियोडोरस सारख्या ग्रीकास वैष्णव होण्यात रस वाटावा इतकी महत्ता या पंथास इसवी पूर्व दुसऱ्या शतकातच लाभली होती. त्याने सांची जवळील बेसनगर येथे एक गरूडस्तंभही उभारला होता. याच काळात मथुरेस षोडश महाक्षत्रपानेही भगवान वासुदेवाचे मंदिर उभारले.

इसवीच्या पहिल्या-दुसऱ्या शतकातील म्हणजे कुषाणकालीन विष्णूप्रतिमा उत्तर भारतात अनेक ठिकाणी उपलब्ध झाल्या आहेत. याचाच अर्थ अशा प्रतिमा बऱ्याच आधीपासून घडविल्या जात असाव्यात (नाण्यावरील विष्णू प्रतिमा इ.पू. पहिल्या शतकापासून उपलब्ध आहेत. पुढे त्याचा विचार होईलच)

इसवीच्या चौथ्या-सहाव्या शतकातले सार्वभौम गुप्त सम्राट तर वैष्णवच होते. ते स्वतःला परमभागवत असे म्हणवीत. भागवत धर्माला त्यांचेमुळेच प्रोत्साहन मिळाले. पुढे पुराणांनी उचलून धरलेल्या अहिंसा नि अवतारवाद या दोन्ही गोष्टी भागवत धर्मामुळेच पुढे आल्या.

इसवीच्या सहाव्या शतकापासून ते चौदाव्या शतकापर्यंत उत्तरभारतात भक्तिधर्म फारसा फोफावला नाही, तो एका अर्थानं क्षीणच राहिला. दक्षिण भारतात मात्र या काळात आळवारांनी भागवत धर्माचा विशेष उत्कर्ष घडवून आणला. दक्षिणेतील रामानंदानी (रामानुजाचार्यांचे शिष्य) नंतर उत्तरेत भक्तिपंथ नेला. मात्र कृष्णाचे ऐवजी त्यानी रामाची उपासना सुरू केली. यातील सगुण उपासकांचे प्रतिनिधी ठरले संत तुळशीदास तर निर्गुण उपासनेवर भर दिला तो कबीराने. या नंतरच वल्लभाचार्यांचा पुष्टिमार्ग, निंबार्काचार्यांचा सनकादी संप्रदाय, हितहरिवंशाचा राधावल्लभ संप्रदाय, चैत्यन्याचा गौडीय वैष्णव संप्रदाय, शंकरदेवाचा महापुरूषिया संप्रदाय, महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय व इतर अनेक छोटेमोठे संप्रदाय या सर्वांनी कृष्णभक्तीवर विशेष भर दिला.

पांचरात्र या संप्रदायाप्रमाणेच आणखी काही वैष्णव संप्रदाय आहेत आणि सांप्रत ते अधिक लोकप्रियही आहेत. महाराष्ट्रात सगळ्यात प्रभावशाली आहे तो वारकरी संप्रदाय. पंढरपूर येथील श्रीविठ्ठल-रूक्मिणी हे याचे अराध्य दैवत. आषाढी, कार्तिकी,



माघी आणि चैत्री या मुख्य एकादशींना पंढरीची वारी करणे हे व्रत. ज्ञानेश्वर, नामदेव, सावतामाळी, गोराकुंभार, चोखामेळा, एकनाथ, तुकाराम आदी संतांच्या अभंगावर प्रवचन, कीर्तन, भजन करणे हा नित्य नियम, हरिपाठ म्हणजे वारकऱ्यांची संध्या. गळा तुळशीमाळ, कपाळावर गोपीचंदनाचा टिळा हे बंधन, आळंदी,देहू,पैठण,त्र्यंबकेश्वर ही महत्त्वाची क्षेत्रे. दुसरा संप्रदाय दत्तात्रेय संप्रदाय. हा महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या भागात लोकप्रिय. श्रीक्षेत्र गाणगापूर (कर्नाटक), नरसोबाची वाडी, औदुंबर इत्यादी क्षेत्रे महत्त्वाची मानली जातात. गुरूचरित्राचे पारायणावर विशेष भर. श्रीपादश्रीवल्लभ, नरसिंहसरस्वती, अक्कलकोट स्वामी व माणिकप्रभू हे चार मुख्य अवतार. समाजाच्या अवनतीच्या काळात दत्तात्रेयाने अवतार घेऊन वेद व यज्ञ यांना पुन्हा प्रतिष्ठा मिळवून दिली आणि चातुर्वर्ण्य सुसंघटित केले (जोशी १९८९, ३). महाभारताच्या तिसऱ्या संस्करणातील वन, शांती व अनुशासन पर्वांत दत्तात्रेयाचे उल्लेख आहेत त्यावरून साधारणतः इसवीच्या पहिल्या शतकात दत्तात्रेयास अवतार मानले गेले असे अनुमान करता येते, मात्र त्याच्या मूर्ती घडविल्या गेल्यां त्या इसवीच्या दहाव्या शतकानंतर.

आणखी एका वैष्णव संप्रदायाची दखल घ्यायला हवी. तो आहे नरसिंह संप्रदाय. ह्याचे स्वरूप मात्र मर्यादित प्रकारचे आहे. प्रायः तो कौटुंबिक स्तरावरच राहिल्याचे दिसते.

दक्षिण भारतातील विष्णुभक्तीचा आढावा घेताना/विचार करताना इसवीच्या चौथ्या-पांचव्या शतकानंतर 'आळवार' म्हणवल्या जाणाऱ्या विष्णुभक्तांचा विचार करावा लागतो. तमिळनाडूतील अनेक जातिजमातीतून आलेल्या या बारा विष्णुभक्त आळवारांची परंपरा इसवीच्या नवव्या शतकापर्यंत अखंडपणे चालू होती. त्यांच्या विष्णुभक्तीपर कवनांनी सगळ्या दक्षिणभारतात भक्तिमार्ग हा लोकमार्ग केला होता. ही कवने/भक्तिपर पद्ये सगळ्या विष्णू क्षेत्रांच्या यात्रातून गायिली जात असत. साहजिकच जनमानसात विष्णुभक्ती रुजण्यास त्यामुळे मदत झाली.

पुढे नवव्या शतकात आचार्यांच्या कार्यामुळे या विष्णुभक्तीला वैदिक पार्श्वभूमी लाभली. शंकराचार्यांच्या अद्वैत तत्त्वज्ञानात भक्तीला विशेष स्थान नव्हते ते रामानुजाचार्यांच्या विशिष्टाद्वैत मताने मिळवून दिले. नंतर आलेल्या मध्वाचार्यांनी प्रतिपादिलेल्या द्वैतमताने भक्तिमार्गाला स्पष्टपणे प्रतिष्ठा मिळवून दिली. या सर्व आचार्यांच्या कार्यामुळे दक्षिणेत तेराव्या-चौदाव्या शतकापर्यंत भागवतधर्माला शास्त्रीय

स्वरूप प्राप्त झाले.

**विष्णुमाहात्म्य :**

विष्णू संबंधातील ऋग्वेदादी प्राचीन वाङ्मयातील माहिती आपण घेतलेली आहे. या शिवाय पुराणातूनही भरपूर माहिती उपलब्ध आहे. विष्णुपुराण हे त्यापैकी एक. या पुराणाचा थोडक्यात परिचय असा :

या पुराणाची रचना साधारणत: इसवीच्या दुसऱ्या ते चौथ्या शतकाच्या कालखंडात झाली असावी असे जाणकारांचे मत आहे. ब्रह्म, वायू एवढेच काय तर मत्स्यपुराणापेक्षाही सांस्कृतिक आणि ऐतिहासिक माहिती प्रस्तुत पुराणात अधिक आहे. यात १२६ अध्याय नि सहा हजार श्लोक आहेत. हे पुराण अंश या संज्ञेने विभागले गेले आहे.

पहिल्या अंशात सृष्टीची उत्पत्ती, ध्रुव, पृथू व प्रल्हाद यांच्या संबंधीच्या कथा; दुसऱ्या अंशात पृथ्वीचे खंड, सप्त स्वर्ग, पाताळ इत्यादीचे वर्णन, यात भारत म्हणजे मनुष्याची कर्मभूमी आहे असे गौरवपूर्ण वर्णन आहे. तिसऱ्या अंशात आपल्या दृष्टीने महत्त्वाची ठरेल अशी विष्णुपूजेच्या फलप्राप्ती संबंधीची माहिती आहे. चौथा अंश इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. काही राजवंशाबद्दलची माहिती यात येते. पांचवा अंश आणखी महत्त्वाची माहिती देतो. यात कृष्णलीला वर्णिल्या आहेत. या संबंधात भागवतपुराणाचा हाच प्रमुख आधार ठरतो. सहाव्या अंशात आलेल्या विवरणाचा आशय असा की कोणताही काळ वा युग वाईट नसते तसेच कोणतीही जात निकृष्ट नसते आणि स्त्रियांही परमार्थाच्या अधिका री आहेत. भगवंताकडे भक्तासंबंधात आपपर भाव नसतो इत्यादी. यात वैधी आणि रागानुगा अशा दोन प्रकारची भक्ती सांगितली आहे. वैधी भक्तीत प्रतिमापूजन, बाह्यबिधी आणि आचार या गोष्टींचा समावेश होतो.

या पुराणात काही व्रते सांगितली आहेत ती चित्तशुद्धी, अभ्युदय इत्यादीसाठी. त्यातील विशेष महत्त्वाचे एकादशीव्रत आहे. हे व्रत त्रिदिवसीय असते म्हणजे दशमी दिवशी एकभुक्त रहायचे, एकादशी निर्जल करायची, विष्णुपूजा कथा-कीर्तन करायचे व द्वादशीला पारणे सोडायचे. वर्षातील प्रत्येक एकादशीला नांव आहे. यापैकी आषाढ शुक्ल नि कार्तिक शुक्ल या दोन एकादशा महत्त्वाच्या मानतात. आषाढी एकादशीला शयनी म्हणतात. या दिवशी विष्णू चातुर्मासासाठी निद्रिस्त होतो व कार्तिकीला म्हणजे प्रबोधिनीला तो योगनिद्रेतून जागा होतो. या शिवाय वैदिक यज्ञाहून वेगळा, स्मार्त



विष्णुयाग आणि लक्षवात प्रज्वलित करण्याचे काम्यव्रतही सांगितले आहे. विष्णूच्या पूजेत कमळ व तुळसी यांना खूप महत्त्व आहे. तुळस म्हणजे विष्णूची प्राणप्रियाच. भूमीवर सांडलेल्या अमृताच्या थेंबातून तुळस उगवल्याचे मानतात. हे पुराण अद्वैत मत प्रतिपादन करणारे तरी भक्तिमार्गाचे गोडवे गाणारे, दार्शनिक विचार मांडणारे,असे आहे.

**विष्णुसहस्रनाम :**

महाभारताच्या अनुशासन पर्वात विष्णूची सहस्रनामे आली आहेत. ही एकशेसात श्लोकांमध्ये दिली आहेत. यांना विष्णोपासनेत फार महत्त्व आहे.

यानि नामानि गौणानि विख्यातानि महात्मन: ।<br>
ऋषिभि: परिगीतानि तानि वक्ष्यामि भूपते ।।

(ऐश्वर्य प्राप्तीसाठी मी ही विष्णूची नावे उच्चारतो आहे. ती गुणश्रेष्ठ नांवे ऋषींनी गायिली आहेत). या प्रास्ताविक श्लोकाने विष्णूसहस्रनामाच्या पारायणास प्रारंभ करण्याचा प्रघात आहे. ऋग्वेदापासून ते स्मृतिग्रंथात विष्णूसाठी जी जी नांवे संबोधण्यात आली त्या सर्वांचा येथे समावेश आहे. विष्णुसहस्रनामाचा नित्यपाठ फलदायी मानला जातो.

**विष्णुसूक्त व स्तोत्र :**

'अतो देवा अवंतु' असा प्रारंभ असलेले सहा ऋचांचे एक विष्णुसूक्त आहे. विष्णूची अनेक स्तोत्रेही आहेत. आपली सर्व पापे नष्ट व्हावी, विषयाची हाव नाहीशी व्हावी, संसारातून सुखाने मुक्त होता यावे आणि मनाला शांती लाभावी अशी विष्णूकडे प्रार्थना ज्यात केली आहे ते षट्पदी स्तोत्र महत्त्वाचे मानतात.

**विष्णुमंत्र :**

मोलाचे दोन विष्णुमंत्र आहेत (१) ध्रुवाला अढळपद मिळवून देणारा मंत्र 'ॐनमो भगवते वासुदेवाय' आणि (२) कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने । प्रणतक्लेशनाशाय । गोविंदाय नमोनम:।।

सगुण भक्तीसाठी भगवंताच्या प्रतिमा/मूर्ती आवश्यक असतात. विष्णूच्या प्रतिमेचे दोन प्रमुख प्रकार म्हणजे अव्यक्त आणि व्यक्त हे होत. अव्यक्तमूर्ती म्हणजे येथे शालग्राम; जसे शिवाची अव्यक्त प्रतिमा म्हणजे लिंग. शालग्राम/शाळीग्राम. शाळीग्राम म्हणजे गंडकी (नोपाळात काठमांडू येथील) नदीतला काळा गोटा होय. त्याला मध्ये एक छिद्र असते आणि त्यावर बारीकशी सुवर्णरेषा असते. शालग्राम होतो

कसा या संबंधीची कल्पना अशी की हरिपर्वताच्या पायथ्याशी असलेल्या चक्रतीर्थ नावाच्या सरोवरात एक हजार वर्षे शालग्रामचा गोटा राहिला म्हणजे विष्णू वज्रकीट नावाच्या किड्याच्यारूपाने त्यात चक्राची आकृती कोरतो. नंतरच तो पूजेसाठी योग्य ठरतो. या शालग्रामाचे अनंत प्रकार आहेत. त्या सर्वांचा येथे विचार करण्याची आवश्यकता नाही, आणि तो प्रस्तुतही ठरणार नाही.

शालग्राम म्हणजे विष्णूची अव्यक्त निराकार प्रतिमा. साकार प्रतिमांचे वर्गीकरण असे :

१) योग, भोग, वीर व अभिचारक. हे झाले प्रयोजनानुसारी वर्गीकरण
२) अवस्थानुसारी प्रकारात आसन, स्थानक, यानक व शयन हे प्रकार येतात, शिवाय
३) उत्तम, मध्यम, अधम (साधारण) हे प्रकारही आहेत. या शिवाय पर, व्यूह आणि विभव या गटात विष्णुमूर्तींचा विस्तार झाला आहे, तो वेगळाच. या सर्वांचा विचार योग्य ठिकाणी पुढे होणार आहेच.

आधीच्या विष्णूच्या प्रतिमा उपलब्ध आहेत त्या कुषाण काळातल्या. हा काळ म्हणजे इसवीचे पहिले ते तिसरे शतक. या काळातल्या अनेक प्रतिमा मथुरा व तिच्या आसपासच्या प्रदेशात मिळाल्या आहेत. त्यांचे संख्येवरून पण विशेषत: घडणीवरून असे अनुमान करता येते की त्यांच्या पूर्वीच्या काळीही विष्णुप्रतिमा घडविल्या गेल्या असणार. याला पुष्टी मिळते ती कुषाण काळापूर्वीच्या नाण्यावर आढळणाऱ्या विष्णुप्रतिमांच्यामुळे.

कुषाणपूर्व काळातील नाण्यावर सूर्य, शिव, कार्तिकेय कोरलेली अनेक नाणी उपलब्ध आहेत, मात्र विष्णूचे अंकन पहिल्यांदा आढळते ते इसवीच्या पहिल्या शतकातील पांचाल शासक, विष्णुमित्र याच्या नाण्यावर. यावरून विष्णूच्या हातांतील आयुधे इत्यादींची कल्पना मात्र करता येण्यासारखी नाही, कारण नाण्यांचा आकारच मुळी लहान आहे. मात्र ॲगथोक्लियस या भारतीय-ग्रीक (इंडो-ग्रीक) राजाच्या ऐखनूम येथे सापडलेल्या नाण्यावरील प्रतिमा अधिक स्पष्ट आहेत नि विशेष म्हणजे त्या कृष्ण-बलराम या दोघांच्या आहेत. कुषाणकालीन एका तांब्याच्या नाण्यावरील (जोशी,१९७९,पृ.४६) विष्णू अगदी स्पष्ट आहे. या सुंदर व गुटगुटीत विष्णू प्रतिमेच्या हातांतील गदा, गोलवस्तु, शंख(?) व चक्र यांचे अंकन स्पष्ट दिसते. गुप्तांच्या नाण्यावर गरुड, गरुडध्वज आहे पण प्रत्यक्ष विष्णूचे अंकन त्यांच्या 'चक्रविक्रम' नाण्यावरच



फक्त आढळते.

विष्णुमूर्तींचे प्रकार आणि वाढ कशी झाली याचा विचार करण्यापूर्वी विष्णूची आयुधे, अलंकार इत्यादींचा विचार केलेला बरा म्हणजे मूर्तीची ओळख पटणे सुकर होईल. शिवाय मूर्तींच्या जडण-घडणीवरून, अलंकार व वस्त्रप्रावरणे, परिवार देवता यांच्या अनुषंगाने मूर्ती घडविलेला काळ आणि त्या काळच्या समजुती इत्यादींचा निर्णय करणे सुलभ जाते, ते वेगळेच.

**आयुधे:**

आजच्या घटकेस विष्णू म्हटले की शंख,चक्र,गदा,पद्म धारण करणारी देवता डोळ्यांपुढे येते. पण ही आयुधे व लांछने यांच्या ठेवणीत बदल कसे झाले, केव्हां झाले याचा शास्त्राचे दृष्टीने विचार आवश्यक असतो.

इसवीच्या पहिल्या शतकापासून ते सहाव्या पर्यंत गदा व चक्र ही आयुधे विष्णूच्या हातांत अनिवार्य होती. तिसरी वस्तु म्हणजे शंख हे गुप्तकाळात आवश्यक ठरले. या आधीपासून एका हातात जलपात्रही असे. विष्णूचा उजवा मुख्य हात सामान्यत: अभयमुद्रेत असल्यामुळे व गदा नि चक्र अनिवार्य असल्यामुळे जलपात्र वा शंख चौथ्या हाती असे. काही वेळा जलपात्राचे ऐवजी फळ हाती असे. यावरून असे लक्षात येते की गुप्तकाळापर्यंत विष्णूच्या हातीं कमळ आलेले नव्हते. म्हणजे कमळाचा अभाव असलेली विष्णुप्रतिमा इसवीच्या सहाव्या शतकाआधी घडविलेली असणार हा संकेत मिळतो. याला पुष्टी मिळते ती तत्कालीन वाङ्मयातून. रामायण, महाभारत या आर्षकाव्यातून तसेच विष्णू, वराह, वायू, ब्रह्म इत्यादी पुराणातून शंखचक्रगदा धारण करणारा असेच विष्णूचे वर्णन येते.

**गदा :**

विष्णूच्या गदेचे नाव कौमोदकी असे आहे. या गदेच्या घडणीवरूनही विष्णुमूर्तीचा काळ ठरविता येतो. कुषाण काळातील गदा मुद्गलासारखी म्हणजेच वरच्या टोंकास निमूळती होणारी आहे. ब्रह्मपुराण, अग्निपुराण यात 'वह्निशिखाकारा' व 'प्रदीप्त पावकोज्वला' अशी गदेची जी विशेषणे आलीत ती अशा सारख्या गदेसाठीच असणार. शिवाय विष्णूच्या पायापासून डोक्यापर्यंत हिची उंची असते. विष्णूने गदा कधी सुलटी तर कधी उलटी धरली असल्याचे मूर्तीवरून दिसते. गुप्त काळात गदेची ठेवण बदलली. तिची उंची अर्ध्यावर आली, अर्थातच जाडी वाढली. बुडाशी कुंभ वा

आमलक या नावाने ओळखला जाणारा बसका गोळा, मधला दंडाचा भाग कधी अष्टपैलू असे व टोकाशी गोल मूठ, अशी तिची घडण झाली. अनेक ठिकाणी विष्णूच्या मागच्या उजव्या हातात ती दाखवितात. गुप्त काळातील गदेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे कुठे कुठे हिच्या दंडभागावर कोरली गेलेली स्त्री प्रतिमा. गदेचे नांव कौमोदकी म्हणून. अशा प्रतिमायुक्त आयुधांना शास्त्रीय परिभाषेत आयुधपुरुष म्हणतात. गदा म्हणजे आदिविद्या असे मानले जाते.

**चक्र :**

विष्णूच्या हातातील चक्राचे नांव सुदर्शन, ते मनाचे प्रतीक होय. हे गदे प्रमाणेच अनिवार्य असते. या चक्राचा तुंबा (मध्य, केन्द्रस्थान) वज्राचा असून त्याला सहा आरे असतात. पुराणांतरीच्या वर्णनाप्रमाणे त्रिपुरासुरवधाचे वेळी हे शिवाने प्रथम निर्माण केले व कार्यभाग आटोपल्यावर ते विष्णूस दिले. कुषाण काळातील विष्णूच्या मूर्तीच्या मागच्या डाव्या हातात ते धरलेले असते. हा तळहात उघडा असतो व त्यावरील चक्र अंगठ्याने धरलेले असते तर उरलेली बोटे चक्राच्या धावेवर (कड्यावर) असतात. या चक्राच्या घडणीत गुप्त काळात सुबकता आली व ते वजनदार झाले. सहाजिकच ते विष्णूच्या हाती न देता काही ठिकाणी (उदाहरणार्थ नृसिंह मंदिर, रामटेक) एका चौथऱ्यावर ठेऊन त्यावर विष्णूचा हात टेकलेला दाखवतात.

गुप्तकाळी हे चक्र पुरुषाकृतीच्या डोक्यावर दाखविलेले असते. ह्याला चक्रपुरुष म्हणता येईल. पण दक्षिणेतील चक्रपुरुष (मध्ययुगीन मूर्ती) सोळा हातांचा असतो. वैष्णव भक्त याला विष्णूएवढाच मान देतात व पूजा करतात. हे सुदर्शन चक्र पुढे कृष्णाचे हातीं आपण पहातो व त्याने शिशुपालाचा वध या चक्रानेच केल्याची वार्ता महाभारताच्या राजसूय यज्ञ प्रसंगात, वाचतो.

**शंख :**

विष्णू हातीच्या शंखाचे नांव पाञ्चजन्य ( 'पाञ्चजन्यं ऋषीकेशो देवदत्तं धनंजयः'-गीता,१,१५ ). शंखचूड नावाच्या दैत्याच्या अस्थीपासून याची निर्मिती झाली म्हणे. खरे तर हे ज्ञानाचे प्रतीक. आपण याचा विपरीत अर्थ घेतो. पण पुराणात आलेल्या भक्त ध्रुवाच्या कथेवरून कळते की त्याला विष्णूने शंखस्पर्श करताच ज्ञान प्राप्ती झाली.

हा विष्णूच्या कमेरवर ठेवलेल्या खालच्या डाव्या हातात असतो. कुषाण



कालीन शंख सामान्यतः वामावर्त आहेत, अनलंकृत आहेत. हा विष्णूच्या तळहातावर उभा, डावा व क्वचित त्याच्या पोकळीत बोटे अडकवून धरलेला असतो. गुप्त काळात म्हणजे इसवीच्या चौथ्या ते सहाव्या शतकापर्यंत या पद्धतीत फारसा बदल झालेला नाही. शंखाला पंचभूतात्मक शद्बब्रह्माचे प्रतीकही मानतात.

**पद्म :**

कमळ विष्णूच्या हाती इसवीच्या सहाव्या शतकानंतर दिसते. पद्म म्हणजे कमळ हे भारतीय संस्कृतीचे एक बहुअवस्थिती निदर्शक प्रतीक आहे. स्त्रीतत्त्व, जीवोत्पादक, भूमी,(पृथ्वी) चिच्छक्ती, वैभव, शाश्वत जीवन, शुचित्व आणि शुद्धज्ञान याचे ते निदर्शक आहे.

**जलपात्र:**

विष्णूच्या हाती शंख येण्यापूर्वी जलपात्राची योजना केलेली असे. उंच गळ्याचे लंबगोल पात्र अशी याची ठेवण असते. मथुरा संग्रहालयात जलपात्रधारी विष्णूच्या सहा प्रतिमा आहेत. गुप्तकाळापासून जलपात्राऐवजी शंख दिसतो. मथुरेत मिळालेल्या एका विष्णुप्रतिमेच्या हातातील जलपात्रावर दोन शंखांचे अलंकरण आढळते. हे बहुधा संक्रमणकाळ दर्शविणारे असावे.

**फळ :**

कुषाण काळात हे विष्णुप्रतिमेत आढळत नाही. त्या काळच्या प्रतिमा अभयहस्ताच्या आहेत. हे हात गुप्तकाळात खाली आल्याचे दिसते. यापैकी एका हातात फळ आले. हे बीजपूरक म्हणून ओळखले जाणारे फळ सीताफळासारखे दिसते. हे विविध जीवांचे उत्पत्तीचे द्योतक असावेसे वाटते.

**धनुष्य :**

हे विष्णूच्या हाती असलेले आणखी एक आयुध.हे आदिमायेचे प्रतीक होय. हे क्वचितच दाखविलेले असते. हे शिंगापासून बनवलेले म्हणून याचे नांव शार्ङ्ग. विष्णूची शाङ्गधर प्रतिमा मेहकर (जि.अकोला) येथे असून ती सौंदर्याचे दृष्टीने अप्रतीम मानली जाते. धनुष्य असलेल्या विष्णुप्रतिमा कुषाण वा गुप्तकाळी आढळत नाहीत.

**आयुधपुरुष :**

वर या प्रकारच्या आयुधांचा ओघाने उल्लेख आलाच आहे. येथे थोडी अधिक चर्चा करू. गुप्तकाळात देवतांच्या हातांतील आयुधांना मानवी आकार देण्याची म्हणजेच

आयुधे समूर्त करण्याची पद्धत रूढ झाली. अशा आयुधांना म्हणायचे आयुधपुरुष. रामायणात विश्वामित्राने रामाला दिलेली आयुधे रामापुढे ओंजळ करून (प्राञ्जल्यः) सेवकाचे रूपात उभी राहिली असा उल्लेख येतो. महाभारतातही कृष्णाची सुदर्शनचक्र, कौमोदकी गदा इत्यादी तसेच बलरामाची संवर्तक नांगर व सौनंद मुसळ मूर्तिमान होऊन आकाशातून उतरले असे वर्णन आले आहे. श्रीविष्णुप्रमाणेच शिव,स्कंद व देवी यांची आयुधेही पुरुषाकृतीची असत.

विष्णूच्या आयुधांचा जसा विचार केला तसाच त्याचे अलंकारादींचाही विचार करू.

**मुकुट :**

याला कूटस्थ सत्व मानतात. विष्णुमूर्तीचे शिरोभूषण आधी फेट्याच्या रूपात होते. पुढे त्याचे रूपांतर मुकुटात झाले. ते कसे ते पाहू.

इसवीच्या पहिल्या शतकापर्यंत शिष्ट मंडळी मोठे फेटे वापरीत. कुषाण काळात मागे सोगा व पुढील भागी तुरा असलेले बांधीव फेटे रूढ झाले. याला उष्णीष म्हणता येईल. तत्कालीन उच्चभ्रू समाजात प्रचलित असलेले शिरोभूषणच विष्णूच्या डोक्यावर दिसते. इसवीच्या तिसऱ्या शतकात तुरा व सोगा लुप्त झाला आणि बसक्या, गोल व उंच टोपीचा त्याला आकार आला. ही 'टोपी' अनलंकृत असे तर कधी तिच्यावर फुलांच्या आकृती विणलेल्या असत. इसवीच्या चौथ्या शतकात तर समोरच्या बाजूस 'सिंहाच्या जबड्यात मोत्याची माळ' अशी कलाकुसर करण्यात येऊ लागली. जोशी वर्णन करतात (१९७९.५५) त्या प्रमाणे व्यावृत-मुख सिंहाची ही नैसर्गिक आकृती हळू हळू बदलत जाऊन तिचे ठिकाणी मुक्तादाम ओकणारे सिंहमुख वा कीर्तिमुख दिसू लागते(जोशी, रे.चि.१५.४). कधी एकाधिक कीर्तिमुखे, कमळे, मगरमुखेही कोरली जाऊ लागली. हा झाला आपण सामान्यतः समजतो तो मुकुट.

**एकावली :**

इसवीच्या चौथ्या शतकापसून हा अलंकार विष्णूच्या गळ्यात दिसतो. यातील मधला मणी सगळ्यात मोठा असतो व त्याच्या कडेचे मोती क्रमाने लहान होत गळ्यापर्यंत जाणारे असतात.

**हारयष्टी :**

याच काळातील हा दुसरा लोकप्रिय हार. हा मोत्यांचा वा रत्नांचा असून



याला अनेक पदर असून ते एकत्र गुंफलेले असतात.

**वनमाला:**

विष्णूला वनमाली म्हणतात ते या माळेच्या निकटच्या सान्निध्यामुळेच. वन्यफुलांनी गुंफलेली ही माळ असते. ही तीन प्रकाराने दृश्य झाली आहे. ही इसवीच्या पहिल्या-दुसऱ्या शतकापासून वापरात आलेली दिसते. कदंब, कमळ इत्यादी फुले व पाने यांनी केलेली ही आखुड माळ असते (जोशी, रे.चि.१७.४). दुसऱ्या प्रकारात अनेक प्रकारची अनेक फुले व पानांचा उपयोग केलेला असतो. ही तशी आखुडच असते.

तिसऱ्या प्रकारची नि वनमाला याच नावाने ओळखली जाणारी ही माळ विष्णूच्या गुडघ्यापर्यंत लांब असते. ही चौथ्या शतकापासून लोकप्रिय झाली. हिची ठेवण दोन प्रकारची असते. वर उल्लेखिलेला पहिला प्रकार तर दुसऱ्या प्रकारात ही विष्णूच्या गळ्याच्या बाजूंनी निघून दोन्ही दंडावरून वळसे घेत गुडघ्यावर रूळू लागते(जोशी, रे.चि.१७.८). या वनमालेत अर्जुन, नींब, कदंब, कुंद ही फुले तसेंच तुळस, पारिजातक, चाफा, मंदार यांची गुंफण असते (हरिवंश, ११.८, पृ.२४३). हीच वैजयंती होय.

**जानवे :**

कुषाण काळात (इसवीचे पहिले ते तिसरे शतक) साध्या दोऱ्याचे हे असे, पण ते क्वचितच आढळते. इसवीच्या चौथ्या शतकांपासून मात्र याला एका अलंकाराचेच रूप प्राप्त झाले. या काळात जानव्याचा वापर वाढला. ते मोत्यांचे (मुक्तायज्ञोपवित) घडविले जाऊ लागले. क्वचित सोन्याच्या तारांचेही ते असे.

**श्रीवत्स :**

विष्णूच्या हृदयावरचे हे लांछन (चिह्न) इसवीच्या पहिल्या शतकापासून आढळते. हरिवंशकारांचे मताप्रमाणे वक्षस्थलावरील रोमांनी निर्माण झालेली ती एक नैसर्गिक आकृती होय (४२.३). महाभारताप्रमाणे त्रिशूलाच्या आकाराचे असलेले हे चिह्न विष्णूने शिवाच्या मैत्रीस्तव हृदयावर धारण केले होते (शांति, ३४२.१.१३४). गुप्तकाळापासून याचे अनिवार्यपणे रेखांकन होऊ लागले. महापुरुषाच्या ३२ लक्षणांपैकी श्रीवत्स हे एक लांछन मानले जाई. ते बुद्ध व तीर्थंकर यांच्या वक्षस्थलावरही आढळते. चतुर्दल पुष्पाच्या आकाराचे ते असते.

**कौस्तुभ :**

समुद्रमंथनाचे वेळी मिळालेल्या चौदा रत्नांपैकी हे एक. याला पद्मरागमणी मानतात. विष्णूने हा मिळविला व धारण केला. पण याची शिल्पातून ओळख पटणे अवघड आहे. याचे रूप, रंग याबद्दल काहीही माहिती नाही. वाङ्मयातून मात्र याचे उल्लेख येतात.हे आहे तेजाचे प्रतीक.

**कुंडले, अंगद, कंकणे :**

मणी, चक्र, पुष्प व क्वचित सिंहकुंडलांचा उपयोग विष्णूचे अलंकार म्हणून इसवीच्या सहाव्या शतकापर्यंत होतच होता; मात्र मकरकुंडलांचा प्रकार या नंतरच्या काळातील होय.कुंडले म्हणजे क्षर व अक्षर तत्त्वे. अंगद म्हणजेच केयूर (बाजूबंद), हे विविध कलाकुसरीचे असत. मनगटाभोवतीची सोने, मोती, हिरे इत्यादींची वलये म्हणजे कंकणे. ही विष्णु-लक्ष्मीच्या हाती दिसतात.

**कटिसूत्र:**

नेसूच्या वस्त्रावरून कमरेस गुंडाळलेली वस्त्राची एक अरूंद पट्टी असे याचे स्वरूप इसवीच्या तिसऱ्या शतकापर्यंत होते. या नंतर या पट्टीऐवजी एक बारीक दोरी कोरली जाई. हिलाच कडदोरा वा करगोटा असे म्हटले जाते. इसवीच्या चौथ्या शतकापासून रेशमाच्या पीळदार दोऱ्यास श्रोणीसूत्र वा नेसूसूत्र म्हणू लागले. याचे कित्येक सुंदर व मोहक प्रकार या व पुढील काळात दिसतात.

**अधोवस्त्र:**

चौथ्या शतकाच्या आधीच्या विष्णू प्रतिमामध्ये नेसूचे वस्त्र म्हणून घोट्यापर्यंत येणारे धोतर दिसते. हे सकच्छ असे व याचा पुढचा सोगा जवळ जवळ पायघोळ असे. काष्टा मात्र मागील बाजूस पूर्णपणे खोचलेला नसे, त्याचा थोडा भाग बाहेर डोकावता ठेवलेला असे. (जोशी.चित्र१,२)

नंतरच्या काळात आणखी एका प्रकारचे वस्त्र दिसते. ते गुडघ्याच्याही वरपर्यंतच असे. त्याला अर्धोरूक् म्हणायचे. हे पंचासारखे नसून जंघिका (चड्डी) सारखे असे.

**उपरणे वा उपवस्त्र:**

अनेक शिल्पांतून दिसणारे खांद्यावरील वस्त्र म्हणजे उपरणे. विष्णू प्रतिमात हे इसवीच्या सहाव्या शतकापर्यंत क्वचित आढळते. आढळते ते उपवस्त्र कमरेभोवती



गुंडाळलेले असून त्याच्या दोन्ही टोकाची गांठ डावीकडे कमरेवर असते आणि सोगे खाली लोंबत सोडलेले असतात. अधोवस्त्र आणि उपरणे ही गुप्तकाळात तलम, पारदर्शक असत हे यांचे वैशिष्ट्य लक्षात घेतले पाहिजे.

****

# विष्णुमूर्ती

आधी उल्लेख केल्याप्रमाणे विष्णूच्या मूर्ती आपणास उपलब्ध होतात त्या कुषाणकाळापासून म्हणजे इसवीच्या पहिल्या-दुसऱ्या शतकापासून. त्या आधीही त्या घडविल्या गेल्या असाव्यात हे बेसनगर व अन्य ठिकाणच्या विष्णुमंदिरांच्या उभारणीवरून अनुमानता येते. विष्णुमूर्तींची पांच गटांत वा प्रकारांत विभागणी करता येते १)केवल विष्णुमूर्ती २) चतुर्विंशतिमूर्ती ३) अवतारमूर्ती ४) विशिष्टमूर्ती (किंवा संकीर्ण मूर्ती) ५) संयुक्त मूर्ती

कुषाणांच्या राजवटीतल्या विष्णुमूर्ती मथुरेच्या आसपासच्या भागातून मिळाल्या आहेत. त्यांच्या पहाणीवरून कळते की या वेळ पावेतो विष्णुमूर्तींची विविध प्रकारातील शिल्पांकने अजून व्हायची होती. हे मूर्तिशास्त्र विकसित व्हायचे होते.

मथुरेत व अन्यत्र मिळालेल्या या प्रतिमा आकाराने लहान आहेत, चतुर्भुज असून प्रदक्षिणाक्रमाने अभय, गदा, चक्र व शंख वा क्वचित जलपात्र धारण करणाऱ्या आहेत. यापैकी सामान्य उजवा हात जो अभयमुद्रेत वर उचललेला असतो, त्याला अनुसरून 'उद्यतपाणि' असा उल्लेख वाङ्मयात येतो. या मूर्तींचे व या काळच्या मथुरा कलाशैलीचे एक वैशिष्ट्य म्हणजे यांची 'उभयवर्ती' घडण (sculpture in round) म्हणजे या मूर्ती समोरून व मागून यथातथ्यपणे घडविलेल्या असतात. नाक, कान, डोळे, छाती, पोट हे भाग जसे जसेच्या तसे कोरलेले असतात, तसेच पाठीवर रूळणारे केस, गळ्यातील हारांचा मागचा भाग, जानवे, कासोटा इत्सादीही यथातथ्यपणे कोरलेले असतात (जोशी, चित्र-६). आणखी एक वैशिष्ट्य येथे नोंदवता येईल. विष्णूचे मागचे दोन्ही हात वर उचललेले असतात. यांना 'उदबाहू' म्हणायचे.(जोशी, रे.चि.१३.१,१४.२)

इसवीच्या चौथ्या शतकात गुप्तांचे राज्य स्थापन झाले. ते सुमारे तीनशे वर्षे टिकले. या काळाला प्राचीन भारताचा सुवर्णकाळ म्हणतात. शांतता आणि समृद्धी यांचा हा काळ. तशात गुप्त सम्राट विद्वत्तेचे, कलेचे आश्रयदाते. ते स्वत:स परमभागवत म्हणवीत. राजाश्रयामुळे सहाजिकच ब्राह्मणधर्माच्या मूर्तींची विविधतेत व प्रकारात वाढ झाली. या काळाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अनेक नवीन शास्त्रांचा झालेला उदय व असलेल्या शास्त्रात झालेली वाढ. त्यांचा विकासही याच काळात झाला. वाङ्मयात त्याचे प्रतिबिंब आढळते. मत्स्यपुराण, अग्निपुराण या सारख्यांनी मूर्ति-



निर्मिती संबंधी स्वतंत्र विचार केला. शिवाय विष्णुधर्मोत्तरपुराण व वराहमिहिराच्या बृहत्संहितेत मूर्तिशास्त्रीय माहिती मोठ्या प्रमाणात आली.

राजाश्रय आणि विद्वानांचे मार्गदर्शन यामुळे कलाकारांनी आपले कौशल्य पणाला लावून सुबक, सुंदर व भावपूर्ण मूर्ती या काळात घडविल्या. मूर्तीचा आकार, रूप उठून दिसले पाहिजे म्हणून मोजक्या अलंकारांनी त्यांना सजवण्याची काळजी कलाकारांनी घेतली. कलेच्या दृष्टीने, देहसौंदर्याने अजोड व भावपूर्ण अशा सर्वोत्कृष्ट मूर्ती या काळात घडविल्या गेल्या. विष्णुमूर्ती याला अपवाद नव्हत्या.

वर गुप्तकाळापूर्वीच्या विशेषत: मथुरेच्या परिसरात प्राप्त झालेल्या विष्णुमूर्तींच्या जडणघडणीचा विचार केला, आता गुप्तकाळातील प्रतिमांचा विचार करू या. म्हणजे मूर्तींच्या विकासाचा टप्पा लक्षात येईल.

**प्रभामंडलाचा उद्भव:**

देवतेच्या मस्तकाभोवती दिसणाऱ्या वर्तुळाला प्रभामंडल म्हणतात. हे देवत्वाचे निदर्शक असते. चौथ्या शतकापूर्वी अगदी साधे असलेले प्रभामंडल/तेजोवलय मणिमाला, पत्रावली, कमळ इत्यादी अलंकरणांनी सुशोभित होऊ लागले.

**हातांची ठेवण :**

आता उद्बाहू हात खाली आले. म्हणजेच प्रलंबबाहू झाले. या हातांत शस्त्रे दिसू लागली किंवा आयुधपुरुषांच्या डोक्यावर ते विसावू लागले. दुसरे दोन सामान्य हात दण्डाशी काटकोन करून स्थिर झाले. आधी हे अभयहस्त व कटिहस्त/कट्यावलंबित असत.

**शिल्पांकनातील बदल :**

पूर्वीची उभयवर्ती अंकन पद्धती हळूहळू मागे पडत चालल्याचे या काळातील विष्णुमूर्तीवरून कळते. मात्र मूर्तीच्या दर्शनीभागावर कलाकारांचे लक्ष अधिक केंद्रित झाले. रेखीव नाक-डोळे, बोलका चेहरा, डौलदार देहयष्टी आता दिसू लागली. मात्र मूर्तीचा मागील भाग दुर्लक्षित झाला. तेथील वस्त्रालंकार पुसटशा रेखांनी कोरले गेले. (जोशी, रे.चि.१४,३)

आता प्रत्यक्ष विष्णुमूर्तींच्या प्रकाराबद्दलचा विचार करावयाचा आहे. विष्णूच्या व्यक्त मूर्तींचे वर्गीकरण स्थानक, आसन, शयन व यानक या प्रकारांत करता येते आणि या प्रत्येक प्रकारातील मूर्तींचा योग, भोग, वीर, अभिचारिक अशा स्वरूपात

विचार करायचा असतो. उदाहरणार्थ योगस्थानक, योगासन, योगशयन तसेच भोगस्थानक, भोगासन, भोगशयन इत्यादी. वैखानस या आगम ग्रंथात आलेले हे वर्गीकरण विष्णुमूर्तींची ओळख करून घेण्यास सुलभ ठरते. अर्थात योगासनादी प्रतिमा वरील तिन्ही (चारही) अवस्थांत प्रत्यक्ष प्राप्त होतात असे नाही. आणखी एक गोष्ट येथे ध्यानात घेतली पाहिजे, ती म्हणजे अभिचारिकमूर्तींची. त्या सहसा उपलब्ध होत नाहीत.अशी एकच मूर्ती डॉ.बॅनर्जी यांनी नोंदवली आहे. सध्या ती कलकत्ता येथील भारतीय वस्तुसंग्रहालयात ठेवली आहे. (१९८०,३९९)

**विष्णूच्या स्थानक/उभ्या मूर्ती**

वेगळाल्या प्रकारच्या आणि हातांच्या संख्येत भिन्नता असलेल्या अशा विष्णू प्रतिमा असतात. चतुर्व्यूह, पञ्चवीर, वैकुण्ठ, विश्वरूप, अनंत, हरिहर व कांही अवतार मूर्ती-हे प्रकार उपलब्ध होतात. इसवीच्या सहाव्या शतकापर्यंत झालेल्या मूर्तिशास्त्राच्या विकासाची ही गती आश्चर्यकारकच म्हणायला हवी. या प्रकारच्या मूर्तींचा त्या घडविण्यामागील हेतू वा संकल्पना या दृष्टीने विचार करता या शास्त्रातील प्रगती आपणास थक्क करते. याच काळात द्विभुज, चतुर्भुज, अष्टभुज मूर्तीही घडविल्या गेल्या.

स्थानकमूर्तीमधील दोन हाताच्या मूर्ती कालक्रमदृष्ट्या आधीच्या म्हणजे इसवीपूर्वीच्या दुसऱ्या शतकातील तरी असाव्यात. पण त्या संख्येने फारच कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. अशी एक प्रतिमा विदिशेहून प्राप्त झाली आहे (जोशी, रे.चि.१५.१). सध्या ग्वाल्हेर येथील संग्रहालयातील ही प्रतिमा उभयावर्ती आहे. दुसऱ्या दोन - रूपबास व नांद येथे मिळाल्या आहेत. महाराष्ट्रात अशा विष्णुमूर्ती नागरा (जि.गोंदिया),गौराला (जि.चंद्रपूर), पनवेल, पुणे इत्यादी ठिकाणी उपलब्ध झाल्या असून त्या सर्व इसवीच्या सहाव्या शतकापर्यंतच्या काळातील होत. पैकी पुणे येथे २००३ च्या सुमारास मिळालेली प्रतिमा कलेच्या दृष्टीने सर्वोत्कृष्ट आहे. पनवेल व नागरा येथीलही सुरेख आहेत. पुणे येथील मूर्ती कसबा पेठेतील घराचा पाया खणताना श्री.लोखंडे यांस मिळाली. मूर्तीचा उजवा खालचा हात अभयमुद्रेत असून वरच्या हातात गदा, चक्र (डाव्या वरच्या हातात) व उरलेल्या हातात शंख आहे.

**विष्णूच्या आसनमूर्ती**

स्थानकमूर्ती पेक्षा आसनमूर्तींचे प्रमाण कमी आहे. आसनमूर्तींचे काही प्रकार इसवीच्या दुसऱ्या शतकापासून आढळतात. या सर्वसाधारणपणे चतुर्भुज असतात,



सातव्या शतकानंतरच्या काही अष्टभुजही आहेत. त्यातही एकट्या विष्णूच्या आसनमूर्तींचे प्रमाण कमी आहे, मात्र विष्णू-लक्ष्मी, वैकुंठ, विश्वरूप, अनंत अशा प्रकारांतील विष्णूच्या बैठ्यामूर्ती आहेत.

गरुडारूढ विष्णूची सर्वात आधीची प्रतिमा इसवीच्या तिसऱ्या-चौथ्या शतकातली असून ती चतुर्भुज आहे. आकाराने बरीच लहान असलेली ही प्रतिमा मथुरा संग्रहालयात आहे. पक्षीरूपातील गरुड पंख पसरलेला आहे.

**चतुर्भुज विष्णुमूर्ती :**

विष्णूच्या चार हाताच्या मूर्ती मात्र खूपच लोकप्रिय होत्या/आहेतही. विष्णूने गदा, चक्र व शंख (क्वचित जलकुंभ) हातांत घेतलेले दिसते. सामान्य उजवा हात मात्र अभयमुद्रेत असतो. पुढे इसवीच्या चौथ्या ते आठव्या शतकापर्यंत आयुधपुरुषांचीही कल्पना अमलात आणली गेली. नंतरच्या काळात आयुधपुरुष लुप्त झालेले दिसतात. इसवीच्या सहाव्या शतकानंतरच्या चतुर्भुज विष्णुमूर्तींच्या एका हाती कमळ असते. त्या आधीच्या काळात कमळ नसायचे. विशेष म्हणजे विष्णूच्या अष्टभुजमूर्ती इसवीच्या दुसऱ्या-तिसऱ्या शतकातही घडविल्या गेल्या होत्या. त्या उत्तरभारतात तसेच दक्षिण भारततही होत्या आणि त्यांचे उल्लेख हरिवंश, ब्रह्मपुराण, बृहत्संहिता इत्यादी ग्रंथातून आलेले आहेत. त्याने हातांत तलवार, बाण, ढाल, धनुष्य, शंख, चक्र, गदा व अंधाराचे निदर्शक (हरिवंश ४२.२०) कातळ इत्यादी घेतलेले दिसते. मथुरा, लखनौ येथील संग्रहालयात तसेच भीतरगांव, नागार्जुनकोंडा येथे त्या आहेत. इसवीच्या पाचव्या शतकानंतर केवल विष्णूच्या आठ हातांच्या मूर्ती आढळत नाहीत.

विष्णूच्या स्थानकमूर्ती पैकी चतुर्व्यूह व पञ्चवीर इत्यादी प्रकारातील मूर्तींचा विचार येथे करूया.

**चतुर्व्यूह विष्णू** (जोशी, चित्र १६,रे.चि.१६.३)

अशा प्रकारची विष्णू प्रतिमा चार तोंडाची (चतुर्मुख) असते. मधले मुख्य तोंड वासुदेवाचे व अन्य तीन तोंडे प्रद्युम्न, अनिरुद्ध व संकर्षण यांची असतात. क्रमाने ती सृष्टी, स्थिती आणि संहार यांचे निदर्शन करतात. वासुदेवासह यांना चतुर्व्यूह अशी संज्ञा शास्त्रात आहे. 'विष्णुस्मृतीत'-एकव्यूह चतुर्वक्त्र:' असा उल्लेख आहे. चतुर्व्यूह विष्णूची एकुलती एक प्रतिमा मथुरा संग्रहालयात (क्र.१४.३९२-९५) असून ती भग्नावस्थेत आहे. (जोशी १९७९.६०)

**पञ्चवीर**

वरील चतुर्व्यूह प्रकारातील वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न व अनिरूद्ध यांच्या सुट्यामूर्तीत श्रीकृष्णाच्या जांम्बवतीपासून झालेल्या सांब या मुलाची भर पौराणिक काळात घातली गेली. या पांच यादव वीरांना उद्देशूनच पञ्चवीराची कल्पना निर्माण झाली. मथुरेतील महाक्षत्रप षोडश याने बांधलेल्या देवगृहात या प्रतिष्ठापिल्याचा उल्लेख त्याच्याच अभिलेखात आहे.

दक्षिणेकडे आन्ध्रातील कोंडामोतू येथून या पंचवीरांचा एक पट उपलब्ध झाला आहे. हे त्यांच्या आयुधासह दाखविले आहेत. (जोशी १९७९.२२)

****



# विष्णूच्या चतुर्विंशति (चोवीस) मूर्ती

विष्णूच्या अशा प्रकारच्या मूर्ती इसवीच्या सहाव्या शतकानंतरच निर्माण झाल्या आहेत. या मूर्तींच्या हातांत शंखचक्रगदापद्म असायलाच हवे आणि पद्म तर इसवीच्या पांचव्या शतकाच्या शेवटापर्यंत उपयोगात आणले गेले नव्हते. केवळ शंखचक्रगदा विष्णूच्या हातीं असत आणि उजवा खालचा हात अभयमुद्रेत असे. पुढे या चारांच्या स्थान परिवर्तनाच्या आधाराने विष्णूच्या चोवीस प्रतिमा घडविण्यात आल्या. या संबंधीची वर्णनेही सहाव्या शतकानंतरच्या ग्रंथातूनच आढळतात. या पैकी केशवाच्या आणि नारायणाच्या मूर्तींचे प्रमाण अधिक आहे. या संबंधीचा सविस्तर ऊहापोह अग्निपुराण, अहिर्बुध्न्य संहिता, वृद्धहारीतस्मृती इत्यादी ग्रंथात केला गेला आहे. विष्णूच्या वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न आणि अनिरूद्ध या चार व्यूहांचे प्रत्येकी तीन या प्रमाणे एकूण बारा व्यूहांतरांची कल्पना केली गेली. त्याची सुलभ मांडणी श्री.नी.पु.जोशी यांनी खालील प्रकारे केलेली आहे.

**आदिमूर्ती (श्रीविष्णू)**

**व्यूह**

| **वासुदेव** | **संकर्षण** | **प्रद्युम्न** | **अनिरूद्ध** |
|---|---|---|---|
| केशव | गोविंद | त्रिविक्रम | हृषीकेश |
| नारायण | विष्णू | वामन | पद्मनाभ |
| माधव | मधुसूदन | श्रीधर | दामोदर |

वरील बहुतेक ग्रंथात केशवनारायणादी मूर्तींच्या हातीं स्थान परिवर्तनानुसार शंखचक्रगदापद्म असावेत असे सांगितले आहे, मात्र याला वृद्धहारीतस्मृती अपवाद आहे. या चाराशिवाय असि (तलवार), हल (नांगर), मुसळ, धनुष्य आणि वज्र या पांच आयुधांची भर या स्मृतीने घातली आहे. उदाहरणार्थ नारायणाच्या हातीं शंखचक्रगदा समवेत असि असावी, तर माधवाच्या हातांत चक्र, धनुष्य, गदा नि असि, तसेच विष्णूच्या हातांत चक्र शंख,नांगर नि तलवार (असि), मधुसूदनाचे हातीं चक्र, धनुष्य, मुसळ व कमळ, वामनाचे हातात वज्र, गदा, चक्र व पद्म इत्यादी भेद दाखविला आहे. अन्य सर्व ग्रंथांत नेहमीची चार आयुधेच असावीत असेच म्हटले

आहे.

या प्रमाणेच विष्णूच्या पुढील बारा विभवांचीही रचना करण्यात आली. संकर्षण, वासुदेव, प्रद्युम्न, अनिरुद्ध, पुरुषोत्तम इत्यादी अग्निपुराण, पद्मपुराण, स्कंदपुराण, अभिलषितार्थ चिंतामणी, चतुर्वर्गचिंतामणी, रूपमंडन, धर्मसिंधू इत्यादी ग्रंथांतून या चोवीस मूर्तींच्या हातांतील आयुधक्रम दक्षिणाध:करक्रमाने कांही अपवाद वगळता खालील प्रमाणे सांगितला आहे. यावरून विष्णू केशवाच्या रूपात की नारायणाच्या की माधवाच्या हे ओळखता येते. अशा चोवीसही प्रतिमा एखाद्या देवळावरही असतात. परभणी जिल्ह्यातील जांब येथील देवळावर त्या आहेत तर तेर जवळील जागजी येथील देवळा समोरील बारवेच्या (विहिरीच्या) पायऱ्यावरील देवकोष्ठातही त्या होत्या. पैकी काही देवकोष्ठ आता रिते आहेत. या मूर्ती बहुधा स्थानकावस्थेत म्हणजे उभ्या असतात. वरीलपैकी काही ग्रंथात दक्षिणोर्ध्वकरक्रम सांगितला आहे. सर्वसाधारण भक्ताने गोंधळून जाऊ नये म्हणून खाली या चोवीस मूर्तींची सारणी दिली आहे. जिज्ञासू व अभ्यासू यांचेसाठी संदर्भग्रंथ सुचविले आहेतच.

केशवाच्या मूर्तींची लोकप्रियता अधिक आहे. ही उभी व एकटी असते. गंडकी शिळेतील (black basalt) ही प्रतिमा अत्यंत देखणी असते. सालंकृत असते, वाशिम,केसापुरी (जि.बीड), धारासूर व औंढा जि.परभणी, केळझर,दिवेआगर आणि अन्य स्थळी अशा मूर्ती आहेत.

केशवादी विष्णुमूर्ती बहुधा उभ्या असतात असे असले तरी केशव-लक्ष्मी (बिवली जि.रत्नागिरी येथे व खटाव जि.सातारा येथे अशा प्रतिमा आहेत.) लक्ष्मीनारायण अशा काही आलिंगनमुद्रेतील मूर्ती बसलेल्या अवस्थेतही असतात. लातूर येथील सिद्धेश्वर मंदिरात अशी मूर्ती आहे. क्वचित त्या गरुढारूढही असतात. लक्ष्मी-नारायणाची अशी एक मूर्ती पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळात आहे.

अशा विष्णूच्या मूर्ती काही ठिकाणी दात्याच्या इच्छेनुरूपही घडविल्या गेल्या असाव्यात असे अनुमान करता येते. पुण्यातील पर्वतीवर विष्णूची म्हणून जी मूर्ती आहे ती शास्त्राप्रमाणे माधवाची आहे. म्हणजेच 'गचशंप' अशा क्रमाने आयुधे धारण केलेली आहे. हे विष्णुमंदिर नानासाहेब पेशव्यांनी उभारलेले आहे. थोरल्या माधवरावांच्या नावावरून ही माधवाची मूर्ती घडविली असावी. याच ठिकाणच्या पंचायतनापैकी एकात जनार्दनाची (पचशंग) मूर्ती प्रतिष्ठापित आहे. नानासाहेब पेशव्यांच्या जनार्दन



नामक भावाच्या स्मरणार्थ ही घडविली असण्याची शक्यता आहे. या प्रमाणे अन्य मूर्ती दात्याच्या इच्छेप्रमाणे त्याच्या नावाच्या वा कुणा भगवद्भक्तांच्या नांवे घडविल्या गेल्या असणे संभवनीय आहे.

विशेष म्हणजे अन्वा (जि.औरंगाबाद) येथील वैष्णव मंदिराच्या बाह्य भिंतीवर केशवनारायणादींच्या शक्तींचे शिल्पांकन आढळते. म्हणजे त्याही चोवीस असायला हव्यात. लेखकाला त्यापैकी कांहींची ओळख पटवता आली. बऱ्याच प्रतिमा निसर्गहत झाल्या आहेत. सोबत दिलेल्या सारणीवरून कोणती मूर्ती केशवाची नि कोणती नारायण-माधवाची हे चटकन् ओळखता येते.

या पैकी कांही प्रतिमा सपत्नी असतात. त्या बहुधा आलिंगन मुद्रेत आसनस्थ असतात. सामान्यत: त्या लक्ष्मी-केशव, लक्ष्मी-नारायण अशा प्रकारे संबोधिल्या जातात. उघडच आहे की वर अन्वा येथील मंदिरावर असलेल्या त्यांच्या शक्तींची नांवे या प्रकारच्या मूर्तींच्या वर्णनात येत नाहीत, तर केवळ लक्ष्मी म्हणूनच सर्वत्र त्या ओळखल्या जातात.

****

| | अग्निपुराण | पद्मपुराण | स्कंदपुराण | वृ.हारीत स्मृति | अपराजितपृच्छा सु.११७५-१२५०इसवी | अभिलषितार्थ चिंतामणि ११३० इसवी | चतुर्वर्गचिंतामणि १३ वे शतक | रूपमंडन सु.१३ वे शतक | धर्मसिंधु १७९१ इसवी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ केशव | पशंचग | पशंचग | पशंचग | पशंचग | पशंचग | पशंचग | - | पशंचग | पशंचग |
| २ नारायण | शंपगच | शंपगच | शंपगच | शंपगच | शंपगच | शंपगच | **पशंगच** | शंपगच | शंपगच |
| ३ माधव | गचशंप | गचशंप | गचशंप | गचशंप | गचशंप | गचशंप | गचशंप | गचशंप | गचशंप |
| ४ गोविंद | चगनशं | चगनशं | चगनशं | चगनशं | चगनशं | चगनशं | चगनशं | चगनशं | चगनशं |
| ५ विष्णु | गपशंच | गपशंच | गपशंच | गपशंच | गपशंच | गपशंच | गपशंच | गपशंच | गपशंच |
| ६ मधुसूदन | **शंचपग** | चशंपग | चशंपग | चशंपग | चशंपग | चशंपग | चशंपग | चशंपग | चशंपग |
| ७ त्रिविक्रम | पगचशं | पगचशं | पगचशं | पगचशं | पगचशं | पगचशं | पगचशं | पगचशं | पगचशं |
| ८ वामन | शंचगप | शंचगप | **गशंचप** | शंचगप | शंचगप | शंचगप | शंचगप | शंचगप | शंचगप |
| ९ श्रीधर | पचघ(ग)शं | **गचपशं** | पचगशं | पचगशं | पचगशं | पचगशं | पचगशं | पचगशं | पचगशं |
| १० हृषीकेश | गचपशं | **पचशंग** | पचगशं | पचगशं | पचगशं | पचगशं | पचगशं | पचगशं | पचगशं |
| ११ पद्मनाभ | शंपचग | **चपशंग** | शंपचग | शंपचग | **शंपगच** | शंपचग | शंपचग | शंपचग | शंपचग |
| १२ दामोदर | पशंगच | पशंगच | पशंगच | पशंगच | पशंगच | पशंगच | **पचगशं** | पशंगच | पशंगच |



| | अग्निपुराण | पद्मपुराण | स्कंदपुराण | वृ.हारीत स्मृति | अपराजितपृच्छा सु.११७५-१२५०इसवी | अभिलषितार्थ चिंतामणि ११३० इसवी | चतुर्वर्गचिंतामणि १३ वे शतक | रूपमंडन सु.१३ वे शतक | धर्मसिंधु १७९१ इसवी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ संकर्षण | गशंपच | गशंपच | गशंपच | गशंपच | गशंपच | गशंपच | गशंपच | गशंपच | गशंपच |
| १४ वासुदेव | गशंचप | गशंचप | **शंचगप** | गशंचप | गशंचप | गशंचप | गशंचप | गशंचप | गशंचप |
| १५ प्रद्युम्न | **गचशंप** | **पशंचग** | चशंगप | चशंगप | चशंगप | चशंगप | चशंगप | चशंगप | चशंगप |
| १६ अनिरुद्ध | चगशंप | चगशंप | चगशंप | **चगशंप** | चगशंप | चगशंप | चगशंप | चगशंप | चगशंप |
| १७ पुरुषोत्तम | चपशंग | चपशंग | चपशंग | चपशंग | चपशंग | चपशंग | चपशंग | चपशंग | चपशंग |
| १८ अधोक्षज | पगशंच | पगशंच | पगशंच | पगशंच | पगशंच | पगशंच | पगशंच | पगशंच | पगशंच |
| १९ नारसिंह | चपगशं | चपगशं | चपगशं | चपगशं | चपगशं | चपगशं | चपशं ? | चपगशं | चपगशं |
| २० अच्युत | गपचशं | गपचशं | गपचशं | गपचशं | गपचशं | गपचशं | गपचशं | गपचशं | गपचशं |
| २१ जनार्दन | पचशंग | ---- | गपचशं | **पशंचग** | गपचशं | गपचशं | गपचशं | गपचशं | गपचशं |
| २२ उपेन्द्र | शंगचप | ---- | शंपचग | शंपचग | शंपचग | शंपचग | **पगचशं** | शंपचग | शंपचग |
| २३ हरि | **शंपचग** | ---- | शंचपग | शंचपग | शंचपग | शंचपग | शंचपग | शंचपग | शंचपग |
| २४ कृष्ण | शंगपच | शंगपच | शंगपच | शंगपच | शंगपच | शंगपच | ---- | शंगपच | शंगपच |

# विष्णूच्या विभव किंवा अवतार मूर्ती

विष्णूकडे पृथ्वीच्या पालनपोषणाचे कार्य आहे हे आपण पाहिलेच आहे. त्यामुळे पृथ्वीवर म्हणजे या इहलोकात जेव्हा दुष्ट प्रवृत्ती बळावते, लांछनीय गोष्टी व्हायला लागतात, सुष्टांना, सज्जनांना जगणे दुष्कर होते तेव्हा सज्जनांचे रक्षण करण्यासाठी धर्मावरील संकट नाहीसे करण्यासाठी विष्णू अवतार घेत असतो, असे गीतेत स्पष्टपणे सांगितले आहे.

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्

धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।। (गीता४:८)

ही अवताराची (अव + तृ या धातूवरून अवतार शद्ब झाला, उच्च स्थानावरून खालच्या स्थानावर उतरणे असा त्याचा अर्थ आहे) संकल्पना सामान्यत: मान्य झालेली असली तरी, तिच्या स्पष्टीकरणासंबंधी, प्रयोजनासंबंधी आणि संख्येसंबंधी एकमत मात्र झालेले नाही. किंबहुना त्यामुळेच ही संकल्पना बहुआयामी झाली असावी आणि म्हणूनच काही अंशावतार, तर कांही तात्कालीक अवतार आणि काही पूर्णावतार मानण्यात येतात. पैकी वराह, वामन, परशुराम आदि अंशावतार तर नृसिंहादी दुसऱ्या प्रकारचे व राम, कृष्ण हे पूर्णावतार होत. बुद्ध आणि कल्की यांना पूजनीय म्हणून स्वतंत्र स्थान प्राप्त झालेले नाही आणि मत्स्य, कूर्माचे स्थान नगण्यच म्हणावे असे आहे.

विष्णूच्या अवतार संख्येबद्दल बरेच मतप्रवाह आहेत. या संबंधी असेही म्हणता येईल की अवतार संकल्पना बाळसे धरण्याच्या आधीची काही रूपे नंतर अवतारांत गणली जाऊ लागली; उदा.वराह, संकर्षण इत्यादी. अवतारांची संख्या स्थिर होईपर्यंत पाच पासून एकोणचाळीस अवतारापर्यंत मजल गेली होती आणि शेवटी साधारणपणे दहा अवतार सर्वमान्यता पावले.

वाल्मीकीय रामायणात पाचच अवतारांना मान्यता आहे. एकशृंग वराह, त्रिविक्रम, परशुराम, राम व कृष्ण. तर महाभारतात दहा अवतार सांगितलेत. त्यांत मत्स्य, कूर्म इत्यादी नऊ व बुद्धाचे ऐवजी हंसावतार आहे. तर मत्स्य, अग्नि, वायु इत्यादी पुराणे अवतारांची संख्या दहाच देत असले तरी अवतार भिन्नता आहे. यज्ञ, दत्तात्रेय, मांधाता, वेदव्यास हे मत्स्यपुराणातील अवतार किंवा वायुपुराणातील कृष्ण अवतार अग्निपुराणाने स्वीकारलेले नाहीत. त्यातील अवतार सध्या लोकप्रिय असलेले दहा अवतार आहेत. ब्रह्म पुराण आठ अवतार मानते, तर स्कंद पुराण यांची संख्या



चौदा वर नेते. नित्याच्या दशावताराशिवाय कपिल, ऋषभ, व्यास, दत्त हे चार यात आलेत. विष्णुपुराणाने यांची सात एवढीच संख्या दाखविली आहे तर विष्णुधर्मोत्तरात ही सोळापर्यंत गेलेली आहे. सध्या सर्वाधिक लोकप्रिय असलेल्या भागवतपुराणात एका अध्यायात तेवीस तर दुसऱ्यात पंधरा अशी संख्या येते. अहिर्बुध्न्यसंहितेत सर्वाधिक म्हणजे एकोणचाळीस अवतार येतात. (परिशिष्ट ३)

सर्वसामान्य भाविकाला विष्णूच्या अवतारांच्या संख्येचा आणि तपशिलाचा एक वेगळा आयाम लक्षात यावा म्हणून थोड्या विस्ताराने त्यासंबंधीची माहिती वर दिली आहे. मात्र नंतरच्या काळात मत्स्य-कूर्म हे दोन जलचर; वराह, नृसिंह हे दोन वनचर, वामन व परशुराम हे दोन ब्राह्मण आणि राम,कृष्ण (वा बलराम) हे दोन क्षत्रिय यांचे शिवाय बुद्ध व पुढे होणारा कल्की असे दहा अवतार मानण्यात आले. येथे हे ही लक्षात घेतले पाहिजे की सदासर्वकाळ या दहा अवतारांना सारखेच स्थान प्राप्त झालेले नव्हते. मत्स्य, कूर्म (आंध्रातील श्रीकाकुलम जिल्ह्यातील एक मंदिर सोडता) आणि कल्की यांची मंदिरे नाहीत. बौद्ध धर्मात बुद्धाची मूर्ती स्वतंत्रपणे स्थापिली गेली तरी दशावतारातील बुद्धमूर्तीचे तसे नाही. तसेच दशावतारात राम व कृष्ण असले तरी मुरलीधर कृष्ण व कोदंडधारी राम अशा प्रकारच्या मूर्ती सहाव्या शतकापर्यंत दशावतारात नव्हत्या.

**दशावतार**

दशावताराच्या संकल्पनेसंबंधी विद्वानांची भिन्न भिन्न मते आहेत. कोणी याकडे कशी उत्क्रांती झाली असावी या दृष्टीने पहाते तर कोणी देवता संघ आणि असुरशक्ती यांच्यातील संघर्ष यांचे मागे असल्याचे मानतात.

मत्स्य:कूर्मो वराहश्च नारसिंहोऽथ वामन: ।

रामो रामश्च कृष्णश्च बौद्ध: कल्कीति ते दश ।।

**मत्स्य**

हा विष्णूचा पहिला अवतार. पुराणात या संबंधी आलेली कथा अशी: हयग्रीव किंवा शंख नामक असुराने ब्रह्मदेवाकडील चारही वेद चोरले व समुद्रात बुडवले. ते वेद विष्णूने माशाचे रूप घेऊन वर काढले. याचे शिल्पांकन साध्या माशाच्या रूपात करतात, हे साधारणपणे दशावतार पट्ट्यात पहायला मिळते. काही ठिकाणी याच्या पाठीवर चार मानवमुखे वा चार मानव प्रतिमाही दिसतात. हे अर्थातच चार वेदांचे प्रतीक म्हणून

आलेले आहेत. रायपूरच्या लक्ष्मण मंदिराच्या गाभाऱ्याच्या दारावरील एका शाखेवर असे शिल्पांकन आले आहे. येथे चार वेदांची प्रतिके म्हणून माशाच्या चार बाजूस चार जण दाखवले आहेत. क्वचित मत्स्याच्या पाठीवर शिवलिंगही दाखविलेले असते. (रे.चि.२९.४९). मत्स्यावताराच्या स्वतंत्र प्रतिमात कोठे पद्मासनातील विष्णूच्या पादपीठावर मासा असतो. (जोशी,१९७९.तळटीप ६७) तर कोठे शंख, चक्र, गदा, पद्म यांच्यामध्ये मत्स्यावतार असतो. याची स्वतंत्रपणे मंदिरात स्थापना झालेली आढळत नाही वा पूजेतही तो दिसत नाही. खालील अंग माशाचे आणि वरचे अर्धांग विष्णूचे, त्याचे हातीं शंखचक्रादी आयुधे, अशी प्रतिमा ग्वाल्हेर येथील गुजरी महाल संग्रहालयात आहे. वेदवाङ्मयात मत्स्य हे प्रजापतीचे रूप मानले आहे.

**कूर्म**

हा जलचरापैकी दुसरा अवतार. दशावतार पट्ट्यात याची उपस्थिती दुसऱ्या क्रमांकावर असते. या अवताराचे मूळ तैत्तिरीय संहिता व आरण्यक यात आढळते. भागवताने कूर्मावताराचा संबंध समुद्रमंथनाच्या कथेशी जोडला.

समुद्रमंथनाचे वेळी वासुकीने वेढलेला मंदराचल याच्या पाठीवर दिसतो. बाजूला देव-दानवाचे प्रतिनिधित्व करणारे दोन पुरूष दिसतात. याची स्वतंत्रपणे पूजा होत असावी. नागपूर येथील मध्यवर्ती संग्रहालयात एका पीठावर कूर्म, त्याचे चार पायाजवळ शंख, चक्र, गदा, पद्म आणि पीठाला वारीमार्ग असे एक शिल्प आहे. म्हणजेच त्याची पूजा होत असावी, अभिषेक केला जात असावा. आन्ध्रातील श्रीकाकुलम जिल्ह्यात कूर्मेश्वराचे स्वतंत्र मंदिरच आहे. पण हे अपवादच असावेत. ग्वाल्हेर येथील कूर्मावताराची प्रतिमा भारतातील सर्वात सुंदर व परिपूर्ण प्रतिमा होय. येथे कासव नागफणाधिष्ठित असून त्याचे पाठीवर मंदराचलाच्या रवीला वेटोळा घातलेल्या वासुकीची दोन टोके धरून देव व दैत्य घुसळीत आहेत असे दाखविले आहे. शिवाय कासवाचे पाठीवर पद्मासनात विष्णू बसलेला आहे. म्हणजेच येथे कासव व मानव या दोन्ही रूपात विष्णू दिसतो. (खरे, १९३९,४१,चित्र १५)

**वराह :**

वैदिक वाङ्मयात वराह हे प्रजापतीचेच रूप मानले आहे. तैत्तिरीय संहितेत (७.१.५.१) प्रजापतीने वराहाचे रूप घेऊन पृथ्वीला समुद्रातून वर काढल्याची कथा आली आहे. हा विष्णूचा तिसरा अवतार. हिरण्याक्ष नावाच्या दैत्याने पृथ्वीला समुद्रात



लपविली तेव्हां विष्णूने त्या दैत्याला ठार करून पृथ्वीला समुद्रातून बाहेर काढले, तिचा उद्धार केला अशी कथा पुराणातून येते. या वराहमूर्तीच्या स्थापनेमुळे राज्यप्राप्ती होते असे अग्निपुराणात विधान आहे (४९.२). चालुक्यादी राजघराण्यांचे हे दैवत होते.

मूर्तिशास्त्रानुसार वराहाच्या दोन प्रकारच्या प्रतिमा असतात. (१) **भूवराह**-यालाच नृवराहही म्हणतात, मत्स्यपुराणात याला महावराह म्हणून संबोधिले आहे. (२५९.२८) (२) **यज्ञवराह.**

भूवराहाच्या प्रतिमा कुषाणकालापासून मिळतात. हा चतुर्भुज असून याने सुळ्यावर पृथ्वीला उचललेले आहे. मागील हातांत चंद्र-सूर्य घेतले आहेत. ते रथारूढ आहेत. पुढील म्हणजे सामान्य हात कमरेवर ठेवले आहेत. गळ्यात आखूड वनमाळा असून, छातीवर श्रीवत्स लांछन आहे.

इसवीच्या चौथ्या शतकापासून हा अवतार लोकप्रिय झाल्याचे दिसते.याला मानवी देह आणि वराह मुख असते, म्हणून नृ-वराह असेही म्हणतात. हा द्विभुज व बहुतेक वेळा चतुर्भुज दाखवलेला असतो. हा बहुधा अनलंकृत असतो, माथी मुगुट नाही, वनमाला मात्र आपादलंम्बिनी असते. विशेष म्हणजे शंख, चक्र सुद्धा अपवादानेच हातात असतात. वराहाचे पायाखाली पाताळाचे निदर्शक म्हणून एकटा वा सपत्निक शेषनाग असतो. अशी एक प्रतिमा वेरूळ येथील १४ क्र.च्या लेणीत आहे. काही ग्रंथात वराहाचा एक पाय कासवाच्या पाठीवर असावा असे सांगितले आहे. समुद्रातून वर काढलेली पृथ्वी बहुधा सुळ्यावर असते. या नंतरच्या काळात ती त्याच्या कोपरातून मुडपलेल्या डाव्या हातावर दिसते. वराह बहुधा नेहमीच आलीढासनात असतो. याची सर्वात भव्य व परिवारासह अशी प्रतिमा सांची जवळील उदयगिरी येथील लेणीत आहे. ही इसवीच्या चौथ्या शतकातील आहे.

दुसऱ्या प्रकारची म्हणजे यज्ञवराहाची मूर्ती म्हणजे पशुरूपातील वराह. वराहाचे संपूर्ण शरीरच यज्ञमय असते. सुळ्याला पृथ्वी लोंबती असते व पोटाखाली चारही पायात तोंड ते शेंपूट असा नाग पहुडलेला असतो. महाराष्ट्रात अशा यज्ञवराहाच्या मूर्ती चाकण, लोणी भापकर, बलसाणे, पुणे (केळकर संग्रहालय),राजवाडे संशोधन मंडळ,धुळे येथे आढळतात. याचे वर्णन वेदवेदाङ्तनु (पद्म पुराण २३७.२०),वेदमयशरीर (विष्णु ४.२९) रोमान्तरस्थमुनिगण (उपरोक्त), पशुजानुमरवाकृति (मत्स्य,२४७.६७-७१) अशा शब्दात केलेले आढळते. खजुराहो

येथील लक्ष्मण मंदिरासमोरच्या यज्ञवराह मंडपातील मूर्ती प्रेक्षणीय आहे. शिव मंदिरासमोर नंदी मंडप असावा तसा हा मंडप आहे.

**नरसिंह :**

नरसिंहाच्या मूर्ती चौथ्या शतकाच्या आधीच्या दुर्मिळच आहेत. विष्णूच्या वनचर अवतारामधील पहिला वराहाचा व दुसरा नरसिंहाचा अवतार होय. या अवताराची लोकप्रियता वाढतच गेली. देवगिरीचे यादव घराणे तसेच विजयनगरचे राजघराणे कुलदैवत म्हणून नरसिंहाला मानत. याची स्वतंत्र मंदिरे अनेक ठिकाणी आहेत. ह्याला विष्णूच मानले जाते असे समजण्याचे एक कारण असे की याची पत्नी म्हणून लक्ष्मीला दाखवतात. इतर सर्व अवतारांच्या (असल्याच तर) वेगळ्या-स्वतंत्र देवता असतात, जसे रामाची सीता, बलरामाची रेवती तर कृष्णाची रुक्मिणी. नरसिंह अवताराच्या प्रयोजनाची कथा बहुधा सर्वांना माहीत असते. हिरण्यकशिपू नामक दैत्यांचा राजा हा मोठा शिवभक्त असतो तर राजपुत्र प्रल्हाद हा विष्णूचा एकनिष्ठ उपासक असतो. त्याने विष्णूची उपासना सोडावी म्हणून हिरण्यकशिपूने कसोशीने त्याला आधी समजावले व निरुपायाने त्याचा नानाप्रकारे छळ केला. ' विष्णू सर्वत्र आहे' या प्रल्हादाच्या म्हणण्यात काहीही तथ्य नाही हे दाखविण्यासाठी समोरच्या स्तंभाला तो लाथ मारतो तर त्यातून नरसिंह प्रगट होतो. हिरण्यकशिपूला देवाने वर दिलेला असतो की त्याला कोणीही मनुष्य वा प्राणी, दिवसा वा रात्री, घरात वा घराबाहेर, जमिनीवर वा अवकाशात शस्त्राने ठार करू शकणार नाही. कथा सांगते की म्हणून अर्ध मानवी व अर्ध प्राण्याचे शरीराने, सायंकाळी उंबरठ्यावर, मांडीवर घेऊन नखाने त्याला ठार केले जाते.

विश्वाच्या पालन पोषणाचे कार्य करीत असताना दुष्टांचा नाश करण्यासाठी विष्णूला उग्र वा रौद्र रूप अपवाद म्हणून घ्यावे लागले. तरी सौम्य वा शांत स्वरूप हाच त्याचा स्थायीभाव आहे. म्हणूनच स्थौण व विदरण ही दोन रूपे वगळता, केवल, गिरीज, यानक, योग नि लक्ष्मीनरसिंह अशा रूपांत तो दाखविला जातो. पैकी आसन, यानक व योग नरसिंहाच्या मूर्ती बैठ्या तर अन्य स्थानक असतात. तसेच स्थौण आणि विदरण नरसिंह मूर्ती हिरण्यकशिपूसह असतात आणि याच उग्र प्रकारच्या म्हणता येतील.

सगळ्यात प्राचीन केवल नरसिंहाची प्रतिमा आंध्र प्रदेशातील कोंडामोतू या ठिकाणी आहे. येथे नरसिंहाने समोरचे दोन पाय सरळ ठेवले असून तो मागच्या पायावर



टेकून बसलेला आहे. त्याचे विष्णूशी नाते पटविण्यासाठी त्याच्या मानेच्या आजूबाजूस गदा व चक्र ही आयुधे शिल्पांकित केली आहेत (जोशी, रे.चि.१३.२). ही झाली हरिवंशात वर्णिल्याप्रमाणे नरसिंहाची प्रतिमा. हिरण्यकशिपूचा वध करण्यासाठी विष्णू प्रथम सिंहरूपात अवतरला, असे त्या कथेत आले आहे. नरसिंहाच्या इसवीच्या सहाव्या शतकाच्या आधीच्या प्रतिमात नरसिंहाच्या डोकीवर मुकुट नसतो. किंबहुना त्या सिंह मुखाच्या, आयाळ असलेल्या दाखवतात.

या नंतरच्या काळातील म्हणजे इसवीच्या सहाव्या शतकातील केवल नरसिंहाची बैठी प्रतिमा देवगढ (म.प्रदेश) येथील मंदिरावर आहे. रामटेक, जि.नागपूर येथे नरसिंहाच्या दोन्ही मंदिरांत केवल नरसिंहाच्या बैठ्या प्रतिमा आहेत. तो द्विभुज असून पैकी उजवा हात जमिनीवर ठेवलेल्या मोठ्या आकारातील चक्रावर विसावला आहे. माथी मुगुट नाही. सहाव्या शतकातीलच या आहेत. याच काळातील विष्णूच्या उभ्या प्रतिमात नरसिंहाच्या डोक्यावर मुकुट नाही. मात्र गळ्यात वनमाला आहे. नरसिंहाचे मस्तक अर्थात सिंहाचे असून नैसर्गिक दाखविले आहे. अशी एक मूर्ती बदामी येथील क्र.३ च्या लेणीत आहे. हातांमध्ये शंख, चक्र, गदा आहे. या नंतरच्या काळात नरसिंहाच्या डोक्यावर मुकुट येतो.

स्थौण नरसिंह म्हणजे पुराणातील कथेनुसार स्तंभातून उद्भवलेला नरसिंह. त्या प्रकारच्या प्रतिमा ओळखण्याचे गमक म्हणजे नरसिंहांची व हिरण्यकशिपूची दाखविलेली झुंज (जोशी १९७९ तळटीप,१८६). कल्पना ही की स्तंभातून बाहेर पडताच हिरण्यकशिपूशी त्याची झटापट लक्षात यावी. अशी पहिली प्रतिमा नचना कुठारा (म.प्र.) येथे मिळते. नंतर इसवीच्या सातव्या-आठव्या शतकातील दिसतात त्या वेरूळ लेणीत. पैकी दशावतार नामक लेणीतील प्रतिमा कलेच्या दृष्टीनेही सर्वोत्कृष्ट आहे. ही आलीढासनात उभी असून हिच्या आठ हातांपैकी चार हातांत शंख, चक्र, खड्ग, खेटक आहेत. पाचवा चपेटदानमुद्रेत, दोन हिरण्याच्या डोक्याला धरून आणि आठवा अभयमुद्रेत आहे.

नरसिंह हे दक्षिण भारतातील एक लोकप्रिय दैवत होय. याची स्वतंत्र मंदिरे व प्रचंड मूर्ती तेथे आढळतात. आगम ग्रंथातील वर्णनाप्रमाणे स्थौण, गिरिज, यानक अशा या प्रतिमा अन् त्याही द्विभुज, चतुर्भुज, षड्भुज, अष्टभुज, द्वादशभुज आणि षोडशभुज (जोशी १९७९.तळटीप १८४) येथे आढळतात. अर्थात अशा वेगळाल्या

प्रकारच्या आणि बहुभुजी प्रतिमा उत्तरेत मिळत नाहीत असे नाही.

गिरिज म्हणजे पर्वतातील नरसिंह, तो बहुधा एकटाच असतो.

विदरण नरसिंहाच्या मूर्ती सर्वाधिक प्रमाणात सर्वत्र आढळतात.त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, सज्जनांच्या रक्षणासाठी तो खलनिर्दालन करतो आहे, हे असावे. पुराणान्तरीच्या कथांप्रमाणे ते शिल्पांकन असून प्रयोजनानुसारी ते आहे. दुष्ट हिरण्यकशिपुला मांड्यावर आडवा घेऊन आपल्या सामान्य दोन हातांच्या नखांनी तो त्याचे आतडे बाहेर काढीत असल्याचे दृश्य येथे दिसते. क्वचित या हातात तलवारी दाखविलेल्या असतात आणि अन्य हातांत शंख, चक्र, गदा, पद्म, ढाल, धनुष्य, बाण इत्यादी आयुधे असतात. पैठण येथील विदरण नृसिंहाची अप्रतीम मूर्ती बारा हातांची आहे.

यानक नरसिंह गरुडावर बसलेला असतो. बहुधा चतुर्भुजच असतो (जोशी,१९७९,तळटीप १८९). अशा प्रतिमा कमी प्रमाणात आढळतात. वैखानसागमात यानक नरसिंह शेषाच्या मांडीवर बसलेला आणि शेषाचे पाच फणे त्याच्या डोक्यावर असलेला चार, आठ वा सोळा हातांचा असा दाखवावा असे म्हटले आहे (खरे १९३९, पृ.४३).

योग नरसिंहाच्या मूर्ती इसवीच्या नवव्या-दहाव्या शतकाच्या आधीच्या अजून तरी आढळत नाहीत. शेळगांव जि.नांदेड आणि कर्नाटकातील हलेबिडू येथे अशा मूर्ती आहेत. दोन्हीही उत्कटिकासनात बसलेल्या व गुडघ्याभोंवती योगपट्ट गुंडाळलेल्या अशा आहेत. शेळगाव येथील चतुर्भुजमूर्तीच्या उजव्या बाजूस अंजलीमुद्रेत गरुड उभा आहे आणि पाठीमागे आहे मकर तोरण. याच्या मध्यात योग नरसिंहाच्या माथ्यावरच्या भागावर कीर्तिमुख आहे आणि त्याचे दोन्ही अंगास पाच, पाच अवतार कोरलेले आहेत. हंपी येथील विठ्ठल मंदिराच्या नरसिंह मंडपात प्रत्येक खांबावर एक अशा अनेक प्रकारच्या नरसिंहमूर्ती आहेत. पण विशेष म्हणजे एका खांबावरील योग नरसिंह लक्ष्मीसह वर्तमान आहे. हा अपवादच म्हणावा लागेल.

प्रारंभी दर्शविल्याप्रमाणे नरसिंह हा एकच अवतार असा आहे की तो अवतार नसून प्रत्यक्ष विष्णूच आहे असे दाखवण्यासाठी किंवा नरसिंहाचे महत्त्व ठसविण्यासाठी त्याचे समवेत लक्ष्मी दाखविलेली असते. मूर्तिशास्त्रात हिला लक्ष्मी-नृसिंह (नरसिंह) ही संज्ञा आहे.



**वामन :**

विष्णूच्या त्रिविक्रम-रूपाची पुसटशी कल्पना ऋग्वेदातील ऋचेवरून येते खरी पण इसवीच्या पाच-सहाव्या शतकापर्यंत तशा मूर्तीच्या घडणीची वाट आपणास पहावी लागते. या अवताराचे मूर्तिशास्त्राच्या दृष्टीने महत्त्व आहे ते याच्या वामन आणि त्रिविक्रम अशा दोन रूपांतील मूर्तींमुळे. शतपथ ब्राह्मणातील या संबंधीच्या कथेकडे आपले लक्ष वेधले जाते. देव आणि दानवात साऱ्या विश्वावरील स्वामित्वासाठी झालेल्या युद्धाचे अंती असे ठरले की देवादिकांत सगळ्यात ठेंगेला असलेल्या विष्णुमुळे जेवढे विश्व व्यापले जाईल तेवढे असुरांनी देवांना द्यावे. साक्षात यज्ञ समान असलेला विष्णू जेव्हा पहुडला तेव्हा सर्व विश्व व्यापले गेले आणि सहाजिकच आधी ठरल्याप्रमाणे असुरांनी ते देवांना दिले (१.२,५). पुढे पुराणांनी व इतर ग्रंथानी या कथेचा विस्तार केला. ती अधिक परिणामकारक व्हावी म्हणून तीत विरोचनाचा मुलगा, म्हणजेच भक्त प्रल्हादाचा नातू बळी, बुटका ब्रह्मचारी वामन, दैत्यांचा आध्यात्मिक गुरू शुक्र यांचा समावेश करण्यात आला. या नव्याने विस्तारलेल्या कथेप्रमाणे वामनाने बळी राजाकडे तीन पावलांनी व्यापली जाईल एवढ्याच भूमीचे दान मागितले. दातृत्वात अग्रेसर असलेल्या बळीने ते मान्य केले. झाले, बटू वामनाचे रूपांतर प्रचंडकाय त्रिविक्रमात झाले. लगेच त्रिविक्रमाने दोन पावलात सर्व विश्व व्यापले व तिसरे पाऊल बळीच्या संमतीने त्याचे डोक्यावर ठेवले, परिणामत: तो पाताळात डांबला गेला.

मूर्तिशास्त्रात वामन व त्रिविक्रम या दोन्ही प्रकारच्या मूर्तीसंबंधीची वर्णने येतात. इसवीच्या ५ व्या-६ व्या शतकापासून या मिळायला लागतात. मत्स्यपुराणाने (२५९.३७,पृ.७२४) सांगितले की त्रिविक्रमाच्या पायाखाली बळी दाखवावा व पुढे बटूला (वामनाला) शिल्पांकित करावे. वामनाच्या स्वतंत्र प्रतिमाही आढळतात. ठेंगेला, आखुड मांड्यांचा, ढेरपोट्या, दोन हातांपैकी एकात माळ वा छत्र व दुसऱ्यात कमंडलू घेतलेला, जानवे धारण केलेला असे त्याचे रूप असते.क्वचित चतुर्भुज असतो. उदाहरणार्थ अशुतोष संग्रहालय, कलकत्ता येथील मूर्ती. याच्या आधीच्या प्रतिमा अलाहाबाद संग्रहालयात, वाराणसीच्या भरतकला भवन येथे आहेत तर नंतरच्या वेरूळ, धर्मपुरी (जि.बीड) इत्यादी ठिकाणी आहेत.

त्रिविक्रमाच्या मूर्ती मात्र चतुर्भुज वा अष्टभुज असतात. एवढेच नव्हे तर त्याची देवळेही आहेत. रामटेक (जि.नागपूर) व तेर (जि.लातूर) येथे ती आहेत आणि

त्यातील त्रिविक्रमाच्या प्रतिमा विराटरूप आहेत. दोन्ही मंदिरे पांच-सहाव्या शतकाची होती. पैकी तेर येथील मंदिर त्रिविक्रम मंदिर म्हणूनच प्रसिध्द आहे. ते विटांनी बांधलेले आहे.

बळीराजाने दानोदक वामनाच्या हातावर देताच त्रिविक्रमाच्या रूपात त्याने एक पाय आकाशाकडे उचललेला दिसतो. कालिदास या पायाला 'तीर्थगायामशोभिपाद:' असे म्हणतो (पूर्व मेघ.६१). हे पाऊल एका राक्षसी तोंडाला जाऊन भिडते. या तोंडासंबंधी विष्णुधर्मोत्तर, वराह, कूर्म इत्यादी पुराणांत व महाभारतात मतभिन्नता असली तरी मथितार्थाने याला ब्रह्माण्ड कपाल मानता येईल. वैखानसागमात त्रिविक्रमाचे फार सविस्तर वर्णन आले आहे. तेथे परिवारासंबंधीच्या माहितीत चामरधारी वायू आणि वरुण; सूर्य-चंद्र (विश्वव्यापी रूप दर्शक), सनक व सनत्कुमार, ब्रह्मा, गंगा, नमूची व इतर दैत्य, ढोल वाजवणारा जांबवान, गरुड, बळी व त्याची पत्नी विन्ध्यवली इत्यादींचा उल्लेख येतो. वेरूळ येथील दशावतार लेणीतील वामन-त्रिविक्रमाचे शिल्पांकन याचे उत्तम उदाहरण म्हणून देता येईल. अष्टभुज त्रिविक्रमाने चक्र, पद्म, गदा व खड्ग उजव्या हातात तर डाव्या हातात शंख, धनुष्य, खेटक धरले असून वरचा डावा हात तर्जनी मुद्रेत आहे. (याचा उचललेला पाय राहू मुखाजवळ असतो [बॅनर्जी,१९८५.४१९ ] त्याच्याकडे अंगुलिनिर्देश करणारी ही मुद्रा). या पायाचे पुढ्यात द्विभुज, छत्रधारी वामन आहे. समोरच राजा बळी दानोदक सोडण्यासाठी झारी घेऊन उभा आहे. त्याचे पाठीशी पत्नी विंध्यावली आहे. आणि शेजारी वेष्टी गुंडाळलेले, दाढी व जटाधारी गुरू शुक्राचार्य आहेत. बळी राजाने दान देण्यात असलेल्या धोक्याची सूचना ते देतात. वामनाच्या मागच्या बाजूस दैत्य नमूचि वामनावर हल्ला करण्यासाठी झेप घेण्याच्या तयारीत असताना गरूड त्याला अडवीत असल्याचे दिसते. कैलासातील दक्षिण ओवरीतील षड्भुज त्रिविक्रम दुर्मिळच म्हणावा लागेल. धर्मापुरी (जि.बीड) येथील केदारेश्वर मंदिराच्या मंडोवरावर (बाह्यभिंतीवर) वामन, बळीराजा आणि शुक्राचार्य यांचे फार प्रत्ययकारी उत्तम शिल्प आहे.

**परशुराम :**

या पुढील तीन अवतार म्हणजे परशुराम, राम, कृष्ण वा बलराम यांचे होत. परशुराम हा श्रीविष्णूचा सहावा अवतार. ऋषी जमदग्नी व राजकन्या रेणुका यांचा हा मुलगा. धनुर्वेद व परशू चालवण्यात हा निष्णात असून क्षत्रियांच्या भयंकर विरोधात



होता. याने एकवीस वेळा पृथ्वी नि:क्षत्रीय केली असे म्हणतात. यानेच कोंकण वसविले असेही मानतात. हा भार्गवराम म्हणूनही प्रसिद्ध असून याची देवळे पश्चिम किनारपट्टीच्या प्रदेशात अनेक ठिकाणी आहेत. हा नेहमीच द्विभुज दाखविलेला असतो. याचे एका हातात परशू असतोच. ग्रंथान्तरी चतुर्भुज परशुरामाचे वर्णन आढळते हे खरे पण अशा मूर्ती मात्र फारच दुर्मिळ आहेत. ढाक्यातील (बांगला देश) राणीहटी येथील चतुर्भुजमूर्तीचे या दृष्टीने फार महत्त्व आहे. तिच्या उजव्या खालच्या हाती परशू असून इतर हातात शंख, चक्र व गदा आहे. अग्निपुराणातील परशुरामाचे हातीं धनुष्य, बाण, तलवार व परशू आहे (अध्याय ४९, ५.५). उत्तर भारतात मात्र याच्या स्वतंत्र प्रतिमा दुर्मिळच होत. ग्वाल्हेर जवळ प्राप्त झालेली परशुधारी द्विभुज प्रतिमा (जोशी,१९७९.७० तळटीप ८१) व गुजरात मधील तिम्बा गावची एक प्रतिमा या संदर्भात उल्लेखिता येईल. एरवी तो दशावतारपट्टातच आढळतो. विष्णुधर्मोत्तर पुराण याचे वर्णन करते (३.८५.६१-६२). परशुरामाला अंशावतार (नैमित्तिक) मानतात. चिपळुण जि.रत्नागिरी येथे परशुरामाचे स्वतंत्र मंदिर आहे, पण ते अर्वाचीन आहे.

रामावतारानंतर परशुराम अवतार मागे पडला, कारण तो पूर्णावतार नव्हता. जमदग्नी शीघ्रकोपी म्हणून प्रसिद्ध. एकदा पत्नी पूजेसाठी पाणी आणण्यास गेली असता परतण्यास विलंब झाल्याचे निमित्त झाले आणि क्रोधदग्ध झालेल्या ऋषीने आपल्या मुलांना तिचे मस्तक उडविण्यास सांगितले. परशुरामाशिवाय कोणी तयार झाले नाही. परशुरामाने मातृहत्येचे पाप केले खरे, पण पित्याशी तो एकनिष्ठ राहिला. रेणुकामाता पुन्हा जिवंत झाली, अशा प्रकारची कथा पुराणात येते. छिन्नमस्तक रेणुका म्हणजेच शिल्पांकित लज्जागौरी असेही मानले जाते.

**रामावतार :**

राम हा भारतीय मनात मोठ्या मानाचे स्थान असलेला अवतार आहे. सदासर्वकाळ आणि सार्वदेशिक लोकप्रिय असलेला राम आदर्शपुरुष म्हणून मानला गेला आहे. रामायणाच्या प्राचीनतेबद्दल संदेह नसला तरी रामाच्या मूर्ती व उपासना तितकी प्राचीन असल्याचे दिसत नाही. गुप्तकाळात म्हणजे इसवीच्या पांचव्या-सहाव्या शतकात देवगढ, भीतरगांव, पवनी (जि.वर्धा) इत्यादी ठिकाणीं मंदिरांच्या कांही भागावर रामकथादृश्ये प्रथमच शिल्पांकित केली गेली. आणि नंतर ती श्रृंगवेरपूर, नचना, श्रावस्ती, पटना तसेंच बदामी, पट्टदकल येथील देवळावर, वेरूळ लेणीत आणि मार्कण्डी इत्यादी

ठिकाणच्या मंदिरावर कोरली गेली.बृहत्संहिता व विष्णुधर्मोत्तर पुराण या दोन्ही ग्रंथात रामाची मूर्ती घडविण्याविषयीची माहिती मिळते खरी पण स्वतंत्र प्रतिमा इसवीच्या नवव्या-दहाव्या शतकातच घडविली गेली असावी. अर्थात मंदिरेही त्याच काळची असणार.

राममूर्ती द्विभुज वा चतुर्भुज असते. धनुष्य-बाण ही आयुधे तर रामाची व्यवच्छेदक लक्षणे होत. शिवाय काही ठिकाणी शंख, चक्रही त्याच्या हाती असतात. रामपंचायतन म्हणजे राम-सीता, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न नि मारूति यांच्या समूहमूर्ती मध्यकाळात अनेक मंदिरातून प्रतिष्ठापित केले गेले.

रामकथा दृश्यांची थोडक्यात माहिती घेणे येथे उचित होईल.

देवगढ (म.प्र.) येथील मंदिराच्या बाह्यांगावर - तेही पीठ भागावर, वनवासासाठी प्रयाण, अहल्योद्धार, अत्रिऋषीच्या आश्रमात वास्तव्य, पंचवटीत शूर्पणखेची दुर्गती, सीताहरण, वाली-सुग्रीव लढाई, अशोकवनात सीता, संजीवनीचा शोध इत्यादी रामायणातील प्रसंग शिल्पांकित केले आहेत. अशीच काही दृश्ये नचना (म.प्र.) येथेही आहेत, मात्र ती मृद्फलकावर कोरलेली आहेत. तर वाराणसी येथील भरतकलाभवन मध्ये सेतुबंधाचे दृश्य मांडलेले आढळते. या शिवाय श्रृंगवेरपुर, श्रावस्ती, बिहारमधील चौसा व अफसाद, पटना व लखनौ वस्तुसंग्रहालये येथेही ती आहेत. पण अवर्जून पहावेत असे प्रसंगच नव्हे तर साक्षात संक्षिप्त रामायणच वेरूळच्या कैलास लेणीत दक्षिण भागावर शिल्पांकित केलेले आहे. संक्षिप्त रामायण असे आहे.

आदौ राम तपोवनादि गमनं हत्वा मृगं काञ्चनम् ।
वैदेही हरणं जटायुमरणं सुग्रीव संभाषणम् ।
वालीनिर्दनलं समुद्रतरणं लंकापुरिदाहनम् ।
पश्चात् रावणकुंभकर्ण हननं एतद्भि रामायणम् ॥

कैलास मधील रामायणाचे शिल्पांकन एकूण आठ पट्टिकेत केलेले आहे. त्यातून वरील प्रसंगांना धरून आणखीही काहींचा समावेश आहे. या सर्वावरून असे म्हणता येईल की इसवीच्या आठव्या-नवव्या शतकापर्यंत रामकथा लोकप्रिय होती, मात्र स्वतंत्र देवता म्हणून रामाची मंदिरातून स्थापना झाली नव्हती. त्यासाठी अजून दोन-तीनशे वर्षांचा अवधी होता.



**कृष्ण :**

भारतीय संस्कृतीची एक अमूल्य देणगी म्हणून कृष्णावताराकडे पहायला हवे. हा आठवा अवतार, पूर्णावतार आहे. कृष्णजन्म मथुरेतला, येथेच त्याने बालवयातच दुष्ट कंसाला ठार मारले आणि पराक्रमाची चुणूक दाखवली. गोकुळात बालक्रीडेच्या निमित्ताने सवंगडी जमवले, मायावी रूपातील अनेक राक्षसांचा नि:पात केला. हे लक्षात घेता या व्रजक्षेत्रातील उपासनेच्या दृष्टीने त्याचे वाढलेले माहात्म्य कळते.

मौज म्हणजे कृष्णाचे सर्वात आधीचे रेखांकन पहायला मिळते ते भारतीय-ग्रीक (इंडो-ग्रीक) राजा अगॅथोल्कियस याच्या नाण्यावर. अशी सहा नाणी ऐखनूम येथून उपलब्ध झाली. या नाण्यावर एका बाजूस श्रीकृष्ण व दुसऱ्या बाजूस बलराम यांच्या प्रतिमा आहेत. त्यांच्या डोक्यावर छत्र, माथी मुकुट, खांद्यांवर उपरणे, कानात कुण्डले, हातांत गदा व मुसळ आहे (जोशी.७१,तळटीप ९१). शिवाय दोघांच्याही कमरेस लटकत्या तलवारी आहेत.

एका दृष्टीने रामकथेतील प्रसंगापेक्षा कृष्णजीवनावरील प्रसंगांचे शिल्पांकन अधिक प्राचीन आहे असे म्हणावे लागते. कुषाणकाळापूर्वीपासूनची अशी दृश्ये आढळतात. उदाहरणार्थ नवजात बाळकृष्णाला डोक्यावर घेऊन वसुदेवाचे यमुना ओलांडणे (मथुरा संग्रहालय), घोड्याच्या रूपातील केशी या दैत्याशी कृष्णाची झुंज (मथुरा संग्रहालय, ओसिया येथील मंदिरे व भांदक किल्ला येथे ) गोवर्धनधारी कृष्ण (राजस्थान व वेरूळ लेणी ) तसेच बलराम-एकानंशा-कृष्ण यांचे शिल्पांकन,वेरूळ. याचा अर्थ असा नव्हे की कृष्णाच्या स्वतंत्र प्रतिमा या काळात उपलब्ध नव्हत्या. काहींचे म्हणणे तसे असले तरी त्यात तर्कशुद्धता व वस्तुस्थिती दर्शन नाही. मात्र येथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे, ती म्हणजे कृष्णाचे रांगत्या बाळकृष्णाचे रूप आणि मुरलीधर कृष्ण या दोन्ही प्रतिमा स्वतंत्र असल्या तरी त्या मध्यकाळातील होत. मध्ययुगातच श्रीकृष्णाच्या मुरलीधराच्या रूपातील मूर्तीची देवळे उभारली गेली. पुतनावध, बकवध, शकटासुरवध, केशीवध, कंसवध, कालियमर्दन, गोवर्धनोद्धारण, यमलार्जुनमुक्ती इत्यादी कृष्ण जीवनातील प्रसंग अनेक ठिकाणी देवळाच्या अंगोपांगावर कोरलेले आढळतात. कृष्णाला नायक-देव (हिरोगॉड) असे संबोधता येईल पण त्याची गणना देवतेत व्हायला फारसा काळ लागला नाही. महाभारताच्या कालातच विष्णूला परमेश्वराचे स्थान प्राप्त झाले होते व वासुदेव (= कृष्ण) व विष्णू हे एकच मानले जात

होते. धर्मराजाने (शांतिपर्व) स्तुती करताना कृष्ण-विष्णू हे एकच असल्याचे मानले होते.

दक्षिण भारतात एक श्रीकृष्ण-राधेची अनोखी अर्धनारीश्वर रूपातील प्रतिमा उपलब्ध झाली आहे. येथे श्रीकृष्ण मुरलीधर दाखवलेला आहे, याची नोंद घेतली पाहिजे.

**बलराम :**

याला काही वेळा विष्णूचा आठवा अवतार म्हणून कृष्णाचे जागी मानतात. श्रीकृष्णाचा मोठा भाऊ व शेषाचा अवतार अशी त्याला मान्यता आहे. इसवीपूर्व दुसऱ्या शतकापासून याचे पूजन चालू होते. मागे कृष्णावतारासंबंधी विवेचन करताना अगॅथोक्लिअस या ग्रीक राजाच्या नाण्यावर कृष्णासमवेतच याचे अंकन झाल्याचा उल्लेख आला आहेच.

बलराम सामान्यत: द्विभुज दाखवला जातो. त्याच्या हातांत लांगल (नांगर) व गदा असते आणि डोक्यावर नागफणा असतो. कुषाणकाळात त्याच्या एका हातात मद्याचा प्याला आढळतो. क्वचित उजवा हात अभयमुद्रेत व डाव्या हातीं नांगर घेतलेला बलरामही आढळतो. पांचरात्राप्रमाणे संकर्षण या नावे त्याची चतुर्व्यूहात गणना होते. गुप्तकाळातील बलरामाच्या चतुर्भुज प्रतिमात याचे हातीं सिंहांकित नांगर (संवर्तक) व गदा किंवा मुसळ (सौनंद) दिसू लागते. एक हात अभयमुद्रेत व दुसरा मद्याचा प्याला धरून असतो. डोकीवर शेषफणा असतो. अशी एक प्रतिमा लोणार येथील दैत्यसूदनाच्या भिंतीवर आहे. क्वचित पत्नी रेवती याच्या समवेत असते. श्रीकृष्ण व बहीण एकानंशा (सुभद्रा) ह्यांचेसह हा असतो. (जगन्नाथपुरी येथील प्रसिद्ध मंदिरात या त्रयींच्या मूर्ती आहेत). असे शिल्पांकन इसवीच्या नवव्या शतकात वेरूळ येथील लेणी क्र.२७ मध्येही आढळते.

गुप्तकाळानंतर बलरामाच्या प्रतिमांची संख्या रोडावली. तो दहा-अकराव्या शतकात वैकुंठ मूर्तीचा एक भाग म्हणून संकर्षणाच्या रूपात आढळतो. तर त्या नंतरच्या काळात मंदिरांच्या बाह्यभिंतीवर एकटा वा रेवतीसह क्वचित शिल्पांकित केलेला दिसतो. दशावतार पट्टात कृष्णाचे जागी क्वचित तो आढळतो. चतुर्व्युहातील संकर्षण नि चतुर्विंशति मधील संकर्षण यांत भेद आहे.

बलरामाची लीलाशिल्पे थोड्या प्रमाणातच आढळतात. उत्तर प्रदेशातील चन्दौसी येथे एका मृद्फलकावर तो प्रलंबासुराशी लढताना दाखविले आहे तर सिरपूरला



(मध्यप्रदेश) तो सूत लोमहर्षणाचा वध करताना दिसतो. मांढळ (महाराष्ट्र) व पवनार (जि.वर्धा) येथे त्याला धेनुकासुराचा वध करताना दाखविले आहे. पवनार येथील त्याचे शिल्पांकन फार सुरेख आहे. ही शिल्पांकने वाकाटक काळातील म्हणजे इसवीच्या चौथ्या-पाचव्या शतकातील आहेत. पवनार येथेच त्याचे मुष्टिकाशी मल्लयुद्ध दाखविले आहे.

**बुद्ध :**

गौतमबुद्धाने एक नवा संप्रदाय प्रवर्तित केलेला आहे. त्याने जनकल्याणासाठी चार सत्ये आणि अष्टांगिकमार्ग सांगितला. त्याचे हे कार्य कर्मकांडाचा अतिरेक आणि यज्ञातील पशुहिंसा यांना छेद देणारे ठरले. त्याने धार्मिक आचार-विचारात परिवर्तन घडवून आणण्याचे महान कार्य केले. हे सारे लक्षात घेऊनच त्याला अवतार मानलेले आहे. दशावतारपट्टात हा नववा अवतार मानला जातो. हे स्थान प्राप्त होण्यास इसवीचे सातवे ते दहावे शतक एवढा काळ लोटावा लागला.

दशावतारपट्टात सर्वांगसुंदर असे शिल्पांकन पूर्वभारतातल्या प्रमाणे इतरत्र आढळत नाही. पद्मासनात बसलेल्या बुद्धाचे दोन्ही हात ध्यानमुद्रेत मांडीवर एकत्र ठेवलेले असतात. बीड येथील कंकालेश्वर मंदिराच्या बाह्यभिंतीवरच्या खालच्या अधिष्ठान भागावर प्रत्येकास स्वतंत्र असा शिल्पपट देऊन दशावतार कोरलेले आहेत. येथे बुद्धाची प्रतिमा स्वतंत्र चौकटीत ध्यानमुद्रेत पद्मासनात आढळते.

**कल्की :**

विष्णूचा दहावा अवतार म्हणून मान्यता असली तरी तो अजून व्हायचा आहे. मात्र इतिहासकारांच्या मते हा सहाव्या शतकात मालव्याच्या यशोधर्म राजाच्या रूपाने होऊन गेला. म्लेंच्छमर्दन व वर्णसंकराला अटकाव हे कल्की अवताराचे प्रयोजन पुराणांनी मानले आहे. इतिहासकारांनी त्याचे श्रेय यशोधर्माला दिले आहे. त्याने नृशंस, नरभक्षक हूणांच्या आक्रमणाला अटकाव केला व त्यांचा अधिपती मिहिरकुल याला शरण आणले असा इतिहास आहे.

अग्निपुराणात कल्कीच्या मूर्तीचे वर्णन दिले आहे. त्या संबंधी श्री.महादेवशास्त्री खालील माहिती देतात.

खड्गोद्यतकर: क्रुद्धो हयारूढो महाबल: ।<br>
म्लेंच्छोच्छेदकर: कल्की द्विभुज: परिकीर्तित: ।।

(अर्थ : उगारलेला उजवा खड्गधारी हात, संतापलेला, अश्वारूढ महाबल, म्लेंच्छाचा उच्छेद करणारा, द्विभुज असा असावा कल्की.(जोशी १९८०.७५) असेच वर्णन विष्णुधर्मोत्तर पुराणातही आहे. तसेच ते चतुर्वर्ग चिंतामणीतही येते (२.११९) दशावतारपट्टात दहाव्या क्रमांकावर याची अश्वारूढ प्रतिमा कोरलेली असते.

वरील दशावताराशिवाय आणखी कांही अवतारांचा विचार करता येईल मात्र ध्यानात हे ठेवायचे की त्या सर्वांच्या मूर्ती उपलब्ध असतीलच असे नाही. वाङ्मयात मात्र त्यांचे उल्लेख, माहिती व त्यांचे संबंधीच्या कथा आहेत.

**ऋषभ :**

श्रीमद्भागवताच्या पंचम स्कंधात ऋषभदेवाबद्दलची कथा आली आहे. हा नाभि राजा व मेरुदेवी यांचा मुलगा. ऋषभदेव स्वत: समदृष्टी, रागलोभरहित, सर्वांच्या हिताविषयी तत्पर आणि सर्वावर दया करणारे होते. लोकांना स्वेच्छाचारापासून परावृत्त करून शास्त्राचाराकडे त्यांनी वळविले. कै.ग.ह.खरे म्हणतात बुद्धाप्रमाणेच जैनांचा आदि तीर्थंकर ऋषभदेव याचा अवतारात समावेश करण्याचा हा प्रयत्न असावा.

मूर्तिशास्त्र : ऋषभदेवाचे लांछन बैल आहे. त्यांचा यक्ष आहे गोमुख. त्याचे वाहन बैल किंवा हत्ती असून त्याच्या चक्रेश्वरी यक्षीचे वाहन गरूड आहे. ऋषभदेवास अवतार मानले असले तरी त्यांच्या प्रतिमा जैन मूर्तिशास्त्राप्रमाणे असतात. वैष्णव संप्रदायात त्या सहसा आढळत नाहीत.

**नर-नारायण**


देवगढ (म.प्र.) येथील मंदिराच्या बाह्यभिंतीवर नर-नारायणाची एक उत्तम प्रतिमा आहे. बद्रिकाश्रमातील झाडाखाली हे दोघे तप करीत बसले आहेत. यातील नारायण म्हणजे अर्थातच विष्णू चार हातांचा आहे, तर नर म्हणजे अर्जुन अर्थातच दोन हातांचा आहे. यांचे पायाजवळ हरिण व सिंह आहे. या तपस्व्यांनी षड्रिपूवर ताबा मिळवल्याचे हे द्योतक असावे.

नर-नारायण म्हणजे ऋग्वेदकालीन इन्द्र व विष्णूच होत असे मानले जाते. पुढे पाणिनीच्या काळात म्हणजे इसवीपूर्व आठव्या शतकात हीच जोडी वासुदेवार्जुन म्हणून संबोधिली गेली. नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम्' असा महाभारतात वंदनपर श्लोक आहे. ही नर-नारायणाची गुप्तकालीन प्रतिमा दुर्मिळच आहे असे दिसते.






अनंत



श्रीविष्णु





विष्णु - मौनव्रतिन




नर-नारायण




वामन



मत्स्यावतार




यज्ञवराह



शेषशायी



धन्वन्तरी



श्रीनिवास




कूर्मावतार




स्थोण नरसिंह



विदरण नरसिंह



अनंतासनी विष्णू



श्रीविठ्ठल

**कपिल :**

याचा अवतार म्हणून गीतेत आणि भागवतात उल्लेख येतो. 'सिद्धानां कपिलो मुनिः (अहं)' असा गीतेतील (१०.२६) उल्लेख तो तपस्वी व सिद्ध असल्याचे दर्शवितो. पाताळात तप करीत बसला असता सगरपुत्रांनी त्याला त्रास दिला होता. आणि त्याच्या क्रोधपूर्ण दृष्टिक्षेपामुळे ते दग्ध झाले. येथे दुष्टनिर्दालनामुळे त्याला अवतारत्व मिळालेले दिसते. भागवतात मात्र सांख्य दर्शनाचा प्रणेता म्हणून त्याला अवतार मानले आहे. मात्र प्रणेता म्हणून अवतार ठरवता येईल का, असा प्रश्न पडतो. विष्णुधर्मोत्तर पुराणात याला चार हात सांगितलेत, पैकी योगमुद्रेतल्या दोन हातांमध्ये घट असावा व अन्य दोन हातांत शंख व चक्र असावे असे म्हटले आहे. जटामुकुट, मृगाजिन, दाढी, जानवे व ध्यानमग्नता अशी अन्य लक्षणे. वैखानसागमाने मात्र आठ हात व त्यांत चक्र, तलवार, नांगर, शंख, पाश, दंड असावा नि एक अभय मुद्रेत नि उरलेला कट्यवलंबित (कटिवर ठेवलेला) असावा असे वर्णन केले आहे (खरे १९३९.३६).

**दत्तात्रेय :**

हा खरे तर केवळ विष्णूचा अवतार नाही. ह्यात ब्रह्मा व शिव यांचाही संबंध मानला जातो. पंथोपपंथात सामंजस्य निर्माण व्हावे म्हणून अशा संमिश्रमूर्ती घडवीत असत. असे असले तरी प्राचीन काळात या देवतेचा उद्‌भव झालेला नव्हता असे दिसते. या देवा संबंधीच्या कथाही सर्वसामान्यांना फारशा अवगत नाहीत. पैकी एक कथा अशी की कौशिक ऋषीस मांडव्याने सूर्योदयापूर्वी मरण येईल असा शाप दिला असता ऋषीच्या पत्नीच्या पातिव्रत्याच्या प्रभावामुळे सूर्य उगवायचाच राहिला. देव त्रस्त झाले, तेव्हा ब्रह्माविष्णुमहेश यांनी अत्रिपत्नी अनसूयेकडून तिला प्रसन्न करविले, कौशिकास जिवंत ठेवून सूर्योदय करविला. अनसूयेच्या पोटी या तीन देवांनी दत्तात्रेयाच्या रूपात जन्म घेतला. अशा प्रकारची कथा मार्कण्डेयपुराणात (अध्याय१६-१८) आल्याचे कै.खरे सांगतात(१९३९,३८). याशिवाय एक कथा अशी की अत्रिऋर्षींनी पुत्रप्राप्तीसाठी तप केले, तेव्हा या देवत्रयींनी अनसूयेच्या पोटी जन्म घेतला. दोन्ही ठिकाणी विष्णूच्या अंशाचा पुत्र तोच दत्तात्रेय आहे.

महाराष्ट्रीय परंपरेप्रमाणे या तीन देवांना एकत्र दाखविले की दत्तात्रेयाचे रूप होते. अत्रिऋषीची पत्नी अनसूया हिच्या पातिव्रत्याची परीक्षा घेण्यासाठी सावित्री, लक्ष्मी व पार्वती यांनी या तीन देवास तिच्या आश्रमात पाठविले. मात्र तिच्या तेजामुळे

यांना तान्ही बाळे होऊन राहावे लागले. पुढे अत्रिऋषींनी त्यांची मूळरूपे त्यांना दिली. तिघे एकत्र रूपाने आश्रमात राहू लागले. यालाच आत्रेयदत्त म्हणून ओळखले जाते. (जोशी,१९७९.३०६)

रूपकात्मक कथेवरून दत्तात्रेयाचे रूप कल्पिले गेले असावे असे वाटते. 'अत्रि' म्हणजे सत्त्व, रज, तम या गुणांचे शिवाय म्हणजे त्रिगुणरहित तो 'अत्रि'. सहाजिकच अशा ऋषीची पत्नी असूयारहित असणार म्हणून ती अनसूया. स्त्री असूया रहित कशी असू शकते याचे नवल वाटल्यामुळे सावित्री, लक्ष्मी व पार्वती यांनी पतिराजांना तिच्या परीक्षेसाठी पाठविले. ते बाळं होऊन म्हणजेच निर्व्याज, निरागस होऊन आश्रमात राहिले. त्रिगुणाशिवाय विश्वसंचार कसा चालणार? तेव्हां तिघींनी विनंती केल्यावर ते देव मूळ रूपात आले. ब्रह्मा सोम म्हणजे चंद्र होऊन आकाशात, शिव दुर्वास म्हणून दुरावला. विष्णू तेवढा दत्त म्हणून राहिला. म्हणून तो मध्यात पूर्ण रूपात आणि आजूबाजूस ब्रह्मा व महेश मुखाचे रूपात. हा दत्तात्रेय. याला तीन मुखे व सहा हात असतात. त्यांत शंख, चक्र, गदा, पद्म, अक्षमाला, कमंडलू इत्यादी असतात.

दत्तात्रेय हा अवतार प्राचीन काळी अवगत नसल्यामुळे त्याच्या मूर्ती संबंधीची माहिती मूर्तिशास्त्रावरील ग्रंथात आढळत नाही. तरी मत्स्यपुराण, अग्निपुराण, वायुपुराण, श्रीतत्त्वनिधी, विष्णुधर्मोत्तर आणि भागवतपुराणामध्ये याची माहिती येते हे खरे. पण सर्वत्र माहिती त्रोटक व अपूर्ण आहे. शिवाय अर्वाचीन काळातील एकाही मूर्तीला ती लागू पडत नाही.

कै.गोपीनाथरावांच्या मते ब्रह्माविष्णुमहेश एकमेकाच्या संगतीने वा एकत्र असल्यास ती दत्तात्रेयमूर्ती होय. तर दुसरा प्रकार म्हणून बदामी येथील योगासनी विष्णुमूर्तीकडे पहाता येईल.हिच्या वरच्या दोन हातांत चक्र व शंख असून खालील दोन हात मांडीवर एकावर एक उताणे ठेवले आहेत. त्यातही वरचा आहे तो व्याख्यान मुद्रेत. विशेष म्हणजे बैठकीवर गरुड, नंदी नि हंस कोरलेले आहेत. शिवाय या मूर्तीच्या प्रभावळीवर मत्स्यकूर्मादी दशावतार कोरले आहेत (गोपीनाथराव खंड १, २५४; खरे, १९३९,३९). ही अगदी प्रारंभीची दत्तात्रेयाची प्रतिमा म्हणता येईल. कै.खरे यांचे मते गरुड मध्यभागी कोरावयास हवा होता. अर्वाचीन काळातील दत्तमूर्ती त्रिमुखी, जटाधारी, चार वा सहा हातांची, त्यात त्रिशूल, चक्र, शंख, गदा, कमंडलू, डमरू, अक्षमाला धरलेली, गाईला टेकून उभी असलेली व कुत्र्यांच्या रूपातील चार वेदांसमवेत असलेली



अशी असते. यातील गाय ही पृथ्वीची प्रतिनिधी मानली जाते. कांही दत्तभक्त एकमुखी पण चतुर्भुज, तर कांही एकमुखी पण षड्भुज मूर्तीची पूजा करतात. दत्तात्रेयाची मूर्ती इसवीच्या एक हजारवर्षानंतरचीच संभवते.

**धन्वन्तरी :**

हा विष्णूचा आणखी एक अंशावतार, हा समुद्रमंथनातून निघालेल्या चौदा रत्नांपैकी एक. याने अमृतकुंभ आणला. पण केवळ एवढ्यामुळे त्याला अवतार मानले असावे असे वाटत नाही. ब्रह्मवैवर्तपुराणातील सर्पदेवता मनसा व धन्वन्तरी यांच्या कथेनुसार धन्वन्तरी सर्पविषचिकित्साप्रवीण होता. तो वैद्यविद्यापारंगत होता. तेव्हा त्याचेपाशी अमृतघट असणे, सर्पविषावरील उतारे आणि त्याने केलेले रोगनिवारण उपाय या तिन्ही गोष्टीमुळे त्याला अवतारत्व दिले गेले असावे असा तर्क कै.खरे करतात (१९३९,४०). मत्स्यपुराण, विष्णुधर्मोत्तर, विष्णुपुराण इत्यादीतून त्याची वर्णने आढळतात.

धन्वन्तरीच्या प्रतिमा फारशा आढळत नाहीत. मात्र पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळातील एक आणि बंगलोर येथील शासकीय वस्तुसंग्रहालयातील एक अशा दोन प्रतिमा अनुक्रमे कै.खरे व डॉ.जोशी यांनी वर्णिल्या आहेत. दुर्मिळ म्हणून त्यांची माहिती घेऊ या.

पुणे येथील अर्धपर्यंकासनात बसलेल्या सालंकृत द्विभुज मूर्तीच्या डोक्यावर आधी तीन फण्यांचा व त्याखाली पंधरा फण्यांचा असे दोन नाग आहेत. हसऱ्या चेहऱ्याला दाढी आहे. डाव्या हातीं नाग आहे. उजव्या (सध्या भग्नावस्थेत) हातात बटवा आहे.

दुसरी बंगलोर येथील आहे. ही कालक्रमदृष्ट्या आधीची म्हणजे पाचव्या-सहाव्या शतकातील आहे. या चतुर्भुज मूर्तीचे हातात दक्षिणाध: करक्रमाने घट(अमृत), चक्र, गदा व शंख आहेत. याने सिंहकुंडले, आपादलम्बिनी वनमाला, यज्ञोपवित इत्यादी धारण केलेले आहे. महाभारतातील वर्णना प्रमाणे (आदिपर्व, १८.३८, पृ.८५) हा धन्वन्तरी होय.

**हयग्रीव :**

या विष्णू अवताराचे शिल्पांकन इसवीच्या दुसऱ्या शतकापासूनच होत असल्याचे आढळते. अश्वमुखी पण मानवी देहाचे रूपात हा असतो. वैदिक वाङ्मयात

याला सर्वत्र यज्ञावतार मानले आहे. त्याचे कारण अग्नी, इंद्र, यज्ञ आणि वायू यांनी मिळून आरंभिलेल्या एका सत्राचे दैवी यश एकट्या यज्ञानेच बळकावले, तेव्हांबाकीच्या तिघांनी युद्धात त्याचा शिरच्छेद केला. या कथेवर पौराणिकांनी यज्ञाचे शिर सांधताना त्या धडावर घोड्याचे डोके ठेवले असा बदल केला, हे असावे. वस्तुत: यज्ञ (वा सुयज्ञ) हा विष्णुचाच अवतार मानल्यामुळे हाही विष्णूचा अवतारच ठरावा. याची अवतार कृत्ये म्हणून दोन कथा सांगितल्या जातात. देवी भागवतात (महादेवशास्त्री, १९८०,५४) हयग्रीव असुराला मारायचे तर त्याचेच नांव धारण करणारा मारू शकेल असा याला वर मिळाल्याचे सांगितले आहे, त्यामुळे विष्णूने स्वत:च्या धडावर घोड्याचे तोंड बसवून घेऊन म्हणजेच स्वत: हयग्रीव होऊन हयग्रीव असुराला ठार मारल्याची कथा आली आहे.

महाभारत (शांतिपर्व, ३४७.१०-६३; जोशी १९७९.६९) आणि स्कंद पुराणात सांगितलेय की जग प्रलयावस्थेत असताना मधू व कैठभ या दैत्यांनी चारही वेद पळविले. ते परत मिळविण्यासाठी ब्रह्मदेवाने विष्णूला विनविले. विष्णूने हयग्रीवाच्या रूपाने सामगायनात दैत्यांना गुंतवून ठेवले व दैत्यांचे अनवधान आहे हे पाहून वेद हस्तगत केले व ब्रह्मदेवास दिले. पांचाल देशाच्या मालव नामक ऋषीने हयग्रीवाकडून वेदांचा 'क्रम' मिळवला, इत्यादी.

औंढा येथील नागनाथ मंदिराच्या पश्चिम मंडोवरावर हयग्रीवाची उभी प्रतिमा आहे. ही सालंकृत प्रतिमा चतुर्भुज आहे. हिचे हातीं क्रमाने गदा, शंख, व चक्र असून डाव्या खालच्या हातांतील वस्तू मात्र ओळखता येत नाही (बहुधा वेद). अश्वमुखी आणि वैष्णव आयुधामुळे हिला हयग्रीव म्हणून ओळखणे सहज शक्य होते. हयग्रीवाची स्थानक नि विशेष म्हणजे बैठी मूर्ती खजुराहो येथील मंदिरात आढळते.

विष्णुधर्मोत्तरामध्ये हयग्रीवास आठ हात सांगितलेत खरे पण नुग्गेहळ्ळी (कर्नाटक) येथे आयुधे मात्र भिन्न आहेत. गदा, बाण, चक्र, तलवार, शंख, ढाल, धनुष्य आणि कमळ या वस्तू येथे आहेत. विशेष म्हणजे या स्थानक मूर्तीच्या पादपीठावर 'हयग्रीव' असे कोरलेले आहे (खरे,१९३९,६०) येथीलच दुसरी प्रतिमा चतुर्भुज असून ती आसनस्थ आहे. हातीं वेद, अक्षमाला, शंख व चक्र (की फळ) आहे. हयग्रीव असे नांवही कोरले आहे.

भारतकलाभुवन, वाराणसी (क्र.४८४६) येथे मथुरेहून उपलब्ध झालेली सर्वात



प्राचीन म्हणजे इसवीच्या दुसऱ्या शतकातील चतुर्भुज हयग्रीवाची बैठी प्रतिमा आहे. हिच्या मागील हातांत गदा व चक्र असून उजवा हात पोटावर ठेवला आहे. डाव्या हातातील वस्तू ओळखता येत नाही.

हयग्रीवाच्या प्रतिमा आयुधभिन्नतेने मथुरा (५ वे-६ वे शतक) आणि 'राणी की वाव' (गुजतरात) येथेही आढळतात. विशेष म्हणजे मथुरेहूनच मिळालेली पण आता पश्चिम बर्लिन येथे असलेली प्रतिमा विष्णू-नरसिंह-वराह-हयग्रीव अशी सर्वतोभद्र प्रकारची आहे (जोशी १९७९-६९).

**मधुकैटभारी :**

हरिवंशात मधू व कैटभ यांचा नि:पात करणारा म्हणून विष्णूच्या या अवताराची नोंद आहे. हयग्रीव अवतारात या दोन असुरांकडून विष्णूने वेद मिळविले होते पण त्यांना ठार केले नव्हते. ब्रह्मदेवाने मातीचे दोन असूर तयार केले त्यांपैकी मऊ जो त्याला मधू म्हटले व जो कडक होता त्याला म्हटले कैटभ. हे वरामुळे गर्विष्ठ झाले, ब्रह्मदेवाला ते अवरेनात, तेव्हां विष्णूने त्यांना चिरडले. त्यांच्या देहातून मेद पृथ्वीवर वाहू लागला म्हणून तिला मेदिनी म्हणू लागले. महाभारतातील सभा, वन आणि शांतिपर्वातील कथेप्रमाणे विष्णूनेच यांना निर्माण केले हाते व वरही दिले होते. पण हे उन्मत्त झाल्यावर आपल्या गुडघ्यावर दडपून यांची मुंडकी त्याने चक्राने कापली होती.

महाराष्ट्रात औंढा येथील नागनाथ मंदिरावर पूर्व मंडोवरावरील वरच्या शिल्पपट्टिकेत असे शिल्पांकन आहे, मात्र तेथे फक्त उजव्या गुडघ्यावर एकाच असुराचे मुंडके चिरडले जाते आहे असे दृश्य आहे.

**करिवरद वा वरदराज :**

प्रसिद्ध आर्याकार मोरोपंत पराडकर यांची संशयरत्नमाला ज्या कथेवर आधारलेली आहे ती ही कथा पंचरत्नी गीतेत आलेली आहे. हिला गजेन्द्रमोक्षाची कथा म्हणतात. एक हत्ती विष्णूचा निस्सीम भक्त असतो. एकदा सरोवरातील मगरीने त्याचा पाय धरला व त्याला पाण्यात ओढले, तेव्हा त्याने विष्णूचा आर्त धावा केला. भक्ताला संकटमुक्त करण्यासाठी विष्णू गरुडावरून त्वरेने धावला; अशी ती कथा आहे. गजेन्द्राला सोंडेतील कमल विष्णूला अर्पण करायचे होते. येथे 'पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति (९.२६)'गीतेतील या श्लोकाची आठवण होते. 'करि' म्हणजे हत्तीला वर देणारा हा विष्णूचा अवतार म्हणून करिवरद वा वरदराज. हा भक्तांचे संकट हरण

करणारा म्हणून हरी असेही म्हणतात. बहुधा ही कथा म्हणजे रूपक होय. माया-मोहाची पकड मगरीच्या पकडी सारखी घट्ट असते, अशा वेळी 'जडजीवा तारण हरि एक' (हरिपाठ, २१.२) वा लटिका व्यवहार सर्व हा संसार । वाया येरझारा हरिवीण (हरि.२७.२) याचा आठव व्हावा.

इसवीच्या पाचव्याशतकातील अशा शिल्पात मगरी ऐवजी सर्प दिसू लागला. चेन्नईकडे चतुर्भुज विष्णूच्या वरच्या दोन हातांत चक्र व शंख नि खालचे दोन वरद व कट्यवलंबित मुद्रेत असतील तर त्याला वरदराज असे संबोधतात.

वेरूळ येथील १५ (दशावतार) व १६ (कैलास) या लेणीत या कथेतील वर्णनाप्रमाणे केलेली शिल्पांकने आहेत. पैकी दशावतार लेणीत गरुडारूढ चतुर्भुज विष्णू पुढे झेपावून गजेन्द्राला संकटमुक्त करण्यास तत्पर असल्याचे दिसते. त्याने खालच्या उजव्या हातात तलवार, वरच्या चक्र, डाव्या वरच्या शंख व खालचा डावा तर्जनी/सूची मुद्रेत धरला आहे. कलेच्या दृष्टीने ही फार देखणी प्रतिमा आहे. कैलास लेणीत करिवरदाचे शिल्पांकन रंगमंडपाच्या उत्तर भिंतीवर आहे. गजेन्द्र, मगर, कमल व नाग असलेले सरोवर व गरुडारूढ विष्णू येथे आहेत. हातांतील वस्तूमध्ये थोडी भिन्नता आहे.

इसवीच्या बारा-तेराव्या शतकातील गजेन्द्रमोक्षाच्या शिल्पांकनात थोडा बदल झालेला आढळतो. आता आधीच्या प्रमाणे गरुडाला महत्त्व नाही (हे सहाजिकच आहे) नि त्यामुळे विष्णूही आसनस्थ नाही. त्रिभंगात उभ्या विष्णूच्या पुढ्यात गजेन्द्र दाखविलेला असतो आणि विष्णूच्या हातांच्या संख्येवर बंधन नाही. ते सहाही असतात उदाहरणार्थ अन्वा (जि.औरंगाबाद) येथील प्रतिमा. धुळे येथील राजवाडे वस्तुसंग्रहालयातील प्रतिमेतील हत्तीच्या मागील पायाला मगरीने पकडल्याचे दिसते. कांची (तमिळनाडू) येथे वरदराजाचे मोठे मंदिर आहे.

**त्रैलोक्य मोहन :**

हा विष्णूचा अंशावतार होय. विद्यार्णव तंत्रात याला चतुर्भुज म्हटले आहे तर अग्निपुराणानुसार हा आठ हातांचा असायला हवा. भागवतातही याला अष्टभुज म्हटले आहे अशी प्रतिमा खजुराहो येथे आहे. त्याच्या डावीकडे पद्मधारी लक्ष्मी व उजवीकडे वीणाधारी सरस्वती असते. गरुडावर मांडी घालून बसलेल्या चतुर्भुज विष्णूस त्रैलोक्य मोहन असे काही ठिकाणी संबोधिले आहे (प्रमोद चंद्र १, चि.४२०). अपराजितपृच्छेत



(२१९.३८-४१; जोशी १९७९.१०९) वर्णन केल्याप्रमाणे वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न व कपिल ही चार तोंडे असलेली सोळा हातांची त्रैलोक्य मोहनाची बसलेली मूर्ती मेथी (जि.धुळे) येथील भद्रहारी मंदिराच्या बाह्य देवकोष्टात आहे. मात्र येथे सांगितल्यानुसार ती गरुडावर बसलेली नाही, तर प्रलंबपादासनात आहे. एरवी हिला वैकुंठाची म्हणता आली असती पण वैकुंठ सोळा हातांचा कधीच असत नाही. येथे सोळा हातांपैकी सगळ्यांत खालचे उजवा व डावा हात योगमुद्रेत आहेत. अन्य हातात कमंडलू, अभय, तलवार, ढाल इत्यादी वस्तू व मुद्रा दिसतात. बाकीचे हातांतील आयुधे तुटली आहेत.

या वर वर्णिलेल्या अवताराशिवाय अन्य कांही अवतारांची ग्रांथिक वर्णने उपलब्ध आहेत. त्यात हंस, यज्ञ, धर्म, कुमार, पृथु, व्यास, नारद इत्यादींचा समावेश करता येईल. त्यांची माहिती थोडक्यात अशी :

**हंस :**

ब्रह्मदेवाला त्याच्या सनकादिक पुत्रांनी तत्त्वज्ञानविषयक विचारलेल्या शंकांचे निरसन न करता आल्यामुळे त्याच्या इच्छेनुसार हंसाच्या रूपात प्रगट होऊन शंकानिरसन श्रीविष्णूने केले अशी माहिती स्कंद पुराणात (स्कंद ११, अ.१३) येते. विष्णुधर्मोत्तरप्रमाणे हा हंसरूपात असावा तर श्रीतत्त्वनिधीमध्ये विष्णुरूपातील शंख व चक्र धारण करणारा हा प्रियेसह असावा असे म्हटले आहे. (पहा : जोशी, १९७९; ६०)

**यज्ञ वा सुयज्ञ :**

याने लोकत्रयाचे दु:खाचा नाश केला हेच याचे अवतार कार्य होय. मात्र मनुष्यरूपातील यज्ञाचे वर्णन कोठेही आढळत नाही. मत्स्यपुराणात धर्मापासून यज्ञ उत्पन्न झाल्याचे सांगितले आहे; तर भागवतात तो रुचि आणि आकूती यांचा मुलगा होय असे सांगितले आहे.

**धर्म :**

सृष्टी उत्पन्न केल्यावर ब्रह्मदेवास तिच्या रक्षणाची चिंता लागली. तेव्हां त्याच्याच शरीरापासून वृषभ-कल्प पुरुष उत्पन्न झाला-तोंच धर्म. त्याला सृष्टीचे रक्षण करण्याची विनंती ब्रह्मदेवाने केली म्हणून धर्म यास अवतार समजतात. कै.खरे यांनी विष्णूच्या अवतारातच याची गणना केली आहे; त्याचे कारण विष्णूचे सृष्टिरक्षणाचे

कार्यच धर्माकडून अपेक्षित आहे, हे असावे,(१९३९.६२) विष्णुधर्मोत्तरपुराणात धर्माची माहिती येते पण याच्या मूर्ती कोठेही आढळत नाहीत. तेथील वर्णनावरून ते वैदिकधर्माचेच वर्णन असावे असे वाटते.

**पृथू :**

प्रजेचा छळ करणाऱ्या वेन राजास महर्षींनी ठार करून त्याचेपासूनच पृथूला निर्माण केले. कारण राजाशिवाय राज्यात अराजक माजत असते. पृथूने कृषिविद्या प्रथमच सुरू केली. याचाच अर्थ गोपालवृत्तीने राहाणाऱ्या समाजाला स्थैर्य दिले. बलसंपन्नाने राजा होण्याचा काळ संपून प्रजेतील जाणत्या व विद्वान लोकांच्या पसंतीने राजा झाल्यास तो त्रासदायक ठरत नाही, शिवाय तसा असेल तर प्रजा त्याला पदच्युत करू शकत असे, हा या कथेचा बोध. प्रजेचे अराजकापासून संरक्षण, हेच पृथूचे अवतार कार्य. केवळ विष्णुधर्मोत्तर मध्येच याचा उल्लेख येतो. तो चक्रवर्तीप्रमाणे असावा असे तेथे म्हटले आहे.

**कुमार :**

ब्रह्मदेवाच्या सनक, सनंदन, सनातन, सनत्कुमार या चारही पुत्रांनी तपस्सामर्थ्याने नष्ट झालेल्या अद्वैत मार्गाचे पुनरुज्जीवन केले, सांख्यायनास भागवत सांगितले म्हणून भागवत पुराणानुसार हा अवतार मानण्यात येतो. शिल्पग्रंथात याच्या रूपाविषयी माहिती आढळत नाही.

**व्यास :**

यांनी वेदांची व्यवस्था लावली हे महत्वाचे मानले जाते. शिवाय मत्स्यपुराण, जय व भागवतपुराण यांचे श्रेयही यांनाच दिले जाते. विष्णुधर्मोत्तरमध्ये (८५/६५) यांचे रूपाविषयीची माहिती आलीय ती अशी : पिंगटवर्ण, भरपूर जटा, कृश शरीरयष्टी आणि समवेत असावेत सुमंतु, जैमिनी, पैल व वैशंपायन हे चार शिष्य.

**नारद :**

याने सात्वत तंत्र उपदेशिले म्हणून हा अवतार होय असे भागवतात सांगितले आहे. शिल्पांमध्ये हा तुंबरूच्या समवेत दाखविला जातो. याचे हाती वीणा असते. चतुर्वर्गचिंतामणिमध्ये (२.१०९) याच्या हातात अक्षमाला आणि कमंडलू असावा व डाव्या खांद्यावर वीणा असावी असे सांगितले आहे.



**व्यंकटेश किंवा श्रीनिवास :**

याची मूर्ती स्थानकावस्थेतच असते. चतुर्भुज असते. याचा उजवा खालचा हात अभयमुद्रेत, वरच्या उजव्या व डाव्या हातात चक्र व शंख असून खालचा डावा हात कट्यवलंबित (कटिस्थित) असतो. ही **भोग** प्रकारची मूर्ती असल्यामुळे हिचा भक्तगण भारतभर पसरलेला आहे. इतकेच नव्हे तर भारताबाहेरही तो असल्यामुळे तिकडेही व्यंकटेशाची मंदिरे आहेत. याला हरिहर समजल्यामुळे वैष्णवासमवेतच शैवही ही आपलीच देवता मानतात. मात्र आयुधावरून तरी ही हरिहराची मानता येत नाही. ही बालाजी म्हणून व्यापारीलोकात खूपच प्रिय आहे. तिरूपती येथील व्यंकटेश सर्वात श्रीमंत देव म्हणून मानला जातो.

**हनुमान :**

हनुमान हा रामभक्त, वैष्णव तथा शैव सांप्रदायिकातही मान्यता पावलेला आहे. ह्याला वायुपत्रही मानतात. हा केसरी व अंजना यांचा मुलगा. रामाचा भक्त, म्हणून याला रामपंचायतनात स्थान आहे आणि तो अकरावा रूद्र म्हणून शैवपरंपरेतही महत्त्वाचा आहे. तो शक्ती आणि भक्ती या दोन्हीचेही प्रतीक आहे. याच्या मूर्ती अनेक प्रकारच्या असल्या तरी 'वीर' प्रकारच्या मूर्तीचे हे उत्तम उदाहरण आहे. समर्थ रामदासस्वामींनी महाराष्ट्राने शक्तीची उपासना करावी म्हणून ठिकठिकाणी हनुमानाच्या अकरा (मारुतीच्या) मूर्तींची स्थापना केली होती हे सर्वज्ञात आहे. जंबुमाल्याला पायाखाली चिरडून मारीत असलेल्या याच्या अनेक मूर्ती महाराष्ट्रात आढळतात. तो जेव्हां हात जोडून रामापुढे उभा वा बसलेला असतो तेव्हां त्याची ओळख दासमारुती म्हणून केली जाते. अशा मूर्ती इसवीच्या सहाव्या शतकापासून उपलब्ध होतात. अर्वाचीन काळात तर बहुधा प्रत्येक गावात मारुतीच्या मूर्तीची स्थापना झालेली आढळते. लखनौ येथील वस्तुसंग्रहालयातील (क्र.५७.८२०) इसवीच्या आठव्या शतकातील हनुमानाची मूर्ती पूजेसाठी म्हणून घडविलेली बहुधा पहिलीच मूर्ती असावी.

हनुमान जन्म-कथा दोन-चार आहेत. पैकी शिवाच्या उपासनेचे फल म्हणून कैकयीच्या हातातील पायसाचा एक भाग अंजनीस योगायोगाने प्राप्त झाला आणि त्याच्या सेवनाने पुत्रप्राप्ती झाली ही कथा सर्वाधिक लोकप्रिय आहे. तो पुत्र म्हणजेच हनुमान वा मारुती. यालाच दक्षिणभारतात अंजनेय म्हणतात. शिवपुराणे आणि भविष्यपुराणात या संबंधीच्या कथा आल्या आहेत.

हनुमानाचे शिल्पांकन कलचुरी, चन्देल, यादव व पांड्य राजकुलांच्या नाण्यांवर झाले आहे. कलचुरींच्या पृथ्वीदेव याच्या नाण्यावर तर चतुर्भुज हनुमान दाखवलेला आहे. कदंब आणि होयसळ घराण्याच्या राजमुद्रांवर हनुमान आहे. एवढेच नव्हे तर अर्काटचा मुसलमान शासक महमूद अली वजलानेही हनुमानाच्या चिन्हाचा उपयोग नाण्यावर केलेला होता. (जोशी,२००१,२१)

हनुमानाची अत्यंत लोकप्रिय मूर्ती म्हणजे उजवा हात चपेटदानमुद्रेत उगारून व डावा हात छातीवर ठेवून उभी असलेली मूर्ती. याच्या गळ्यात वनमाला आणि छातीवर श्रीवत्स चिन्ह असते. अशावेळी डाव्या पायाखाली एक राक्षस चिरडला जात असतो. क्वचित ठिकाणी कमरेला एक सुरीही खोवलेली असते.

हनुमानाच्या पायाखाली क्वचित एक राक्षसी चिरडली जात असल्याचे शिल्पांकन आढळते. समज असा की ती पनवती (पनौती म्हणजे साडेसाती) समूर्त केलेली असते आणि हनुमान तिच्यावर मात करतो आहे, तिला जखडून ठेवतो आहे (दि इंडिया मॅगेझिन,डिसेंबर १९९२,पृ.२२८). ज्यांची साडेसाती चालू असते ती मंडळी शनिवारी मारूती दर्शनास अवर्जून का जातात हे यावरून कळावे.

हनुमानाच्या स्वतंत्र मूर्ती साधारणत: इसवीच्या दहाव्या-अकराव्या शतकापासून आढळतात तर पंचमुखी हनुमानाच्या मूर्ती बऱ्याच नंतरच्या काळात घडविल्या गेल्या. या वानर (पूर्व), सिंह (दक्षिण), गरूड (पश्चिम), वराह (उत्तर) आणि उर्ध्वमुख अश्व (हयग्रीव) अशी पाच तोंडे असलेल्या हनुमानाच्या मूर्ती चतुर्भुज (गुजरातच्या तलजा या गांवी) किंवा दशभुज असतात. विद्यार्णव तंत्रात. दक्षिणेतील मूर्ती सामान्यत: दहा हातांच्या असतात आणि त्यात त्रिशूल, तलवार, अंकुश, पर्वत, कपाल, खट्वांग, पाश, वृक्ष इत्यादी आयुधे व चपेटदानमुद्रेत एक हात असतो.

वैष्णवांच्या माध्व संप्रदायात वायुपुत्र हनुमानाला अनन्य साधारण महत्त्व आहे कारण वायूने विष्णूला सहाय्य करण्यासाठी तीन अवतार धारण केले होते, पैकी एका अवतारात हनुमान होऊन रामाला, दुसऱ्यात भीमाच्या रूपाने कृष्णाला आणि तिसऱ्यात माधवाचार्यांच्या रूपाने वेदान्ताचा यथायोग्य अर्थ लावण्यासाठी वेद्व्यासाला तो सहाय्यभूत झाला होता. पंचमुखी हनुमानाच्या प्रत्येक मुखाची पूजा विशेष हेतूने केली जाते. वानरमुखाची धैर्य आणि वीर्यासाठी, भीतिहरणासाठी सिंहमुखाची, गरूडमुखाची विषापहरणासाठी व विस्मयकारक चातुर्यासाठी, वराहमुखाची आरोग्यप्राप्ती



नि भूतबाधाविनाशासाठी तर हयग्रीवाची शत्रूवर विजयप्राप्तीसाठी पूजा केली जाते. पुणे येथे स्वारगेट जवळील देवळात व राजा केळकर संग्रहालयात (काष्टाची) पंचमुखी हनुमानमूर्ती आहे.

**मत्स्येंद्रनाथ :**

अनेक भक्तिप्रवाह सामावून घेणे हे हिंदूधर्माचे एक वैशिष्ट्य होते. शैव व वैष्णव संप्रदाय हरिहराच्या रूपात एकत्र आल्याचे आपण पहातो आहोत, वारकरीपंथाच्या रूपाने अनुभवतो आहोत. नाथ संप्रदायाबद्दल असे दिसते ते मत्स्येन्द्रनाथांचा समावेश वैष्णव अवतारात झाल्यावरून. त्या संबंधीच्या तात्त्विक चर्चेत न शिरता मत्स्येन्द्रनाथाच्या मूर्तींचा विचार येथे केलेला आहे.

बीड येथील कंकालेश्वर या त्रिदल मंदिराच्या बाह्यभिंतीवर दशावतार कोरलेले आहेत. प्रत्येक अवताराला स्वतंत्र चौकट (४५ x ४५ सेंमी.) दिली आहे. येथे कल्की अवतारानंतर आणि विशेषत: विष्णूच्या गाभाऱ्याच्या बाह्यभिंतीवर मत्स्येन्द्रनाथाची प्रतिमा आहे. पद्मासनात बसलेला, दोन्ही हात मांडीवर ध्यानमुद्रेत आहेत असा अन् मुख्य म्हणजे पादपीठावर मत्स्य कोरलेला असा हा दाखविला आहे. मत्स्येन्द्रनाथाचे दंडाभोवती साधे केयूर असून कानाच्या मोठ्या पाळ्यात मोठाली कुंडले आहेत.

अशीच एक मूर्ती पन्हाळेकाजी (कोंकण) येथील क्र.२९ च्या लेणीत आहे. येथील प्रतिमा नमस्कारमुद्रेत आहे कारण लगतच शेजारी आदिनाथ आणि गिरीजा यांच्या मूर्ती आहेत (देशपांडे, १९८६.१०२). मत्स्येन्द्रनाथाच्या माथी जटा आहेत. आसनाचे दर्शनी भागावर मत्स्य कोरला आहे. मत्स्येन्द्रनाथाने कर्णकुंडले नि केयूर हे अलंकार घातलेले आहेत.

महाराष्ट्रात ज्ञानेश्वरादी भावंडांनी नाथ आणि वारकरी संप्रदायात एकोपा निर्माण केला होता. लक्ष्मणशास्त्री जोशींच्या म्हणण्याप्रमाणे महाराष्ट्रातल्या परंपरेनुसार मत्स्येन्द्रनाथाना महाविष्णू मानले जाई तर निवृत्तिनाथांना शिव आणि ज्ञानेश्वरांना विष्णू.

येथे हे अवर्जून लक्षात ठेवले पाहिजे की शिल्पाद्वारे मत्स्येन्द्रनाथांना विष्णूचा अवतार म्हणून दाखविता येत असले तरी अहिर्बुध्न्य संहितेतील एकोणचाळीस अवतारात त्याचा उल्लेख येत नाही.

****

# विष्णूच्या संकीर्ण मूर्ती

**शेषशायी वा अनंतशायी :**

कथा : पृथ्वी लोकांच्या भाराने टेकीला आली म्हणजे ती गाईचे रूप घेऊन देवांच्यासह ब्रह्मदेवाला पुढे करते व ते सर्वजण भगवंतास शरण जातात. हा देव म्हणजे शेषशायीभगवान. हा सहाजिकच सर्वश्रेष्ठ, शक्तिमान व त्राता असल्याने त्याचे हे रूप भक्तांना फार भावते (खरे १९३९.६६). देव-देवतांच्या आसन, स्थानक अशा अवस्थेतील प्रतिमा मोठ्या प्रमाणावर मिळतात, मात्र शयन प्रकारच्या फार क्वचित आढळतात. ब्रह्माविष्णुमहेश यापैकी केवळ विष्णूच्या अशा प्रकारच्या मूर्ती उपलब्ध आहेत. वैखानसागमात शेषशायीच्या योगीशयन, भोगीशयन, वीरशयन आणि अभिचारिकशयन अशा प्रकारच्या मूर्तींची माहिति दिलेली आहे. या मिळतात मात्र इसवीच्या पांचव्या-सहाव्या शतकापासून पुढच्या काळात.

चतुर्भुज (सामान्यत:) विष्णू शेषपर्यंकावर म्हणजे नागाच्या आभोगावर (वेटोळ्यावर) उजवा हात उशाला घेऊन पहुडलेला असतो. त्याच्या उजव्या पायाशी बसलेली लक्ष्मी तो पाय चेपीत असते. विष्णूच्या हातात प्रारंभीच्या काळात कोणतेही आयुध नसते. मात्र इसवीच्या आठव्या-नवव्या शतकापासून पुढील काळात त्याचे हाती चक्र, गदा आली. त्याच प्रमाणे कमलासनावर ब्रह्मा बसलेला असला तरी ही कमलनाल विष्णूच्या बेंबीपासून निघालेली नाही. याचाच अर्थ शेषयायी विष्णूला प्रारंभी पद्मनाभ म्हणता येत नव्हते. या शिवाय प्रारंभी शेषशायीच्या वरच्या बाजूस स्कन्द, इन्द्र व शिव आणि खालच्या बाजूस मधु-कैठभ व आयुधपुरूष असतात. पण नंतरच्या काळात हे वरच्या बाजूस असतात, तर बेंबीपासून निघालेल्या कमळावर चतुर्मुखी ब्रह्मदेव असतो आणि विष्णूच्या हातांत आयुधेही असतात. इसवीच्या बाराव्या-तेराव्या शतकात शेषयायीच्या पट्टाचे वरील बाजूस नवग्रह किंवा अष्टदिक्पाल किंवा दोन्ही आढळतात (उदा.परभणी येथील राममंदिरातील मूर्ती).

या प्रतिमेच्या प्रयोजनासंबंधी वायुपुराणातील कथेचा (२.१४-९ ) आधार घेऊन डॉ.नी.पु.जोशी सांगतात(१९७९.६४) "विष्णू हा क्षीरसमुद्रात शेषावर शयन करतो व लक्ष्मी त्याचे पादसंवाहन करीत असते. या काळाला 'एकार्णव' स्थिती अर्थात जलप्रलयाची स्थिती असे म्हटले आहे. येथेच सहज म्हणून विष्णूने आपल्या बेंबीतून शंभर योजने लांब असे 'वज्रदंड' कमळ उत्पन्न केले. त्यावर ब्रह्मदेव आसीन झाला व



तेथे तपश्चर्या त्याने केली व पुढे नवीन सृष्टीला सुरुवात झाली. विष्णू सुप्तावस्थेत असताना मधू व कैटभ या दोन महादैत्यांनी ब्रह्मदेवाकडूनच वर मिळविले. मात्र त्यांच्याच भीतीने ब्रह्मदेवास विष्णूच्या नाभिकमलात जाऊन लपावे लागले. या दोघांनी त्याचा पिच्छा पुरविला तेव्हा विष्णूने त्यांचा संहार केला".

शेषशायीच्या प्रतिभा आठ हाताच्याही घडविल्या जाऊ लागल्या. यापैकी काही हात डावी वा उजवीकडे अंगासरसे ठेवलेले तर काहीमध्ये चक्र, शंख, गदा धरलेले असतात. एखादा हात डोक्याखाली उशाशी धरलेला असतो. एखादा मधु-कैटभाकडे अंगुलिनिर्देश करणारा तर्जनी मुद्रेत असतो. एखादा डाव्या मांडीवर ठेवलेला असतो (पवनार येथील शेषशायीची प्रतिमा अशी आहे). काही वेळा ही आयुधे त्या त्या हाताजवळ बाजूला ठेवलेली असतात. आश्चर्य म्हणजे वाङ्मयातून येणारे शेषशायीचे वर्णन द्विभुज वा चतुर्भुज विष्णूचेच असते. अशा मूर्ती महाराष्ट्रात पवनार जि.वर्धा, गौराला लेणे,ता.भांदक,जि.चंद्रपूर; शिऊर लेणे,जि.नांदेड; भोकरदन लेणे, जि.औरंगाबाद; वेरूळ येथील क्र.१५,१६,२७ या लेण्यात आढळतात.

इसवीच्या सहाव्या शतकातील देवगड (म.प्र.) येथील देवळाच्या बाह्यभिंतीवरील प्रतिमा कलेच्या दृष्टीनेही उत्कृष्ट आहे. तर त्या नंतरच्या शतकातील ऐहोळी (जि.विजापूर) येथील जलशायीची प्रतिमाही प्रेक्षणीय आहे. इसवीच्या दहाव्या शतकानंतरच्या शेषशायीच्या मूर्ती महाराष्ट्रात अनेक ठिकाणी आढळतात. त्या सर्व चतुर्भुज असतात. या सगळ्यात अत्यंत प्रेक्षणीय ठरते ती पैठण येथे नाथगल्लीत एका लहानशा खोलीवजा गाभाऱ्यात ठेवलेली.ही उत्तम प्रकारच्या गंडकी शिळेत सर्व बारकाव्यासहित कोरलेली आहे. ही नागाच्या आभोगावर पहुडलेली असून उजवा पाय सरळ पसरलेला, पायाशी असलेली द्विभुज लक्ष्मी, तो चेपते आहे. चार हातांपैकी उजवा खालचा छातीवर ठेवलेला पद्मधारी आहे. उजव्या वरच्या हाताने माथ्यावरील मुकुटाला आधार दिला आहे व त्याचे खाली लहानशा तिवईवर शंख ठेवलाय. तर डाव्या वरच्या हातात चक्र आहे व खालचा हात गदाधारी आहे. हे वर्णन अपराजितपृच्छेत (२१९.३-९) वर्णिल्या प्रमाणे असले तरी त्यातल्याप्रमाणे लक्ष्मी काही नमस्कारमुद्रेत येथे नाही. मकरतोरणात दशावतार कोरलेले आहेत. नाग सप्तफण्यांचा आहे.

अग्निपुराणात (४९.२४-२५) वर्णिल्या प्रमाणे त्रिनेत्र असलेला शेषशायी कोठेच आढळत नाही. शेषशायीची वर्णने विष्णुधर्मोत्तरपुराण आणि रूपमंडनातही आहेत.

शिल्पशास्त्रात (११.१४४-४५) लक्ष्मी समवेत भूदेवी दाखवावी असे तर म्हटले आहेच, पण लक्ष्मी पायाशी न दाखविता ती उशाशी दाखवावी असे म्हटलेय.

दक्षिण भारतातल्याप्रमाणे अनंतशायी वा पद्मनाभस्वामींची मूर्ती महाराष्ट्राच्या देवळातल्या गाभाऱ्यात नसते. मात्र ती गर्भगृहाच्या दारांच्या गणेशपट्टीवरील प्रस्तर भागावर काही ठिकाणी आढळते. बलसाणे येथील मंदिरात; ऐश्वर मंदिर,सिन्नर; कर्णेश्वर मंदिर जि. रत्नागिरी; शिवमंदिर, संगमेश्वर तसेच गुरसाळे येथे असे शिल्पांकन आढळते.

**योगीश्वर :**

मूर्तींचे योगीभोगादी चार प्रकार असतात हे आपण जाणतोच. पैकी योगावस्थेतील विष्णूच्या स्थानक तशाच बैठ्या म्हणजे योगासन मूर्ती आढळतात. अशा मूर्ती मथुरा संग्रहालयात आहेत.

योगीश्वर विष्णू पद्मासनात बसलेला असून पुढील दोन्ही हात ध्यानमुद्रेत मांडीवर एकत्र ठेवलेले असतात. त्याचे मागील हातात गदा व चक्र ही आयुधे असतात. मथुरा संग्रहालयातील एका अशा मूर्तीच्या चरणशिळेवर शंख कोरलेला आहे. (जोशी,१९७९.१०७, चित्र.३२,बॅनर्जी,१९८५,चित्र २२.२) येथील मूर्तीच्या डोक्याच्या आजुबाजूस ब्रह्मा व शिव यांच्या बैठ्या प्रतिमा आहेत.

**विष्णू मौनव्रतिन् :**

ही योगावस्थेत जाण्याची एक स्थितीच मानावी लागेल. विष्णूच्या प्रतिमेतून ही प्रकट करण्यात शिल्पी यशस्वी झाले आहेत. किंबहुना मौन 'बोलकं' करण्याचे कसब त्यांना अवगत झाले आहे. खजुराहो येथून अशी एक दुर्मिळ प्रतिमा उपलब्ध झाली आहे. पद्मासनात बसलेल्या विष्णूच्या मागील हातात गदा व चक्र आहे. सामान्य उजवा हात खंडित आहे आणि डाव्या हाताची तर्जनी ओंठावर अशी ठरली आहे की जणू कांही नि:शब्द राहाण्याची सूचनाच ! (जोशी,१९७९.१०७; देवांगना देसाई,१९९६,चित्र.१२०)

**विठ्ठल मूर्ती :**

महाराष्ट्रातील धर्माची मुख्य धारा श्रीविठ्ठलाभोवतीच पिंगा घालीत असते. श्रीविठ्ठल हे दैवत अतिमहत्त्वाचे आणि म्हणून विशेष पूजनीय ठरते. म्हणूनच त्याचे मूळ स्वरूप कसे आहे हे पहाणे आवश्यक आहे आणि ते मूर्तिशास्त्राधारे ठरवले गेले पाहिजे.



वस्तुस्थितीला थेट जाऊन भिडणारे श्रीविठ्ठलाचे वर्णन, अगदी सोप्या शब्दांत श्रीतुकाराम महाराजांनी केलेले आहे. सांप्रदायिक वारकरी मंडळी त्यांच्या या अभंगास 'रूपाचा अभंग' म्हणतात ते यथार्थच होय. तो अभंग असा -

सुंदर ते ध्यान उभे विटेवरी । कर कटावरी ठेऊनिया ।।१ ।।
मकर कुंडले तळपती श्रवणी । कंठी कौस्तुभमणी विराजित ।।२ ।।
गळा तुळशीहार कासे पिंतांबर । आवडे निरंतर हेचि ध्यान ।।३ ।।
तुका म्हणे माझे हेचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीने ।।४ ।।

पंढरपूर येथील देवळातील विठ्ठलमूर्ती ही प्रतिष्ठापित असल्यामुळे, ती अचल आहे. तिला ध्रुवबेर म्हणायचे. ती 'समचरण विटेवेरी' अशा रीतीने ताठ उभी आहे. तिचे हात कटिस्थित असून तिच्या डाव्या हाती शंख हे ज्ञानाचे प्रतीक तर उजव्या हातीचे कमळ हे पावित्र्याचे. ज्ञान व पावित्र्य हे योग्याजवळ असले पाहिजे. हिच्या माथ्यावर उंच, किंचित् निमुळत्या आकाराचा कंगोरेदार मुकुट आहे; याला काहीजण शिवलिंग मानतात. कानांत मकरकुंडले असून ती खांद्यावर विसावली आहेत. हिचे कंठी हार आहे. छातीच्या उजव्या व डाव्या भागावर अनुक्रमे एक वर्तुळ व खळगा असून त्यास श्रीनिकेतन व श्रीवत्सलांछन असे मानतात. दंडावर व मनगटावर अंगद व मणिबंध आहेत. कटिभोवती तिहेरी मेखला आहे. नेसूचे तलम पितांबर समोर दोन्ही मांड्यांचे मध्ये दिसणाऱ्या निऱ्यामुळे स्पष्ट होते. याची शिल्पग्रंथीय उदाहरणे आढळत नाहीत पण प्रत्यक्ष मूर्ती दक्षिण भारतात अनेक ठिकाणी आढळतात. श्रीविठ्ठल म्हणजे जर विष्णूचेच एक रूप असेल तर वेगळे ग्रांथिक वर्णन असायचे कारणही नाही.

मूर्तिशास्त्रानुसार मूर्तींचे भोग, वीर, अभिचारिक आणि योग असे चार प्रकार असतात. भक्तांच्या आवडीप्रमाणे आणि आवश्यकतेप्रमाणे त्यांची घडण करावयाची असते. येथे ही विठ्ठलमूर्ती योग प्रकारची आहे असे दिसते. या संबंधी थोडे विस्तृत विवेचन येथे आवश्यक आहे.

श्रीविठ्ठलाची मूर्ती स्थानक म्हणजे उभी आहे, त्यामुळे तिचा योगाशी काही संबंध असेल असे चटकन् वाटत नाही. वैखानस आगमातील मूर्तिविज्ञानविषयक भागात, उभी प्रतिमा योग प्रकारची असू शकते यासंबंधीचे सविस्तर वर्णन आढळते. योगस्थानक प्रकारातील विष्णूची मूर्ती कलकत्ता येथील राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयात आहे. तर श्वेताश्वतर उपनिषद् आणि पातंजल योगसूत्रांत छाती, मान व मस्तक एका ओळीत ताठपणे

ठेवल्यास योगसाधना होऊ शकते, मग योगी बसलेला असो की उभा असे स्पष्टपणे सांगितलेले आहे. कठोपनिषदात स्पष्ट म्हटले आहे; 'तां योगमिती मन्यन्ते स्थिरामिन्द्रियधारणाम् । (२.६.११). शरीरावयावर आणि मनावर संपूर्ण ताबा म्हणजे योग. 'योगश्चित्तवृत्ति निरोध:' (पातंजल योग १.२ )' ही सर्व योग लक्षणे श्रीविठ्ठलमूर्तीत आढळतात. तेव्हा योगियांचा राजा गुरु महाराव श्रीज्ञानेश्वर "ऐसा हा योगिराजू । तो विठ्ठल मज उजू ।। ज्ञानदेव गाथा ।।५९७।।" वर्णन करतात ते योग्यच होय.

श्रीविठ्ठलाची मूर्ती योगस्थानक-प्रकारची आहे, म्हणून तिच्या हातांमध्ये चक्र आणि गदा यासारखी आयुधे नाहीत. म्हणूनच तो दोन हातांचा आहे, चतुर्भुज नाही आणि विष्णूचे हे रूप नेहमीपेक्षा वेगळे आहे, हे संतांना माहिती होते. ज्ञानदेवादी संतानी,'चोविसा मूर्तींहूनी वेगळा । हा पंचविसावा' (सकल संत गाथा, ज्ञानेश्वर-४५०) असे त्याचे वर्णन केले आहे.

मूर्तिशास्त्रीय दृष्टिकोनातून आणखी तीन मतांचा येथे परामर्श घेता येईल.

१. ही मूर्ती बाविसाव्या तीर्थंकराची म्हणजे नेमिनाथ या तीर्थंकराची ठरत नाही; कारण तो सालंकृत असत नाही. शिवाय त्याचे लांछन शंख असले तरी, ते त्याच्या पीठावर दर्शनी बाजूस कोरलेले असते; हातात नसते. तसेच त्याच्या हाती कमळही नसते व तो कमरेवर हात ठेवून उभाही नसतो.

२. ही मूर्ती बुद्धाचीही नाही. बुद्धाच्या हाती शंख वा कमळ नसते; तो क्वचित सालंकृत व मुकुटधारी असतो.

३. माढे जि.सोलापूर येथील सध्याची विठ्ठलमूर्ती ही एक तर प्राचीन नाही; दुसरे म्हणजे ती मूळची पंढरपुरातील नाही. मूर्तिशास्त्राचे दृष्टीने हिच्या घडणीत कांही दोष आहेत. ही 'मकर कुंडले तळपती श्रवणी' अशी नाही; तर हिच्या कानात शंख कुंडले आहेत. छातीवर श्रीवत्स नाही, ही विवस्त्र आहे. हिच्या हातातील काठी गोपाळाची नाही; ती डोक्याइतकी उंच असली पाहिजे (असलीच तर ! ).

**विश्वरूप**

विष्णूच्या विश्वरूपाचे वर्णन गीतेच्या विश्वरूपदर्शनयोग या नावाच्या अकराव्या अध्यायात आणि अग्निपुराणात आढळते. या प्रतिमेची योजना विष्णूचे सर्वश्रेष्ठत्व दाखविण्यासाठी असावी. ऋग्वेदातील पुरुषसूक्ताच्या रूपात ही मूळ कल्पना



आढळते. वैकुंठमूर्तीच्या प्रभामंडलात अष्टदिक्पाल, अष्टवसू, द्वादश आदित्य, नवग्रह, गंधर्व, ऋषी कोरलेले असतात. थोडक्यात म्हणजे सर्व देवतामंडळच अंकित केलेले असते. हे वैकुंठाचे विकसित रूपच होय. विश्वरूपाच्या प्रतिमांचा प्रारंभ बहुधा इसवीच्या दुसऱ्या-तिसऱ्या शतकात झाला असावा कारण इसवीच्या चौथ्या-पाचव्या शतकात (गुप्तकाळात) या दोन प्रकाराने शिल्पबद्ध केलेल्या दिसतात. पहिल्या प्रकारच्या प्रतिमेत वैकुंठ चतुर्मुखी व अष्टभुज दाखवलेला असून प्रभावळीत रूद्रमुखपंक्ती, देव-देवता, दिक्पाल इ.आढळतात. या काळांत षड्भुज प्रतिमाही आढळतात. दुसऱ्या प्रकारची प्रतिमा शामलाजी (गुजरात) येथे आहे. ती आसनस्थ आहे. तो सर्पाच्या अभोगावर खाली पाय सोडून (प्रलंबपादासनात) बसला असून अष्टभुज आहे.

इसवीच्या सहाव्या शतकानंतरच्या विश्वरूप प्रतिमेत बराच बदल झाला असून त्यावर चतुर्मुख ब्रह्मा दिसतो (कनोज येथील मूर्ती). आता तीन ऐवजी पांच तोंडे आली. पैकी वासुदेवाच्या उजव्या बाजूस सिंह व वराहाची तर डाव्या बाजूस मत्स्य व कूर्म (कधी घोड्याचे तोंड, पटना येथे). या संबंधीचे उल्लेख विष्णुधर्मोत्तरपुराण, अपराजितपृच्छा, रूपमण्डन यात आढळतात. सामान्यत: हात आठच, क्वचित दहा असतात. विशेष म्हणजे चापपुरुष आणि शरपुरुष यांची येथे भर पडलेली आढळते. अशा मूर्ती कनोज, ग्वाल्हेर, खजुराहो (द्वादशभुज), लखनौ येथे थोड्याफार भिन्नतेने आढळतात. विशेष म्हणजे लखनौ संग्रहालयातील विश्वरूप प्रतिमेत (ल.सं.एच१२४,चित्र३४) एका कोपऱ्यात हात जोडून बसलेला धनुर्धर अर्जुनही दिसतो.

तत: स विस्मयाविष्टो हृष्टरोमा धनंजय:
प्रणम्य शिरसा देवं कृताञ्जलिरभाषत ।।११.१४।।

(अर्थ : त्यानंतर तो आश्चर्यचकित होऊन हर्षाने रोमांचित झालेला अर्जुन विश्वरूप परमात्म्याला (श्रद्धाभक्तिसहित) शिरसा प्रणाम करून हात जोडून बोलू लागला.)

अर्जुन उवाच : पश्यामि देवांस्तव देव देहे । सर्वांस्तथा भूतविशेषसंघान् ।
ब्रह्माणमीशं कमलासनस्थमृषींश्च सर्वानुरगांश्च दिव्यान् ।।११.१५।।

(अर्थ : हे देवा! तुझ्या शरीरांत सर्व देवांना तसेंच अनेक भूतांचे समुदायांना, कमलासनस्थ ब्रह्मदेवाला (तसेच) महादेवाला व सर्व ऋषींना त्याच प्रमाणे दिव्य सर्पांना (मी) पहातो आहे.)

नान्तं न मध्यं न पुनस्तवादिं । पश्यामि विश्वेश्वर विश्वरूप ।।११.१६ ।।

(अर्थ : हे संपूर्ण विश्वाचे स्वामी ! आपणास अनेक हात, उदरे, मुखे व नेत्र असलेले सर्व बाजूंनी अनंत रूपे असलेली (असा) (मी) पहात आहे. हे विश्वरूपा, आपला न अंत आहे, न मध्य आहे आणि न आदि आहे (असे आपणाला) (मी) पहातो आहे.)

विश्वरूप प्रकारातील अशी एकही प्रतिमा महाराष्ट्रात उपलब्ध नाही. मात्र औंढा येथील नागनाथाच्या मंदिरावरील अठरा हातांची विष्णुप्रतिमा विश्वरूपाची असावी असे वाटते.

**अठरा हातांचा विष्णू (विश्वरूप ?)**

औंढा नागनाथ मंदिराच्या (जि.परभणी) मंडोवरावर पश्चिमाभिमुख अशी विष्णूची स्थानक प्रतिमा आहे. ही समचरणावस्थेत उभी असून हिच्या आजूबाजूला पांच पांच उभ्या प्रतिमा आहेत आणि वीरासनात बसलेला नमस्कारमुद्रेतील गरूड विष्णूच्या पायाशी उजव्या अंगास आहे. सालंकृत विष्णूने पद्म, चक्र, पाश, दंड, वज्र, बाण, परशू, तलवार, नाग इत्यादी उजवीकडील हातात घेतले आहेत आणि त्याचे डावीकडील हातात त्रिशूल, पुस्तक, नांगराचाफाळ, अंकुश, गदा, डंबेल, फळ नि अनोखळी वस्तू इत्यादी आहे. सात्वत संहितेत (१२.२२९-३१) वर्णिलेल्या अष्टदशभुज विष्णूच्या हातातील आयुधे व वस्तूंच्या जागा भिन्न आहेत एवढेच.

ही प्रतिमा विश्वरूपाचीच असावी असे वाटते. त्याचे कारण या शिल्पपटाचे आजूबाजूच्या पटात अनुक्रमे हयग्रीव आणि प्रद्यम्न यांच्या प्रतिमा आहेत. हयग्रीव अश्वमुखी असतो. विश्वरूपाच्या प्रतिमेत संकर्षण, प्रद्युम्न नि अश्वमुखी अनिरूद्ध अभिप्रेत असतात. तेव्हा ही अष्टदशभुज विष्णू प्रतिमा म्हणजे विश्वरूपाचाच एक प्रकार असावा असे वाटते. यासाठी आणखी एक पुरावा देता येईल. मथुरेहून मिळालेली व सध्या पश्चिम बर्लिन येथे असलेली हयग्रीवाची प्रतिमा सर्वतोभद्र आहे. तीत विष्णू, नरसिंह, वराह आणि अर्थातच हयग्रीव आहे (जोशी १९७९.६९;हर्टेल,५,क्र.९६). यापैकी पहिल्या तीन देवता वैकुंठ व विश्वरूप प्रकारच्या प्रतिमेत असतात. येथे अनिरूद्धाऐवजी हयग्रीव दिसतो. अश्वमुख हे त्या दोहोतील साम्य लक्षात घ्यायचे. शिल्पांच्या या अशा ठेवणीमुळे आणि विश्वरूपाच्या हातात असावीत तेवढी आयुधे येथे विष्णूच्या हातात असल्यामुळे या मूर्तीला विश्वरूप मानता येईलसे वाटते.

**विष्वक्सेन :**

हे विष्णूचे अंशरूप मानले जाते. हा विष्णूमंदिरांचा रक्षक असतो.



शैवमूर्तिशास्त्रात गणेशाचे जे स्थान तेच वैष्णव परिवारात याचे असते. मंदिरातील पूजादीविधी सुरळीत पार पडावेत म्हणून आधी याला आवाहन केले जाते. हा दक्षिणाभिमुख असतो. हा चतुर्भुज असून हातात शंख, चक्र, गदा असते व चौथा हात तर्जनी मुद्रेत असतो. साधारणत: सव्यललितासनात बसलेल्या अवस्थेत याला दाखवितात. एका मिथ्यकाप्रमाणे शिवाला प्रवेश नाकारल्यामुळे (गणेशाने केले तसे) शिवाकडून याचा शिरच्छेद झाला होता.

**वैकुंठ :**

विष्णूच्या तीन दृश्य तोंडे असलेल्या मूर्तीची ओळख वैकुंठ नावाने केली जाते. यात मुख्य असते ते वासुदेवाचे, उजवीकडील असते त्याचा भाऊ संकर्षणाचे, डावीकडील प्रद्युम्नाचे, हा वासुदेवाचा मुलगा आणि दिसत असल्यास मागचे श्रीकृष्णाचा नातू अनिरुद्धाचे. येथे संकर्षणाचे म्हणून सिंहाचे, प्रद्युम्नाचे म्हणून वराहाचे व (दाखविल्यास) अनिरूद्धाचे म्हणून अश्वमुख शिल्पांकित केले जाते (बॅनर्जी,१९८५,१; जोशी १९७९.६१). क्रमाने वासुदेवाची ही तीन तोंडे जीव, मन व अहंकार यांचे द्योतक होत- काही ठिकाणी वासुदेव हा ज्ञानाचे प्रतीक मानून क्रमाने बाकीच्यांना शक्ती, ऐश्वर्य आणि बल यांचे प्रतीक मानले आहे.आधी म्हणजे गुप्तकाळात हातांची संख्या कमी होती, ती पुढे सहा व आठ पर्यंत वाढत गेली.

विशेष म्हणजे वैकुंठासंबंधीचा उल्लेख व माहिती खजुराहो येथील लक्ष्मण मंदिरातील यशोवर्माच्या लेखात दिलेली आहे. तिचे हस्तांतरण एका राजाकडून दुसऱ्याकडे कसे होत गेले हे सांगून वैकुंठाची उत्पत्ती कशी झाली या संबंधीची कथाही त्या लेखात आलेली आहे. मुळात ही कथा नारदीय संहितेत आली आहे (१३.२.३४). कथा सारांशाने अशी: एकच शरीर धारण करून तीन भयंकर असुर राहात होते. त्यांचा नि:पात करण्यासाठी विष्णूने वैकुंठ रूप धारण केले होते. मात्र वैकुंठ मूर्तीचा विचार करताना या कथेचा काही उपयोग होत नाही. वैकुंठाच्या प्रतिमा मथुरा संग्रहालय, खजुराहो, राजस्थान, गुजरात येथे तसेच काश्मिरात आढळतात. महाराष्ट्रात वैकुंठाची एकमेव प्रतिमा मेथी (जि.धुळे) येथील यादवकालीन लक्ष्मी मंदिराच्या मंडोवरावर आढळते. मात्र ती बैठी (आसनस्थ) आहे. हरिपाठाच्या दुसऱ्या अभंगात श्रीज्ञानेश्वर 'हरि हा वैकुंठ' असे म्हणतात तो हाच वैकुंठ होय.

वैकुंठाच्या प्राप्त प्रतिमांपैकी काहीत वेगळेपणही आढळते. उदा. राजस्थानात

(बिजौलिया, जि. भीलवाडा) एका मंदिरात आहे त्या वैकुंठमूर्तीचे मधले तोंड अनिरूद्धाचे (म्हणजे घोड्याचे) आहे. तर झालवाड वस्तुसंग्रहालयातील अष्टभुज वैकुंठ गरुडारूढ आहे. त्याचे हातांत कमळ, बाण, गदा, खड्ग, ढाल, चक्र, धनुष्य व शंख आहे. खजुराहो येथील प्रतिमाही अशीच आहे. वैकुंठाची विष्णुधर्मोत्तर पुराणात भरपूर माहिती मिळते. चतुर्व्यूह मूर्तीलाच वैकुंठ असे संबोधता येते. हिलाच बिंबब्रह्म असे म्हणता येईल. येथे त्या संबंधीचा विचार करू या.

**बिंबब्रह्म वैकुंठ :**

मूर्ती विविध उद्देशाने घडविल्या जात होत्या. त्या आशयगर्भ होत्या/आहेत. त्यांचे अनेक आयाम (dimensions) असतात. एखादे तत्त्वज्ञान समूर्त करणारी मूर्ती म्हणजे मूर्तिशास्त्रातील संपरिपूर्ण, उन्नत रूप. अशा मूर्तींना बिंबब्रह्म म्हणता येईल. बिंब म्हणजे मूर्ती. ज्या बिंबाद्वारे ब्रह्मज्ञान होते म्हणजेच मोक्षप्राप्ती होते, त्यांना म्हणायचे बिंबब्रह्म. श्रीविष्णूच्या अनेक मूर्तींमध्ये वैकुंठाची मूर्ती बिंबब्रह्म म्हणता येईल अशी आहे. त्या दृष्टीने हिचा विचार येथे केला आहे.

श्रीज्ञानेश्वर म्हणतात एकटा हरीच असा आहे की, जो जीव आणि शिव यांच्यामध्ये समानत्वाने असणारा आत्मा आहे. या हरीचे नांव वैकुंठ आहे. तोच सर्व चराचरात दाटून/व्यापून राहिला आहे. 'एक हरी आत्मा जीव-शिव समा । वाया तू दुर्गमा न घाली मन ।।हरिपाठ २.३।। ज्ञानदेवा म्हणे हरि हा वैकुंठ । भरला घनदाट हरि दिसे ।।२.४।।

पूर्व विचारवंतांनी वैकुंठ याचे व्युत्पत्तिसिद्ध जे अर्थ केले आहेत त्यांचा व शास्त्रग्रंथातून आलेल्या त्यांच्या कथांचा विचार येथे उपयुक्त ठरणारा आहे.

**अर्थ :** (अ)भागवतात (३,१६) स्वत: भगवान विष्णू म्हणतात 'माझ्या अमृतमय शुद्ध यशाने न्हाऊन निघाल्याने प्राणिमात्र पवित्र होतात, म्हणून माझे नांव वैकुंठ आहे' म्हणजेच पापाला प्रतिबंध करणारा म्हणून तो वैकुंठ होय.

(ब)व्युत्पत्तिसिद्ध अर्थ - 'विगता कुंठा यस्य स विकुंठो विकुंठ एव वैकुंठ:' (ज्यास कुंठा म्हणजे अवरोध वा प्रतिबंध नाही तो विकुंठ भगवान).

(क)श्रीमद्शंकराचार्य अर्थ करतात तो असा : 'विविधा कुंठा गते: प्रतिहत: विकुण्ठा विकुण्ठाया: कर्तेति वैकुंठ:' (विविध कुंठाच्या (म्हणजे गती) अवरोधास विकुंठा म्हणतात; कारण जगाच्या प्रारंभी इतस्तत: पसरलेल्या



भूतांना परस्पर एकत्र करून त्यांच्या गतीस हा अवरोध करतो म्हणून त्यास वैकुंठ म्हणतात). जगदारंभे विश्लिष्टानि भूतानि परस्परं संश्लेषयन् तेषां गतिं प्रतिबध्नातीति वैकुंठ: ।

**कथा :**

१. ऋग्वेदातील दहाव्या मंडलातील ४८ व्या सूक्तातील इंद्रोवैकुंठीची व्याख्या करताना दुर्गाचार्य सांगतात की, विकुंठा नावाच्या राक्षसीच्या तप:सामर्थ्याने इन्द्र पुत्ररूपाने तिच्या उदरी आला म्हणून इंद्राला वैकुंठ असे म्हणतात.

२. शुभ्रऋषींच्या विकुंठा नामक पत्नीचा हा पुत्र म्हणून तो वैकुंठ. म्हणजे तो भगवंतच. अशी कथा विष्णुपुराणात आली आहे.

३. महाभारताच्या शांतिपर्वात 'मया संश्लेषिता भूमिरद्भिर्व्योमच वायुना । वायुश्च तेजसा सार्धं वैकुंठत्वं ततो मम' असे म्हटले आहे. म्हणजेच 'मी पृथ्वीस जलासवे, आकाशास वायूसवे, वायूस तेजासवे मिळविले होते म्हणून मला वैकुंठ म्हणतात'.

४. खजुराहो येथील एका मंदिरातील यशोवर्मदेव याच्या अभिलेखातील कथा वर आलेलीच आहे.

जयाख्य या प्रमुख आधार ग्रंथानुसार वैकुंठ म्हणजे काश्मिरागम पांचरात्राचे आराध्य दैवत. हा वैकुंठ शुभ्रवर्णी, शंखचक्रगदापद्मधारी, चतुर्मुख व गरुडारूढ असतो. त्याचे मुख्य मुख मानवी व बाकीची नारसिंह, वाराह व कापिल अशी असतात. ही अशी एकच चतुर्मुखी देवता समजली जाते, संमिश्र वा संयुक्त नव्हे.

पांचरात्र तत्त्वज्ञानाचा आणि मूर्तिशास्त्राचा आधार घेऊन वैकुंठ या प्रकारावर आणखी प्रकाश टाकता येतो. भगवद्भक्तीने मोक्ष प्राप्त करून घेणे हे पांचरात्र तत्त्वज्ञानाचे उद्दिष्ट आहे. ईश्वर ज्या पांच स्वरूपांनी प्रकट होतो त्यांपैकी एक आहे व्यूहस्वरूप. यात परमात्मा वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न व अनिरूद्ध या चार रूपांनी प्रकट होत असतो. वासुदेवस्वरूप षड्गुणैश्वर्यसंपन्न असते. संकर्षण हा ज्ञान व बलसंपन्न, प्रद्युम्न ऐश्वर्य व वीर्यसंपन्न आणि अनिरूद्ध शक्ती व तेजसंपन्न असतो. तात्पर्य परमेश्वराचे सहा दिव्यगुण व्यूहाच्या ठिकाणी वेगळाले झाले आहेत. महाभारताच्या शांतिपर्वात परमात्मा हाच वासुदेव, सर्वजीव म्हणजे संकर्षण (वासुदेवाचे व्यक्त स्वरूप), संकर्षणापासून प्रद्युम्न (= मन), व त्याचेपासून अनिरूद्ध (= आत्मज्ञान) प्रकट झाले असे म्हटले आहे.

देव-मानवादी सृष्टी वासुदेवापासून उत्पन्न झाल्या असून या सर्वांचा विलय वासुदेवाच्याच ठिकाणी व्हायचा असतो.

अशा या वासुदेवाच्या रूपाची कल्पना जी प्राचीन काळातील विचारवंतांनी आणि कलाकारांनी केलेली होती ती वैकुंठाच्या मूर्तिद्वारे गोचर झालेली आढळते.

वैकुंठ या रूपात विष्णूच्या प्रतिमा इसवीच्या चौथ्या-पांचव्या शतकात मथुराशैलीत आढळतात. मध्ययुगाच्या प्रारंभी त्या आढळतात हिमाचल प्रदेश, काश्मिर आणि मध्यप्रदेशात. या काळात त्या लोकप्रिय झाल्या होत्या. प्रत्यक्ष वैकुंठमूर्तीची माहिती प्रारंभी आलीच आहे. प्रारंभी रामायण महाभारतात आढळणारी अवतार संकल्पना पुराणांच्या काळापर्यंत हळूहळू उत्क्रांत होत गेली आणि इसवीच्या पांचव्या शतकापर्यंत अनेक लहान लहान पंथांच्या देवतांचा वैष्णव परिवलयात अंतर्भाव करीत गेली. त्याच प्रक्रियेची परिणती वैकुठ या मूर्तीतही झाल्याचे दिसते. वैकुंठ हे भागवत पांचरात्र पंथाचे प्रतीक ठरले. या अशा चतुर्मुखीमूर्तीचे आणखी एक प्रयोजन आहे. वैष्णवागमात देवतांचा संकर नाही. उदाहरणार्थ काश्मिरागमात मानवी, सिंह, वराह व अश्व अशी मुखे असलेली एकच देवता असते. भागवत पुराणाच्या नागपत्नीस्तुती (अध्याय १०.१६ श्लोक ४५) मधील एका श्लोकात ही संकल्पना फार यथार्थपणे मांडलेली आहे. येथे कालिया नागाच्या बायका कृष्णास विनवितात- ''नमः कृष्णाय रामाय वासुदेवसुताय च । प्रद्युम्नाय अनिरुद्धाय सात्त्वताम् पतये नमः।'' येथे या चारही देवता एक समजूनच त्यांना प्रार्थिले गेले आहे, हे सूत व पती या एकवचनी संबोधनावरून लक्षात येते. (बॅनर्जी १९८५, ४०८-९) हे चारही वसुदेवाचे नातलग व सात्वतांचे दैवत म्हणून उल्लेखिले गेले आहेत. चारात एक पाहाण्याची ही संकल्पना संप्रदायावरील ग्रंथात चतुर्व्यूह किंवा विष्णुचतुर्मूर्ती म्हणून संबोधिली जाते आणि ही संकल्पना समूर्त केली गेली ती चार तोंडांच्या विष्णुमूर्तीच्या रूपात. विष्णुधर्मोत्तर पुराण (भाग ३, प्रकरण ८५) अशा मूर्तींना वैकुंठ म्हणते. वैकुंठाचे वर्णन पांचरात्र दर्शनातही आलेले आहे. त्यानुसार ईश्वर षड्गुण संपन्न आहे. 'षड्गुणैश्वर्य संपन्न । एक भगवंतचि जाण ।।' असे संत तुकाराम महाराजही म्हणतात. हे षड्गुण म्हणजे ज्ञान (विशेषरूपाने सर्व वस्तूंचा प्रत्यय येणे म्हणजे ज्ञान), ऐश्वर्य (इच्छेचा अप्रतिघात), बल (जगदुत्पादनात श्रमाचा अभाव, शक्ती (जगन्मूलकारणभाव) तेज (सहकार्यनिरपेक्षत्व) आणि वीर्य (जगत्कारण असूनही अविकारित्व) आणि या सर्व लक्षणांनी युक्त एक श्रीहरीच आहे म्हणूनच त्यास भगवंत



म्हणतात. त्यालाच ज्ञानी लोक वासुदेव म्हणतात असे श्रीमद्भागवत सांगते (५.१२)

एवंगुणविशिष्ट वैकुंठमूर्तीची मंदिरे काश्मिरात अवन्तीपुरात, खजुराहो येथे व गुजरातेत थान या गांवी उभारलेली होती.

जयाख्यसंहितेत (इसवीचे ५-६ वे शतक) वैकुंठाच्या पूजेचे विधान सांगितले आहे. मंत्रन्यास, मुद्राबंध, जपविनियोग, बाह्ययाग आणि मानसयाग या संबंधीची विस्तृत माहिती या संहितेत दिलेली आहे. तर नंतरच्या विष्णुधर्मोत्तर पुराणात वैकुंठासंबंधीच्या अनेक व्रतांबद्दलची माहिती आलेली आहे. वैकुंठाची वासुदेव, नारसिंह, वाराह व कापिल ही चार तोंडे क्रमाने चैत्र, वैशाख, ज्येष्ठ व आषाढ या महिन्यात पूज्य होत. या महिन्यातच गृहोपयोगी, रणोपयोगी, योगोपयोगी व यज्ञोपयोगी वस्तूंचे दान करायचे असते.

येथपर्यंतच्या विवेचनावरून असे लक्षात यावे की पांचरात्र तत्त्वज्ञान ज्या षड्गुणांच्यामुळे ब्रह्मज्ञान होते असे मानते ते गुण वैकुंठमूर्तिद्वारे समूर्त केलेले आहेत. म्हणजेच वैकुंठ मूर्ती ही बिंबब्रह्म प्रकारची ठरते. ज्या बिंबामुळे (मूर्तिमुळे) ब्रह्मज्ञान होते ते बिंबब्रह्म, तेंच अनंत. संगीतात जसे नादब्रह्म, अध्यात्मात जसे अद्वैतब्रह्म, व्याकरणात जसे शब्दब्रह्म तसे मूर्तिशास्त्रात बिंबब्रह्म होय. मूर्तिशास्त्रातील हा कलशाध्याय होय.

**अनंत**

विष्णूच्या अनंत रूपातील प्रतिमा उपलब्ध आहेत. शेषाच्या आभोगासह तो आढळतो. चतुर्भुज विष्णूच्या मस्तकावर शेष (सापाचा) फणा असून त्याच्या पाठीशी सापाचा आभोग (वेटोळे) असतो. अशा प्रतिमा इसवीच्या सहाव्या शतकापासून उपलब्ध होतात. पैकी एक देवगढ येथे, दुसरी अलाहाबादेतील वस्तुसंग्रहालयात आहे. महाराष्ट्रात ती निलंगे (जि.लातूर) येथील नीलकंठेश्वर मंदिरात आढळते.

****

# विष्णूच्या संयुक्त मूर्ती

प्रारंभी सांगितल्याप्रमाणे सृष्टीच्या पालनाचे श्रेय विष्णूस आहे व संहाराचे दायित्व शिवाकडे आहे. कालांतराने या देवतांच्या उपासकांची संख्या खूप वाढली तेव्हां या उपासकांनी सृष्टीच्या निर्मितीचे, पालनाचे आणि संहाराचे कारण आपापले दैवतच आहे असे समजण्यास प्रारंभ केला. केव्हा शैवांनी विष्णू हा शिवभक्त आहे असे दाखवायचे-विष्णू शिवाला सहस्त्र कमळं अर्पण करतो त्याची कथा व प्रतिमा या द्वारे, तर केव्हां विष्णूला सर्वश्रेष्ठ देव मानून ब्रह्मा व शिव यांचेसह सर्व देव त्याला वंदन करीत असल्याचे दाखवायचे, असे होत गेले. कांही वेळा विष्णू आणि शिव समान आहेत हे दाखविण्यासाठी हरिहराच्या मूर्तींच्या द्वारे विष्णू व शिव यांना एकत्र आणले गेले तर अन्य वेळा ब्रह्मेशानजनार्दनार्क म्हणजेच हरिहरपितामहार्क अशा सूर्यासह तिन्ही देवांच्या संमिश्र प्रतिमा घडविल्या गेल्या. मूर्तिपूजक समाजातील वेगळाल्या देवतांच्या उपासकांमध्ये समन्वय घडवून आणण्याचा यापेक्षा अधिक प्रभावशाली उपाय कोणता असणार ! अशा एकत्रमूर्तींना शास्त्रात संमिश्र वा संयुक्तमूर्ती (synchretic) म्हणतात. आदि शंकराचार्य यांनी पंचायतन पूजेची जी संकल्पना प्रचारात आणली तिचाच पुरस्कार करणारी ही आहे असे वाटते. बौद्ध आणि जैन पंथांच्या प्रसारामुळेही शैव व वैष्णवांनी एकत्र यावे अशी परिस्थिती निर्माण झाली असणार.

हरिहर, हरिहरब्रह्मा, हरिहरार्क आणि हरिहरपितामहार्क या आणि अर्धनारीश्वर व राधाकृष्ण या प्रकारच्या मूर्ती या संमिश्रमूर्तींच्या गटात मोडतात. पैकी सगळ्यात लोकप्रिय ठरते ती हरिहर प्रतिमा आणि ती सर्वात प्राचीनही आहे.

**हरि-हर**

विष्णूची शिवासह असलेली ही संयुक्त प्रतिमा होय. सामान्यत: ही भारतातील सर्व राज्यांमध्ये उपलब्ध आहे. अशा मूर्तीतून अनुस्यूत असलेला अर्थ लक्षात घेता मूर्तिशास्त्राला अभिप्रेत असलेला एक नवा आयाम लक्षात येतो. जेव्हा वैष्णव आणि शैव सांप्रदायाच्या अनुयायामध्ये वितुष्टे आली तेव्हा तत्कालीन प्रातिभप्रज्ञ समाजधुरिणांनी दोन्ही संप्रदायातील वैमनस्य क्षीण होऊन त्यांच्यांत सामंजस्य निर्माण व्हावे म्हणून अशा मूर्तींची संकल्पना प्रत्यक्षात आणली.

या प्रकारच्या प्रतिमेत उजवीकडचा भाग शिवाचा नि डावीकडचा भाग विष्णूचा असतो. ही वाटणी अगदी 'नखशिखान्त' असते. उजवीकडील हातात त्रिशूल,



डमरू इत्यादी तर डावीकडील हाती शंख, चक्र असते. उजव्या बाजूस नंदी तर डाव्या बाजूस गरुड असतो. अशा मूर्तींचे प्रयोजन हे की दोन्ही सांप्रदायिकांनी एकत्र यावे 'सहनाववतु, सहनौभुनक्तु सहवीर्यं करवाव है ।' या वृत्तीने त्यांनी राहावे, असे आहे.

हरिहराच्या मूर्ती इसवीच्या दुसऱ्या-तिसऱ्या शतकापासून मिळतात. या वेळेपासून ते इसवीच्या सहाव्या शतकापर्यंतच्या प्रतिमांचे एक वैशिष्ट्य साधारणत: असे की या उर्ध्वलिंगी असणे हे शिवाचे लक्षण होय. महाराष्ट्रात प्रथम या वेरूळच्या ब्राह्मणी लेणीत आढळतात, हरिहराची मंदिरेही आहेत. श्रीवर्धन (जि.रायगड) येथे अव्यक्त रूपात हरिहर आहेत असे मानले जाते; जसे स्वयंभूलिंग असते. पंढरपूरच्या श्रीविठ्ठलमूर्तीकडे 'हरिहरा नाही भेद' अशा भावनेने नरहरी सोनार व अन्य संतांनी पाहिले आहे हे वारकरी जाणतातच.

**हरिहरब्रह्मा :**

ब्रह्माविष्णुमहेश या देवतांचे महत्त्व याचपूर्वी विशद केलेले आहे. त्यांच्या वेगवेगळ्या मूर्ती आढळतातच शिवाय त्या एकमेकींच्या सान्निध्यात एकत्रही असतात. अशा तिन्ही उत्कृष्ट, सालंकृत उभ्या मूर्ती विदर्भात खरवड येथे आहेत अशाच प्रतिमा औंढा-नागनाथ आणि नागनसून येथे आहेत; (वेलणकर, अप्रसिद्ध प्रबंध २००३). या त्रिमुखी, षड्भुज आणि उभ्या आहेत. यांचे सहा हातांत त्रिशूल, डमरू, शंख-चक्र नि अक्षमाला व कमंडलू दिसतात.

**हरिहरार्क :**

पेडगाव जि.नगर येथील लक्ष्मी-नारायण मंदिराच्या मंडोवराच्या मागील देवकोष्ठात अशी प्रतिमा आहे. ही स्थानकमूर्ती समचरणावस्थेत असून हिचे आजूबाजूस शंखपुरुष व चक्रपुरुष आहेत. मूर्तीला सहाजिकच सहा हात आहेत. खालच्या उजव्या व डाव्या हातात कमलपुष्प धरलेले असून ते मूर्तीच्या खांद्यापर्यंत वर धरलेले आहेत. दोन्हीकडच्या मधल्या हातात शंख व चक्र असावेत (दोन्ही हात तुटलेले आहेत). सगळ्यात वरच्या उजव्या हातीं त्रिशूल आणि डाव्या हाती नाग धरलेला आहे. मूर्ती बाराव्या-तेराव्या शतकातील आहे. महाराष्ट्रात ही अशी एकमेव आहे. या प्रकारच्या मूर्तीवरून या काळात सूर्योपासकांची म्हणजे सौरपंथीयांची दखल घ्यावी एवढी संख्या वाढलेली असावी असा अंदाज करता येईल.

**हरिहरपितामहार्क वा ब्रह्मेशानजनार्दनार्क :**

संमिश्र प्रकारच्या मूर्तीमध्ये सर्वाधिक लोकप्रिय प्रतिमा म्हणजे हरिहर प्रतिमा. मात्र त्या खालोखाल दृष्टिगोचर आहे ती म्हणजे हरिहरपितामहार्क. अशा प्रकारच्या मूर्ती, काश्मिर, खजुराहो, राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्रात आढळतात. या सर्वच्या सर्व सामान्यत: स्थानकावस्थेत, चतुर्मुख आणि अष्टभुज अशा आहेत. प्रमाणबद्धता आणि देखणेपण ही यांची वैशिष्ट्ये म्हणावी लागतील. या सालंकृतही असतात. या सामान्यत: दहाव्या शतकातील व त्यानंतरच्या काळातील आहेत.

महाराष्ट्रात या मार्कण्डी (जि.चंद्रपूर) आणि कंकालेश्वर,बीड (जि.बीड) येथे मंडोवरावरील मागच्या देवकोष्ठात दिसतात.

मार्कण्डी येथील समपाद अवस्थेत उभ्या असलेल्या अष्टभुज मूर्तीच्या खालच्या उजव्या पहिल्या दोन हातात कमळ व जपमाला असून लगतच्या वरच्या तिसऱ्या हातात त्रिशूल, चौथा हात तुटक्या अवस्थेत आहे. मूर्तीच्या डावीकडील हातात श्रुव, चक्र, कमण्डलू आणि कमळ आहे. याशिवाय मूर्तीच्या पायाशी सप्ताश्व रथ सारथी अरुण चालवीत असल्याचे दिसते. डाव्या हाताने त्याने लगाम धरला आहे, तर त्याचे उजव्या हातात चाबूक आहे. अरुणाच्या पाठीमागे मूर्तीच्या पायाशी पृथ्वी (भूदेवी) उभी आहे. हिला महाश्वेता म्हणून ओळखतात. विशेष म्हणजे चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात हरिहरपितामहार्कच्या अनेक मूर्ती उपलब्ध आहेत.

वरील सर्व प्रकारच्या संमिश्र मूर्तींचा विचार केला, तर असे आढळते की या प्रतिमा शिव मंदिरावरील मंडोवरावर आहेत किंवा शिवमंदिर मुख्य असलेल्या त्रिदल मंदिरावर आहेत. हे पाहिले म्हणजे वैष्णवांशी जवळीक साधण्यासाठी शैवांनीच पुढाकार घेतला असावा असा अंदाज बांधता येतो. वैष्णव स्वत:ला सात्त्विक समजून शैवांना दूर ठेवत असावेत असेही त्यावरून म्हणता येते. त्यामुळेच शैवांची उन्नयनाची ओढ गोचर होते.

**पंचायतन :**

येथेच पंचायतनासंबंधीची संकल्पना स्पष्ट करता येईल. आयतन म्हणजे मंदिर, तेव्हा पंचायतन म्हणजे पाच मंदिरे. हे देव म्हणजे विष्णू, शिव, शक्ती,गणेश व सूर्य. उपासक ज्या देवाचा असेल त्या देवाचे मंदिर हे मुख्य मंदिर. ते विस्तृत ओट्यावर मध्यभागी असते व इतर चार देवांची तुलनेने लहान मंदिरे ओट्याच्या चार कोपऱ्यात



उभारायची असतात. महाराष्ट्रात जी दोन-तीन पंचायतने आहेत त्यापैकी आकाराने मोठे असे आहे ते सिन्नर (जि.नाशिक) येथे. ते गोंदेश्वर (गोविंदेश्वर) म्हणून प्रसिद्ध आहे. खजुराहो येथील लक्ष्मण मंदिर पंचायतन प्रकारचेच मंदिर होय. वैष्णव, शैव, शाक्त, गाणपत्य आणि सौर या पाचही पंथीयांच्या अनुयायांनी गुण्यागोविंदाने एकत्र राहावे, पंथीय अभिनिवेशरहितपणे राहावे या विचाराने ही पंचायतन पूजापद्धती आदिशंकराचार्यांनी मोठ्या द्रष्टेपणाने पुरस्कारिली होती.

| | | |
|---|---|---|
| १ शिव | | ३ गणेश |
| | २ विष्णू | |
| ४ देवी | | ५ सूर्य |

**अर्धनारी विष्णू :**

अर्धनारीश्वरशिव प्रतिमा व त्या रूपाच्या संबंधातल्या कथा सर्व परिचित आहेत. त्या प्रतिमापाहूनच इतर देवांच्या उपासकांनीही आपापल्या उपास्यांच्या तशा प्रतिमा घडविल्या. विष्णू, गणेश, कृष्ण यांच्या तशा प्रतिमा उपलब्ध आहेत. मात्र त्या संबंधीच्या कथा फारशा मिळत नाहीत.

अशा प्रतिमा मोठ्या प्रमाणात मिळत नाहीत हे खरे. काश्मिर आणि नेपाळमध्ये मिळालेल्या अशा मूर्तीचा उल्लेख मात्र करावा लागेल. शिल्परत्न या ग्रंथात अर्धनारी विष्णूचे वर्णन आले आहे.

सध्या बर्लिन येथील संग्रहालयात असलेली अर्धनारीविष्णू मूर्ती मुळात काश्मिर मधील आहे. डॉ.जोशींनी या मूर्तीचे वर्णन केलेले आहे. विष्णू आणि लक्ष्मी चतुर्भुज असून विष्णूने प्रदक्षिणाक्रमाने हातात पद्म, गदा, शंख व चक्र घेतले आहे तर लक्ष्मीच्या हातात पुस्तक, आरसा, सनालपद्म व घट आहे. विशेष म्हणजे अर्धनारीविष्णू, गरूडारुढ असून तो गरुड षड्भुज आहे. त्याने दोन हाताने विष्णूच्या पायांना आधार दिलेला आहे. दुसरे दोन हात नमस्कार मुद्रेत आहेत तर उर्वरित हातात शिंग (?) व घट धरलेला आहे. (प्रतापादित्य पाल, जर्नल ऑफ एशिआटिक सोसायटी ऑफ बेंगाल, १९६३,७३-९)

नेपाळमध्ये वासुदेव-कमलजा या नावाने अशा मूर्ती परिचित आहेत. या मूर्ती पनौती, पाटन व संखू येथील मंदिरात उपलब्ध आहेत. बासेल येथील 'म्युझिअम फ्यूर फोल्केरकुंडे' या संग्रहालयातील एका अशा धातुमूर्तीचे वर्णन डॉ.जोशी यांनी

केलेले आहे (१९७९.११३). यातील विष्णू अष्टभुज आहे. त्याने हातात वरमुद्रा, शंख, गदा, चक्र, पुस्तक, दर्पण, पद्म व कलश धरलेला आहे. शिलालेखांत तसेच शिल्परत्न, तंत्रसार या ग्रंथात लक्ष्मी-केशव, लक्ष्मी-वासुदेव या नावाने अर्धनारीविष्णूची ध्याने मिळतात.

**राधाकृष्ण :**

राधा-कृष्ण यांची नांवे एकत्र गुंफली गेलीत. राधेला वैष्णव संप्रदायात आराध्य देवतेचा मान आहे. ती कृष्णाची शक्ती आहे, प्रेयसी आहे. बंगालमध्ये राधेसह कृष्णाची एक मूर्ती प्राप्त झाली आहे. राधेची ही सर्वात प्राचीन मूर्ती असावी असे मानतात. डॉ.भांडारकरांच्या मते ही चौथ्या शतकातली असावी.

ब्रह्मवैवर्तपुराणात श्रीकृष्णाने 'हे राधे तू माझी देहार्धस्वरूप आहेस. तू ईश्वराची मूलप्रकृती आहेस' असे म्हटले आहे. राधा-कृष्ण म्हणजे सांख्यमताप्रमाणे प्रकृती व पुरूष. मधुराभक्तीमध्ये राधेला कृष्णाची ल्हादिनी शक्ती मानतात. (डॉ.भातखंडे, विश्वमोहिनी गीता, ३)

राधा स्वतंत्रपणे शिल्पातून कोठेही आढळत नाही. कृष्णासवेच ती दिसते. दक्षिणेतून एक प्रतिमा प्राप्त झाली आहे. ती मुरलीधरकृष्ण-राधेची संयुक्त मूर्ती आहे. खरे तर कृष्ण मुरलीधर आहे म्हणूनच त्याचे अर्धांग जे स्त्रीचे आहे ते राधेचे आहे असे मानले पाहिजे. वर ब्रह्मवैवर्तपुराणाचा दाखला दिलाच आहे 'राधा कृष्णाचे देहार्धस्वरूप' असल्याचा. जिवा-शिवाचे ऐक्य यापेक्षा अधिक प्रत्ययकारीपणे दाखविता येणार नाही.

**कल्याणसुंदरमूर्ती :**

शिवाची कल्याणसुंदरमूर्ती असते तशीच विष्णू-लक्ष्मी विवाहमूर्ती उपासकांनी घडविली. चतुर्भुज विष्णूने लक्ष्मीचा हात हातात घेतलेला असतो म्हणजेच विवाहविधीतील पाणिग्रहणाचा हा प्रसंग अशारीतीने शिल्पांकित केलेला असतो.

## विष्णु-लक्ष्मी

आपण असे पाहिले आहे की विष्णू हा जगाचे पालन पोषण करणारा देव आहे तसेच लक्ष्मी सुद्धा ऐश्वर्याची, संपत्तीची,समृद्धीची देवता आहे. पुराणातून सहाजिकच या दोहोंना एकत्र आणले गेले. या दोघांच्याकडून जगाचे पालनपोषण करण्याची, ते वैभवाप्रत नेण्याची, उपासकांचे ऐहिक जीवन सुखी करण्याची अपेक्षा आहे. ऋग्वेदाच्या खिलसूक्तात लक्ष्मीचा उल्लेख विष्णुपत्नी म्हणून आला आहे (१६.२५).



लक्ष्मीसह विष्णूच्या मूर्ती विविध गटांत विभागता येतील. त्या सामान्यत: आसनस्थ असल्या तरी क्वचित स्थानक म्हणजे उभ्याही असतात. काही सामान्यपणे एकमेकाशेजारी असतात तर बहुधा त्या आलिंगनमुद्रेत असतात. शिवाय नामभिन्नत्वानेही त्या आढळतात. उदाहरणार्थ लक्ष्मी-नारायण, लक्ष्मी-नरसिंह, केशव-लक्ष्मी इत्यादी. या आधी पाहिले आहेच की केशवनारायणादी चोवीस नावाने विष्णूस संबोधिले जाते, तेव्हा त्या प्रत्येक नावाच्या विष्णुप्रकारासमवेत असलेल्या शक्तीचे नांव मात्र लक्ष्मी नसते हेही लक्षात घेतले पाहिजे. या शक्तींची मेधा, तुष्टी, रती इत्यादी वेगळाली नांवे आहेत. अशा प्रतिमातून विष्णू चतुर्भुज असतो आणि लक्ष्मी बहुधा द्विभुज असते. क्वचितच ती चतुर्भुज असते. ती एकटी असते तेव्हा मात्र चतुर्भुज असते.

अशा मूर्तींच्या हातांच्या संख्येत काही ठिकाणी भिन्नता आढळते. उदाहरणार्थ काश्मिरातील अवन्तिस्वामी मंदिरात विष्णू-लक्ष्मी मूर्तीतील विष्णू सहा हातांचा आहे. त्याचे हातात गदा, माळा, मंजरी (की बाण), धनुष्य, कमळ असून डावीकडील मधल्या हाताने त्याने लक्ष्मीला आलिंगन दिलेले आहे. येथे विष्णूच्या उजवीकडे त्याची दुसरी पत्नी सत्यभामा आहे (जोशी १९७९,११०). या प्रतिमेजवळच चतुर्भुज विष्णु-लक्ष्मी आहे. हिचे वैशिष्ट्य असे की नेहमीच्या लांछनापैकी गदा व कमळ असले तरी दुसऱ्या हातात धनुष्य व बाण आहे; म्हणजे ही शार्ङ्गधर-लक्ष्मी अशी प्रतिमा म्हणता येईल.

याहून थोडी वेगळी प्रतिमा काश्मिरातच उपलब्ध आहे. येथे दोघेही चतुर्भुज आहेत आणि विष्णूच्या मांडीवर लक्ष्मी विसावली आहे. लक्ष्मीला मुळात चार हात होते आता दोनच शिल्लक आहेत. हे दोघे गरुडारूढ असून त्याच्या नमस्कारमुद्रेतील हातात अमृतकुंभ आहे. लक्ष्मी व गरुड यांची ही रूपे बहत्तंत्रसार (कलकत्ता आवृत्ति पृ.१९१), शारदातिलकतंत्र (जोशी १९७९.१११) यातील वर्णनाशी जुळतात.

महाराष्ट्रातही अशा प्रतिमा वेरूळ येथील लेणीत (क्र.१४,१६) आढळतात. रावण की खाई या क्र.१४ च्या लेण्यात विष्णू भूदेवी व श्रीदेवी (लक्ष्मी) यांचेसह बसलेला आहे. तसेच केवळ लक्ष्मीसह बसलेल्या विष्णूचीही प्रतिमा येथे आहे. द्विभुज लक्ष्मीने उजवा हात विष्णूच्या डाव्या मांडीवर ठेवलेला आहे. या जोडप्याच्या दोहोबाजूस दोन,दोन सेविका आहेत. येथील विष्णू चतुर्भुज आहे. ते दोघेही अर्धपर्यंकासनात बसलेले आहेत. अन्य ठिकाणी म्हणजे पेडगाव, रामलिंगमुद्‌गड, धुळे, कोल्हापूर इत्यादी गावातून देवळात वा वस्तुसंग्रहालयात त्या सव्यललितासनात विष्णू व वामललितासनात

लक्ष्मी अशा प्रकारे आलिंगनमुद्रेत बसलेल्या आढळतात.

चतुर्भुज विष्णूच्या हातांत जेव्हा दक्षिणाध:करक्रमाने शंख, पद्म, गदा, चक्र वा पद्माचे ऐवजी तलवार दाखविलेली असते आणि लक्ष्मी आलिंगन मुद्रेत असते तेव्हां ही प्रतिमा होते लक्ष्मीनारायणाची. या प्रमाणेच जेव्हा विष्णू-नृसिंहाच्या रूपात असतो तेव्हां त्याच्या हातातील आयुधे क्रमाने चक्रपद्मगदा नि शंख असतील तेव्हा ही जोडी लक्ष्मी-नृसिंहाची म्हणवली जाते. अशा मूर्ती महाराष्ट्रातही आहेत. दक्षिण भारतात अधिक प्रमाणात आहेत. पैकी हंपी येथील प्रचंड प्रतिमा प्रसिद्ध आहे. दुसरी आहे तेथीलच विजयीविठ्ठल मंदिरातील नरसिंहमंडपातील एका स्तंभावर. विष्णूच्या अनेक अवतारापैकी फक्त नृसिंहासहच लक्ष्मी असते (क्वचित वराहासवे). कदाचित यामुळेच नृसिंह अवतार आणि चोवीस मूर्तीपैकी एक नृसिंह हे एकच वाटतात. वस्तुत: चोविसापैकी एक असेल तर त्याला सिंहमुखी दाखवण्याचे काही प्रयोजन नाही. पैठण येथील काळभैरव मंदिरातील एका मूर्तीचा येथे मुद्दाम उल्लेख करावयास हवा. विष्णू-लक्ष्मी आलिंगनमुद्रेतील प्रतिमेत सामान्यत: लक्ष्मी द्विभुज असते हे आपण पाहिलेच आहे. पण या छोट्या मंदिरात पद्मासनात बसलेल्या चतुर्भुज विष्णूच्या डाव्या-उजव्या मांडीवर भूदेवी व श्रीदेवी (लक्ष्मी) बसलेली असून त्या चतुर्भुज आहेत. एवढेच नव्हे तर गरुडही चतुर्भुजच आहे. या शिवाय अष्टलक्ष्मींच्या (की अष्टसिद्धींच्या?) छोट्या प्रतिमा विष्णूच्या डोक्यावर आजूबाजूस कोरल्या आहेत, अष्टदिक्पाल वा दशावतार कोरतात, तशा.

****



# विष्णूचे वाहन गरुड

आपल्याकडे प्रत्येक देवतेचे एक वाहन मानलेले आहे. ब्रह्माचे वाहन हंस तर शिवाचे नंदी, गणेशाचे उंदीर तर सूर्याचे घोडा, तसे विष्णूचे वाहन होण्याचा मान गरुडाला मिळालेला आहे. वस्तुत: देव-देवतासमवेत जे प्राणी दाखविलेले असतात ते त्यांचे वाहन नसते तर चिन्ह वा लांछन असते. उदाहरण म्हणून गरुडच घेऊ या. गरूत्मन् अथवा सुपर्ण अर्थात सूर्य हे प्रकाशरूप विष्णुदेवतेचे चिन्ह आहे. पक्ष्यांप्रमाणे सूर्य आकाशात सर्वात उंच व जास्त चालतो/उडतो, म्हणून त्यास गरूत्मन् वा सुपर्ण व पक्ष्यांचा राजा म्हटले. पुढे पक्ष्यांचा राजा म्हणून गरुडाला ओळखले जाऊ लागले आणि विष्णूला मनुष्यरूप दिल्यावर गरुडाला त्याचे वाहन (चिन्ह) बनविले.

कथा : गरुड हे कश्यप आणि विनता यांचे अपत्य. महाभारतामध्ये या संबंधीची सविस्तर कथा आलेली आहे. (आदिपर्व,अध्याय २०-२४)

योग्य काल लोटल्यावर अंडे फोडून आई विनताच्या साहाय्यासाठी गरुड बाहेर पडला, जन्मापासून तो अग्नीसमान तेजस्वी, उच्चरवाने ओरडणारा, पिंगट डोळ्यांचा सुवर्णमय कांतीचा होता. मोठा भार (गुरुतर) घेऊन सहज उंच भरारी घेणारा म्हणून त्याला गरूड म्हणू लागले. तो सुंदर पर्ण म्हणजे पंखांचा म्हणून त्यास सुपर्ण म्हणतात. हरिवंशात पक्षी असूनही शेंडी (शिखा) व कानांत सोन्याची कुंडले घालणारा गरुड असे त्याचे वर्णन आले आहे.(४४.४१-४४)

गरुडाचा एक पराक्रम नोंदवला गेला आहे त्याचा अमृताशी संबंध आहे. महाभारतात त्याबद्दलची आलेली कथा अशी आहे :

कश्यपाला दोन बायका होत्या; विनता आणि कद्रू. एकदा त्यांच्या भांडणाला क्षुद्र कारण घडले. विनता म्हणाली समुद्रमंथनातून उच्चै:श्रवा घोडा बाहेर आला. तो शुभ्रवर्णाचा आहे. कद्रूने दुजोरा दिला पण म्हणाली त्याची शेपटी मात्र काळी आहे. याची शहानिशा करायची वेळ आली, तेव्हा खोटेपण उघडकीस येऊ नये म्हणून तिने आपल्या मुलांना-नागांना सांगितले की शेपटीला वेटोळे घालून राहा म्हणजे ती काळी दिसेल. हे तिच्या एकाच मुलाने ऐकले बाकीच्यांना तिने शाप दिला की ते सर्वजण अग्निसत्रात जळून जातील. कर्कोटकाने आईने सांगितलेले कार्य बेमालूमपणे पार पाडले. काळी शेपटी पाहून ठरल्याप्रमाणे विनताने कद्रूची दासी होण्याचे मान्य केले.

यथाकाल विनताचे पोटी गरुडाचा जन्म झाला. अर्थात त्यालाही दास्यत्व पत्करावे लागले. नागांची सेवा करणे त्याचे नशिबी आले. त्याने दास्यत्वातून आई विनताची सुटका होण्याचा उपाय नागांना विचारला, तेव्हा त्याला सांगण्यात आले की, स्वर्गातून अमृत आणून त्याने ते नागांना द्यायला हवे. गरुडाने स्वर्गावर स्वारी करावी, अमृतकुंभ त्याने नागांना द्यावा व विनतास दास्यमुक्त करावे हा त्या मागील विचार होता. त्याप्रमाणे झाले. अमृतकुंभ गवताच्या आसनावर ठेवला गेला. विनताची सुटका झाली. नागांनी ठरवले की स्नानोत्तर अमृतप्राशन करावे. ते स्नानाहून परतल्यावर पहातात तो कुंभ तेथे नव्हता (इंद्राने तो पळवला होता). नागांनी गवतच चाखले तेव्हा त्यांच्या जिभा चिरल्या गेल्या.

लक्षणग्रंथात गरुडाच्या स्वरूपासंबंधाची वर्णने आढळतात. विष्णुधर्मोत्तरपुराणात (३.५४.१-६) सांगितले आहे की गरुडाचे नाक कौशिक वा घुबडासारखे असावे, रंग लालसर असावा, डोळे गोल असावेत, पंख अर्थातच असावेत, तसेच त्याचे सामान्य दोन हात अंजलिमुद्रेत असावेत आणि दुसऱ्या दोन हातात छत्र व कुंभ असावा. त्याला या पुराणात तार्क्ष्य असे संबोधिले आहे. जर विष्णू गरुडारूढ असेल तर विष्णूच्या दोन्ही पायास याने हातांनी आधार दिलेला असावा. शुक्रनीतिमध्ये नररूप गरुडास मुकुट, अंगद, कवच असावे व त्याचे दोन हात अंजलिमुद्रेत असावेत असे म्हटले आहे.

गरुडाचे अंकन इसवीपूर्व पहिल्या शतकापासून होते आहे. मात्र ते पक्षी म्हणून. विष्णूचे वाहन म्हणून ते व्हायला लागले गुप्तकालापासून म्हणजे इसवीच्या चौथ्या शतकापासून. या शिल्पांकनाचे दोन प्रकार आढळतात. एक पक्षीरूपाचा आणि दुसरा मानवरूप पक्ष्याचा. पहिल्या प्रकारचे अंकन विदिशा जवळील उदयगिरी लेण्यातील महावराहाजवळील शेषशायीच्या शिल्पपटात आढळते. दुसऱ्या प्रकारातील शिल्पांकन देवगड (म.प्र.) येथील देवळावरील गजेन्द्रमोक्ष-शिल्पपटात दिसते. गरुडाची निरनिराळ्या प्रसंगातील शिल्पे आढळतात. (उदा.जुन्नर येथील लेणीच्या दर्शनी भागावर इत्यादी.) मात्र त्यांचे हे विष्णु-वाहन म्हणून झालेले अंकन नाही.

उत्तर भारतातील मध्यकालीन गरुड प्रतिमा साधारणत: दोन हातांच्या असतात. त्या सालंकृतही आहेत. कधी त्याचे हाती नाग असतो मात्र तो पाळल्यासारखा भासतो, शत्रुवत नव्हे. महाभारतकथेनुसार ह्या नागाचे सुमुख असे नाव आहे.



दक्षिणेत मानव-गरुड द्विभुज वा चतुर्भुजही असतो. महाराष्ट्रात गर्भगृहाच्या प्रवेशदाराचे आजूबाजूस गरुड व हनुमान असतात. येथे तो नमस्कारमुद्रेत उभा असतो. चोचीसारखे नाक व पंख असल्यामुळे तो गरुड म्हणून ओळखता येतो. १३ व्या शतकातील संत नामदेव रचित श्रीविठ्ठलाचे आरतीत 'गरुड हनुमंत सन्मुख उभे राहाती' असा उल्लेख येतो.

तत्पूर्वी घारापुरी लेणीतील कल्याणसुंदर शिल्पपटात गरुडाचे दर्शन घडते.शिव-पार्वतीचे विवाहास उपस्थित राहाण्यासाठी आलेल्या देवतामध्ये गरुडारूढ विष्णूही आहे.

**गरुडाची विविध शिल्पांकने :**

विष्णु-वाहन म्हणून गरुडाचे तीन प्रकारांत अंकन झालेले आढळते. **(एक)** गरुड-स्तंभ. विदिशा जवळ बेसनगर येथे विष्णुमंदिर इसवीपूर्व दुसऱ्या शतकात उभारले गेले होते. त्याचे समोर हेलिओडोरस या ग्रीकाने तो वैष्णव झाल्यावर एक गरुडस्तंभ उभारल्याचे त्यावरील अभिलेखावरून कळते. पंख पसरलेला उभा, प्रभावलयांकित गरूड त्यावर आहे. (महाराष्ट्रात असे स्तंभ काही ठिकाणी अगदी अलीकडच्या काळात उभारले गेलेत). **(दोन)** गरुड-मानवी पक्ष्यांच्या रूपात कधी शेषशायीच्या शिल्पपटात, तर कधी विष्णु-लक्ष्मी शिल्पपटात (लेणे १४, वेरूळ) तर कधी प्रतिहारी म्हणून दिसतो. एकटा गरुड कधी एक गुडघा टेकवून वीरासनात बसून, नमस्कार मुद्रेत विष्णूच्या पायाशी असणार तर क्वचित उभा असणार. कधी अशाच बसलेल्या अवस्थेत मूर्तीच्या पादपीठावर असणार. (अंजनेरी, बलसाणे, झोडगे, लोणार येथील मंदिरे) कधी त्याचे दोन हात नमस्कारमुद्रेत दिसतात तर कधी तो चतुर्भुजही असतो, (उदा.अर्धापूर जि.नांदेड येथे, तसेच नगर येथील वस्तुसंग्रहालयात) असा एकटा गरुड वैष्णव राजघराण्याच्या मुद्रावरही (seals) आढळतो. उदाहरणार्थ राष्ट्रकूट राजांच्या मुद्रावर, शिलाहारांच्या मुद्रावरील गरुड मात्र पद्मासनात बसलेला व पूर्णाकृतीत (केवळ उठावात नाही) असतो. द्वितीय भिल्लम, सिंघण, रामचंद्र या यादव राजांच्या मुद्रावरही पद्मासनी गरुड नमस्कार मुद्रेत दिसतो (वेलणकर,२००३,६०८). **(तीन)** गजेन्द्रमोक्ष वा करिवरद प्रकारच्या शिल्पपटात मात्र तो अनिवार्यपणे असतो. त्याला दोन वा चार हात असतात (लक्ष्मी-नारायण मंदिर, पेडगांव). तो अलंकार विभूषित असतो, मुकुटधारी असतो.

****

# वैष्णव शक्तिदेवता

**प्रास्ताविक :**

शक्तिदेवता फार प्राचीन काळापासून जगभर मान्यता पावलेल्या आहेत. मातृत्वाचा एकापरीने तो मानच होय. सृजनाची मातेच्यारूपात कृतज्ञतेपोटी केलेली ती उपासना होय. आज ज्यांची ओळख आदिमाता, मातृदेवी म्हणून केली जाते त्या शक्तिदेवतेची उपासना मध्य आशियायी देशात प्राचीन काळापासून प्रचलीत होती; ईजिप्तमध्येही होती. भारतात मातृदेवतेच्या प्रतिमा इसवी पूर्व २५०० पासून उपलब्ध आहेत. मात्र त्यांच्या रूपात परिवर्तन होत गेले. प्रारंभी त्या मातीत केल्या जात. नंतर त्या पक्वमृदा स्वरूपात घडविल्या गेल्या. त्या अर्थातच नग्न, मातृत्वलक्षणे उठून दिसतील अशा पद्धतीने केल्या जात, इत्यादी.

वैदिक काळात देवांचे महत्त्व दिसते तेवढे देवींचे नव्हते. देवमाता अदिति, उषा, पृथ्वी,श्री व यमी इत्यादी देवता वैदिक वाङ्मयात आहेत. मण्डुकोपनिषद् व केनोपउपनिषदात क्रमाने काली व उमा हेमवतीचा उल्लेख आहे. तर भद्रकाली, भवानी, दुर्गा या हिरण्यकेशी गृह्यसूत्रात नमूद केलेल्या आहेत. पुढे रामायणात आणि विशेषत: महाभारतात तसेच पाणिनी, कौटिल्य यांच्या ग्रंथात देवींचा उल्लेख येतो.

**लक्ष्मी :**

ऋग्वेदाच्या खिल सूक्तात लक्ष्मीचा उल्लेख विष्णू-पत्नी म्हणून आला आहे (२.६.२५). मूर्तिशास्त्रात विष्णुपत्नी म्हणून ओळखले जाण्याच्या आधीपासून लक्ष्मीची शिल्पांकने होत असल्याचे दिसते. प्रारंभी प्राचीन भारतीय नाण्यावर ती गोचर झाली. आहत नाण्यावर श्री, लक्ष्मी, गजलक्ष्मी या रूपात ती अवतरली. जोशींच्या मताप्रमाणे पांचाल शासक भद्रघोष याच्या नाण्यावरील कमळधारी देवी म्हणजे लक्ष्मी. तसेंच कुणिंदांच्या नाण्यावर असलेल्या, हरीण जवळ असलेल्या देवीला डॉ.बॅनर्जी लक्ष्मी म्हणूनच ओळखतात. कुषाण राजा वासुदेव याच्या नाण्यावर आढळणारी निधिश्रृंग व पाश धारण करणारी ऑरडोक्शो म्हणजे लक्ष्मीच. ऑरडोक्शो ही ऐश्वर्य, संतती, शस्त्र आणि विजय देणारी देवता आहे असे इराणी मंडळी मानतात. लक्ष्मीकडेही भारतीय उपासक याच भावनेने पहातात. पुढे इसवीच्या चौथ्या-पांचव्या शतकात गुप्तांच्या नाण्यावर ही कमलासना लक्ष्मी अवतरली. इतकेच नव्हे तर आत्ताही नाण्यांनाच लक्ष्मी मानले जाते हे आपण पहातोच आहो.



नाण्यावर आढळतात तशी मातीच्या ठशावरही लक्ष्मीची अंकने अगदी इसवीपूर्व दुसऱ्या शतकातही आढळतात. शुंगकालीन ठशावर लक्ष्मी, गजलक्ष्मी दिसतात. विशेष म्हणजे जैन, बौद्ध नि ब्राह्मण या तिन्ही संप्रदायात आदर असणारी ही देवी आहे. सांची व भार्हूत येथील बौद्ध स्तूपावर तद्वतच खंडगिरी येथील जैनगुंफात गजलक्ष्मीच्या प्रतिमा आढळतात. पुढे कुषाण काळातही लक्ष्मी व तिची ही रूपें वसुधारा आणि एकानंशा आढळतात.

समुद्रमंथनातून वर आलेल्या चौदा रत्नापैकी लक्ष्मी हे एक होय हे सर्वांना माहितीच आहे. तिने स्पर्धकांना वगळून विष्णूला वरले अशी कथा आहे. वैभव, ऐश्वर्य व संपत्ती यांची देवता असल्यामुळे सहाजिकच लक्ष्मीचे स्थान फार वरचे आहे. माणसाचे भौतिक जीवन समृद्ध करणारी ही देवता आहे ना ! गजलक्ष्मी, राज्यलक्ष्मी, विजयलक्ष्मी, कैवल्यलक्ष्मी, वैभवलक्ष्मी या विविधरूपात तिची उपासना होत असते. सर्व संप्रदायांच्या आदरास पात्र झालेली गजलक्ष्मी आर्यांना नि राक्षसांसाठीही उपास्य होती. रामायणातील वर्णनानुसार रावणाच्या पुष्पक विमानाच्या दारावर गजलक्ष्मी चित्रीत केलेली होती.

प्रारंभी ती डाव्या हाती लांब देठाचे पूर्ण उमललेले कमळ घेतलेली अशी आढळते. मात्र कमलमुख उपासकाकडे असते किंवा तिच्याकडे ते अशा रीतीने वळवलेले असते की ती पंख्यासारखा (पद्मव्यजन) त्याचा उपयोग करतेय असे वाटावे. लक्ष्मी कधी विष्णुसमवेत असताना द्विभुज असते तर क्वचित चतुर्भुजही असते. कमळ मात्र अनिवार्यपणे तिच्या एका हातात असते. शिवाय श्रीफळ वा महाळुंग कधी कधी असते. क्वचित दुसरा हात अभय वा वरदमुद्रेत असतो. कधी ती विष्णूसह गरुडारूढ असते. विशेषत: गजेन्द्रमोक्षप्रसंगी ती विष्णुसहगरुडारूढ दाखविलेली असते. अग्निपुराणात तिचे अष्टभुज आणि चतुर्भुज अशी वर्णने आली आहेत. ती आठ हाताची दाखवायची तेव्हां हातात धनुष्य, बाण, गदा, कमळ, चक्र, शंख, मुसळ, अंकुश असावे लागतात (४९/३०) आणि चार हाताची असेल तर शंख, चक्र, पद्म व गदा असणार. विष्णुधर्मोत्तरात तिला चार हात व त्यात सनाल कमळ, बिल्वफळ, शंख व अमृतघट सांगितले आहे.

**श्री :**

श्री या देवतेचा संदर्भ ऋग्वेदात येतो. तिथे श्रीसूक्त नावाचे एक परिशिष्टच आहे. त्यावरून असे दिसते की प्राचीन काळी लक्ष्मी व श्री या दोन वेगळाल्या देवता

मानल्या जात. वस्तुत: श्री व लक्ष्मी या दोहोचा अर्थ एकच आहे. हिचे द्विभुज असो की चतुर्भुज वर्णन असो हिला दोन वा चार हत्ती स्नान घालीत असल्याचे वर्णन येते. (गजलक्ष्मीसारखे). अशा मूर्ती मथुरासंग्रहालयात, महाबलिपुरम् एवढेच नव्हे तर तिबेट आणि जावा येथेही आहेत (खरे १९३९,१८१-८२). वाजसनेयी संहितेत श्री ही सौदर्याची आणि लक्ष्मी ही समृद्धीची देवता म्हणून उल्लेखिली आहे आणि या दोघींना पुरूषाच्या म्हणजे विष्णूच्या पत्नी मानले आहे (३१.२२).

**माया :**

माया नावाची मुळात असुरांची असलेली देवता होय. श्री व माया ही दोन्ही रूपे लक्ष्मीने आपल्या स्वरूपात सामावून घेतली. माया ही सुद्धा वैभवदायी, तेज, क्रांती आणि ऐश्वर्य यांची देवता मानली गेली होती. पुढे लक्ष्मीचे 'मा' असे नाव पडले ते हिचेवरूनच. एवढेच नव्हे तर पुढच्या पुराणकाळात अनेक छोट्या छोट्या देवी लक्ष्मीमध्ये अंतर्धान पावल्या. विष्णू अवतार घेतो तेव्हा लक्ष्मीही अवतार घेत असते. रामावतारात सीता म्हणून तर कृष्णावतारात ती रूक्मिणी म्हणून अवतरल्याचे मानले जाते. ही अर्थातच वैष्णव सांप्रदायिकांनी रूढ केलेली कल्पना असणार! (जोशी, १९८९, भगवान विष्णू,पृ.८)

**वसुधारा :**

हे लक्ष्मीचेच एक रूप आहे. मात्र कुषाण काळानंतर ही देवी सामान्यत: आढळत नाही. हिच्याजवळ संपत्ती निदर्शक घट असतो व हातात हिने दोन मासे एकत्र धरलेले असतात.

**गजलक्ष्मी :**

आता ही लक्ष्मीचीच एक अवस्था मानली जाते. पण प्रारंभीच्या काळात म्हणजे इसवीच्या पहिल्या-दुसऱ्या शतकात हिचे स्वतंत्रपणे अंकन केले जाई. सांची (विदिशा) येथील बौद्धस्तूपाचे तोरणद्वारावर हिचे असे अंकन आहे. ही आधी उभी व इसवीच्या सातव्या शतकानंतर बसलेल्या अवस्थेत शिल्पित केली गेली आहे. या काळापासून वैष्णव प्रतिमांच्या संदर्भात हिचे शिल्पांकन होऊ लागले. वेरूळ येथील 'रावण की खाई' या लेणीत एक भव्य शिल्पपट आहे त्यात ती सव्यललितासनात बसलेली आहे. द्विभुज आहे. दुर्दैवाने तिचे हात भग्न झाल्यामुळे हातातील वस्तूंचे आकलन होत नाही. तिचे आजूबाजूस असलेले चार हत्ती तिला अभिषेक घालीत



आहेत. हिच्या डावी उजवीकडे मुकुटधारी चतुर्भुज ज्या व्यक्ती हातात कुंभ घेऊन उभ्या आहेत त्या श्रीकृष्ण व बलराम (लेणे १४,वेरूळ) यांच्या आहेत आणि ते असतील तर मग या लक्ष्मीची ओळख एकानंशा अशी होते. अन्य कांहीच्या मते हे असे शिल्पांकन प्रतिकात्मक आहे. लक्ष्मी म्हणजे पृथ्वी आणि हत्ती म्हणजे मेघ. मेघांनी पृथ्वीला घातलेले स्नान पावसाचे सूचन करते. अन्न व औषधी आणि अन्य सर्व प्रकारच्या समृद्धीचे ते सूचक असते. अशा बैठ्या गजलक्ष्मीची अनेक शिल्पे वेरूळ येथील कैलास लेणीत आढळतात तसेच ते दशावतार लेण्यातही आहेत. शिवाय सामान्यत: चालुक्यकालीन मंदिराच्या गाभाऱ्याच्या प्रवेशदारावरही गजलक्ष्मीची प्रतिमा असते.

**भूदेवी :**

विष्णुपत्नी लक्ष्मी संबंधात वर विचार केलेला आहेच. श्रीदेवी आणि लक्ष्मी आधी वेगळाल्या समजल्या जात. कालांतराने त्या एकत्र आल्या. विष्णूची शक्ती म्हणून भूदेवी हिला मान आहे. हिची शिल्पांकने दोन प्रकाराने केलेली आढळतात. (१)वराहासमवेत (२) विष्णू समवेत. पुन्हा, वराहासमवेत ती असते तेव्हाही दोन प्रकारे तिची अंकने केलेली असतात.

(१) वराह अवतारात हिला समुद्रातून विष्णूने वर काढल्याची कथा सर्व परिचित आहे. वराह जेव्हां प्राणी अवस्थेत दाखवितात तेव्हां ही त्याच्या तोंडासमोर लोंबकळती दाखवितात. वराह या वेळी सामान्यत: 'यज्ञवराह' रूपात असतो. अशी शिल्पांकने रामटेक (जि.नागपूर), महालक्ष्मी मंदिर, कोल्हापूर आणि अन्य ठिकाणी आढळतात.

(२) वराह जेव्हां अर्धमानवी रूपात शिल्पीत केलेला असतो तेव्हां तो चतुर्भुज असतो आणि त्याने डाव्या खालच्या हातावर तिला धरलेले असते तसेच वरच्या हाताचाही तिला आधार दिलेला असतो आणि द्विभुज पृथ्वी/भूदेवीने एका हाताने त्याच्या सुळ्याचा आधार घेतलेला असतो. कधी ती बसलेली तर बहुधा उभीच असते. भारतीय शिल्पींनी धिप्पाड बांधेसूद देहाचा वराह आणि विविध विभ्रमातील भूदेवी यांच्या फार लोभसवाण्या प्रतिमा शिल्पसृष्टीला दिलेल्या आहेत. उदयगिरी लेणे (विदिशा जवळ), वेरूळ येथील क्र.१४,१५,१६ इत्यादी लेण्यात अशी शिल्पे आढळतात.

दुसऱ्या प्रकारात भूदेवी विष्णू व लक्ष्मीसह बसलेली दिसते. अशी एक प्रतिमा वेरूळ येथील लेणे १४ मध्ये एका भव्य शिल्पपटात आढळते. येथे तिघेही अर्धपर्यंकासनात बसलेले आहेत. विष्णू चतुर्भुज असून या दोघी द्विभुज आहेत. यांच्या

मागे दोन दोन सेविका आहेत. शास्त्रानुसार भूदेवी एकटी कधीही विष्णूसमवेत नसते. लक्ष्मी विष्णुजवळ असेल तेव्हांच भूदेवीही त्याचे जवळ असते. बहुतेक ग्रंथातून हिला द्विभुज दाखवावे असेच आहे आणि ती कमल(उत्पल)धारी असावी. विष्णुधर्मोत्तरात मात्र (अध्याय ६१,६५ इ.) हिला चतुर्भुज दाखवले आहे. त्या हातात रत्नपात्र, धान्यपात्र, औषधीपात्र व कमळ सांगितले आहे. मात्र तिचे असे शिल्पांकन कोठेही आढळत नाही (खरे, १९३९,१७३-७४)

**रेवती :**

ही बलरामाची पत्नी. हिच्या प्रतिमा महाराष्ट्रात इसवीच्या आठव्या शतकापासूनच्या मिळतात. मात्र ही एकटी कधीही दाखविली गेली नाही व हिचे व्यवच्छेदक असे लक्षणही नाही. ती बलरामासवे असते. बलराम नांगर, मुसळ इत्यादीसह दाखविला जातो. ही आलिंगनमुद्रेत त्याच्यासह बहुधा उभी असते. भोकरदन, जि.औरंगाबाद येथील लेण्यात ती अशी दाखवलेली आहे.

**रती :**

ही स्वतंत्र व मदनासह दाखविलेली असते. हिची महाराष्ट्रातली पहिली प्रतिमा वेरूळ येथील कैलास लेणीत आढळते. कैलासच्या दर्शनी भिंतीच्या मागील बाजूस कांही वैष्णव प्रतिमा आहेत. त्यातील एक आहे मदन-रतीची. दोघे आलिंगनमुद्रेत उभे आहेत. दोघांच्यामध्ये इक्षुदंड (ऊस) आहे. तो रतीने उजव्या हाती धरलेला आहे. तिचे डोक्याच्या वरच्या अंगास मकरध्वज आहे. कामेच्छा मगरीसारखी असते ह्याचे तो निदर्शन करतो. अशा मदन-रतीच्या अनेक प्रतिमा इसवीच्या ११ ते १३ व्या शतकातील मंदिरांच्या बाह्य भिंतीवर आढळतात. उदाहरणार्थ महालक्ष्मी मंदिर; कोल्हापूर, होट्टल, निलंगे, धर्मपुरी इत्यादी ठिकाणची मंदिरे. धनुष्य-बाण व इक्षुदंड हे त्यांचे आवश्यक लक्षण होय.

रतीच्या स्वतंत्र प्रतिमा होट्टल,जिल्हा नांदेड, तसेच रामप्पा मंदिर, जि.वरंगल येथेही आढळतात.

**मोहिनी :**

विष्णूनेच मोहिनीचे रूप घेतले होते अशी महाभारतात कथा आलेली आहे (१.१६.३९) तर भागवतपुराणात (१३.१७) ती भस्मासुरवध कथेत येते. समुद्रमंथनातून अमृत निघाले त्यावर ताबा मिळवण्यासाठी देव आणि दैत्यात भांडण लागले. तेव्हा



सुंदर नि आकर्षक अशा मोहिनीच्या रूपात विष्णूने अवतार घेतला, दैत्यांना भुरळ पाडली; त्यांच्यावर मोहिनी घातली आणि अमृत मिळवण्यास देवांना अवसर दिला अशी ती कथा आहे. मोहिनीचे शिल्प नागपूर येथील मध्यवर्ती संग्रहालयात आहे.

तर भस्मासुराने वर मागून घेतला होता की त्याला मरण फक्त त्याचेचकडून येऊ शकेल. अन्यासाठी तो अजेय आहे. तेव्हा तो उतला-मातला. कोणीही त्याला मारण्याइतके सामर्थ्यशील असणार नाही अशी त्याला खात्री. तेव्हा विष्णूने मोहिनीचे रूप धारण केले. नर्तनाचे द्वारे त्याला मोहित केले. मोहिनी नृत्यात हावभाव करील तसे तो करू लागला. त्याला भान राहिले नाही हे पाहून मोहिनीने डोक्यावर हात ठेवले. यानेही अनुकरण म्हणून आपले हात आपल्या डोक्यावर ठेवले अन् तो भस्मसात झाला; म्हणून तो भस्मासूर.

मोहिनीचे एक दुर्मिळ शिल्पांकन नगरच्या वस्तुसंग्रहालयात पहावयास मिळते. शेषशायी विष्णुपटाच्या वरच्या अंगास समुद्रमंथनाचा प्रसंग कोरलेला आहे. येथे शेषशायी आणि समुद्रमंथन प्रसंग यांचे मध्ये एक स्त्री प्रतिमा दिसते. तिने डाव्या हाताने एका घटाला स्पर्श केला आहे. हा घट मंदारपर्वताची मंथनासाठी जी रवी केलेली होती, तिच्या खालच्या टोंकाजवळ ठेवलेला आहे. म्हणजेच समुद्रमंथनातून बाहेर पडलेल्या अमृताचा तो घट आहे. (वेलणकर, २००३,५७८)

डॉ.वैशाली यांनी नागपूर येथील मध्यवर्ती संग्रहालयातील एका शिल्पाचे स्पष्टीकरण करताना त्यातील मोहिनीची ओळख प्रयासपूर्वक पटवून दिली आहे. मोहिनी कासवावर उभी आहे (मंदार-रवीला कासवाने टेकू दिला होता). तिचे हाती अमृतघट आहे. त्यातील अमृत ती विष्णूला देते आहे; अशा प्रसंगाचे हे शिल्पांकन आहे.

मराठीतील आद्य ग्रंथात मोहिनीराजाचा उल्लेख आहे. ज्ञानेश्वरीत आणि लीला चरित्रात (१८२). नेवासे येथे महालसेचे देवालय आहे. त्यालाच मोहिनीराज असे म्हणतात. या देवतेचे नेसूचेवस्त्र आणि अलंकार पहाता ते स्त्रीरूप आहे हे पटते.

**एकानंशा :**

ही श्रीकृष्ण व बलराम यांची बहीण (म्हणजे सुभद्रा) मानली जाते. हिचे शिल्पांकन इसवीच्या दुसऱ्या शतकापासून आढळते. ती वेरूळच्या लेणीत (क्र.१४ व २७) तसेंच जगन्नाथपुरी येथील मंदिराच्या गाभाऱ्यात आढळते. हिचे माहात्म्य ओडिसा व अन्यभागात खूपच आहे. जगन्नाथपुरी तर चारधामापैकी एक म्हणून मान्यता पावलेले

तीर्थक्षेत्र आहे. एकानंशेसंबंधीची अधिक माहिती अशी :

ही यशोदेच्या पोटी जन्माला आलेली कन्या. वसुदेवाने कृष्णाला गोकुळात नंदाचे घरी सोडले आणि हिला घेऊन तो मथुरेत परतला. कंसाचे हातून ही वाचली पण तिने कंसाला कृष्णाच्या असण्याबद्दल माहिती दिली. ही कथा तर प्रसिद्धच आहे. दुसऱ्या कथेप्रमाणे देवकीचे म्हणणे ऐकून कंसाने हिला मुक्त केले. पुढे ती यादव राजकुमारी म्हणून वाढली. हरिवंशात सांगितल्याप्रमाणे तिचे दुर्वास ऋषीसवे लग्न झाले. (जोशी, १९७९.२२०) भागवत संप्रदायाप्रमाणे ती वैष्णवी महामाया होती. एका मताप्रमाणे ती जंगली लोकांची आराध्या विन्ध्यवासिनी आहे तर दुसऱ्या मताने कृष्णाचा जीव वाचवणारी कृष्ण-बलरामाची बहीण म्हणून यादवांनी कुलदेवीच्या रूपात तिला उचलून धरले. ही नेहमी कृष्ण व बलराम या दोन भावांच्यामध्ये उभी असते. द्विभुज असते. हिच्या एका हातात कमल असते. एक हात अभयमुद्रेत असतो.

बृहत्संहितेत हिची तीन रूपे वर्णिली आहेत. एक द्विभुज, दुसरे चतुर्भुज नि तिसरे अष्टभुज. उजव्या हातात कमळ तर डावा कटिस्थित असे पहिले रूप तर कमळ, पुस्तक, वरदमुद्रा व अक्षमालाधारी हे दुसरे रूप. तिसरे रूप शैव परंपरेचे मानतात. त्यावेळी एकानंशाचे हाती धनुष्य, कमंडलू, कमळ, पुस्तक, वरद, बाण, दर्पण व अक्षमाला असायला हवी. येथे हे ही सांगायला हवे की एकानंशाचा कोणी भद्रकाली, उमा किंवा पार्वतीशी संबंध लावतात.

येथपर्यंत वैष्णवशक्तींचा विचार केला आता वैष्णवीची मंदिरे विचारात घेऊ या. महाराष्ट्रात विष्णूमंदिरे प्राचीन काळापासूनच उभारली गेली होती. त्यातील कांही नंतरच्या काळात शैव मंदिरात रूपांतरीत झाली. वैष्णवशक्तींची मंदिरे तुलनेने कमीच आढळतात.

महाराष्ट्रात वैष्णवीची म्हणजेच खरे तर लक्ष्मीची मंदिरे पाच-सहा ठिकाणी तरी आहेत. ही सर्व इसवीच्या अकराव्या-चौदाव्या शतकातली आहेत.

अन्वे (जि.औरंगाबाद), मेथी जि.धुळे, धोडांबे,जि.नासिक, देवळाणे,जि.नाशिक, रुक्मिणी मंदिर, पंढरपूर येथे ती मंदिरे आहेत.

अन्वे येथील मंदिर अपसमजाने शिवाचे समजून ते मढ नावाने ओळखले जाते. मध्यंतरीच्या पडझडीच्या काळात, मंदिरातील मूळ मूर्ती नाहीशी झाल्यावर गाभाऱ्यात शिवलिंगाची स्थापना केली गेली. हे मंदिर मुळात वैष्णव संप्रदायी आणि



विशेष म्हणजे वैष्णवीचे (लक्ष्मीचे) असले पाहिजे.

दुसरे वर उल्लेखिलेले महालसेचे म्हणजे मोहिनीराजाचे मंदिर. याचा उल्लेख ज्ञानेश्वरीत 'त्रिभुवनैकपवित्र। अनादि पंचक्रोशक्षेत्र । जेथ जगाचें जीवसूत्र । श्रीमहालया असे ।।१८.१८०३' असा केला आहे.

मेथी येथील लक्ष्मी मंदिराचा उल्लेख या संदर्भात बुध्द्या करायला हवा. येथे विष्णू आणि लक्ष्मी यांची मंदिरे स्वतंत्र असून दोन्हीही एकमेकाचे जवळ उंच ओट्यावर उभी आहेत.

दोन्हीही मंदिरांची बरीच पडझड झालेली आहे. विष्णूच्या मंदिरातील लेखानुसार ते भद्रहरीचे म्हणून ओळखले जाते. देवीच्या मंदिरातील अवशिष्ट देवकोष्ठातून देवीच्याच प्रतिमा आहेत. विशेष म्हणजे अंतराळातील देवकोष्ठात एकात पार्वतीची तर दुसऱ्यात सरस्वतीची प्रतिमा आहे. गाभाऱ्यात अर्थातच महालक्ष्मीची मूर्ती प्रतिष्ठापित आहे. ती समचरण अशी उभी असून चतुर्भुज आहे. तिचा उजवा खालचा हात अभयमुद्रेत असून उरलेल्या तीन हातात तिने क्रमाने तलवार, ढाल आणि पात्र धरलेले आहे. (पन्हाळे काजी येथील लेणे २९ मधील देवीची प्रतिमा अगदी अशीच आहे, विशेष म्हणजे तिच्या पायाशी गरूड आहे.) याचाच अर्थ असा की मेथी येथील ही मूर्ती महालक्ष्मीचीच (भद्रकाली) आहे. या देवळाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. गाभाऱ्याच्या मागील भिंतीच्या भद्रभागी लक्ष्मीसह वैकुंठाची आसनस्थ प्रतिमा आहे.

पंढरपुरातही श्रीविठ्ठलाचे म्हणजे विष्णूचे मंदिराशेजारीच रुक्मिणीमातेचे मंदिर आहे. रुक्मिणीचे दोन्ही हात कटिस्थित असतात श्रीविठ्ठलाचे असतात तसे (करकटावरी ठेऊनीया - संत तुकाराम)

धोडांबे येथेही विष्णूच्या मंदिराशेजारीच लक्ष्मीचे मंदिर आहे. आज मूर्ती गाभाऱ्यात नाही, पण शास्त्रातील अडाख्याप्रमाणे ते लक्ष्मीचे मंदिर असल्याचे अनुमान करता येते.

विष्णूची केशव-नारायणादी चोवीस रूपे पाहिली. शक्तींची नांवे बृहत तंत्रसार मध्ये दिली आहेत. नारदपांचरात्रागमात केवळ चौदा नांवे आल्याचे श्री.गोपीनाथ राव यांनी दाखविले आहे (इलेमेंटस् ऑफ हिंदू आयकानोग्राफी,खंड १,भाग१,२३३). अन्वे (जि.औरंगाबाद) येथील मंदिराच्या मंडोवरावरील या एकूण चोवीस शक्तिरूपापैकी पांच शक्ती ओळखू येत नाहीत एवढेच. खालील सारणीत (प्रतापादित्य पाल,१९८५,

वैष्णव आयकानॉलॉजी इन नेपाळ) अधोक्षज, अच्युत व उपेन्द्र यांच्या ऐवजी वा यांच्या जागी वैकुंठ, विश्वरूप व मुकुंद यांच्या शक्तींची नांवे आढळतात.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| केशव | = | किर्ती | वासुदेव | = | लक्ष्मी |
| नारायण | = | कांती | संकर्षण | = | सरस्वती |
| माधव | = | तृष्टी | प्रद्युम्न | = | प्रीती |
| गोविंद | = | पुष्टी | अनिरूद्ध | = | रती |
| विष्णू | = | धृती | पुरूषोत्तम | = | वसुधा |
| मधुसूदन | = | शांती | अधोक्षज | = | ? |
| त्रिविक्रम | = | क्रिया | नरसिंह | = | विद्युता |
| वामन | = | दया | अच्युत | = | ? |
| श्रीधर | = | मेधा | उपेन्द्र | = | ? |
| हृषीकेश | = | हर्षा | जनार्दन | = | उमा |
| पद्मनाभ | = | श्रद्धा | हरि | = | शुद्धी |
| दामोदर | = | लज्जा | श्रीकृष्ण | = | बुद्धी |

****



## विष्णूमूर्तींच्या समवेतच्या काही प्रतिमा, काही प्रतीके

काही विष्णुमूर्तींच्या समवेत रथिकेमध्ये विद्याधर, गंधर्व, किन्नर, अप्सरा इत्यादींचे शिल्पांकन आढळते. काही जणांना या शिल्पांची ओळख पटत नाही व त्यासंबंधीचा उलगडा होत नाही. येथे त्यांचा विचार करायचा आहे.

**विद्याधर :**

विद्याधर म्हणजे मंत्र, सूक्ते इत्यादी धारण करणारा. शब्दकल्पद्रुमामध्ये यांना काश्यपवंशाचे म्हटले आहे. विद्याधरांचे शैवेय, विक्रान्त आणि सौमनस असे प्रकार आहेत. वाल्मीकी रामायणात विद्याधर मिथुने आणि विद्याधर महर्षीचे सुंदर वर्णन आलेले आहे. कथासरित्सागरात यांच्याबद्दलच्या कथा आल्या आहेत. अग्निपुराणात (५१.१७) देवतामूर्तींच्या मस्तकाच्या दोहोबाजूस आकाशात विहरणाऱ्या, हातात पुष्पमाला घेतलेल्यांना मालाविद्याधर असे म्हटले आहे. शिल्पाकृतीमध्ये विद्याधरांना ओळखण्यासाठी हे लक्षण महत्त्वाचे ठरते. त्याने दोन्ही हातात पुष्पमाला धरलेली असते वा एका हातात फुलांची परडी व दुसऱ्या हाताने देवतेला नमस्कार करीत असलेले ते दिसतात. इसवीपूर्व दुसऱ्या शतकापासून ह्यांची शिल्पांकने आढळतात मात्र इसवीच्या पांचव्या-सहाव्या शतकापासून ते सपत्निक दिसतात.

**गंधर्व :**

ऋग्वेदात गंधर्व शब्द अनेक वेळा आला आहे. वसंतातल्या फुलाने डंवरलेल्या वृक्षाशी संबंधित एकाच गंधर्वाचा अप्सरांशी संबंध आल्यामुळे त्यांची संख्यावृद्धी झाली. त्यांचा आकाशाशी व सूर्याशीही संबंध मानतात. तैत्तिरीय आरण्यकात मनुष्य-गंधर्व व देव गंधर्व यांचा उल्लेख आहे (जोशी,२००१.३). विष्णुपुराणात तसेच अग्निपुराणात गंधर्वांच्या उत्पत्तीसंबंधीच्या कथा आल्या आहेत. मत्स्यपुराणानुसार नृत्य, गायन, वादन, देवतास्तुती व विशेष प्रसंगी पुष्पवर्षाव यात गंधर्व दंग असतात (२५८.२५).

कलेच्या माध्यमातून गंधर्वाचे शिल्पांकन कशा स्वरूपाचे आहे, हे पहाणे आपणास विशेष अभिप्रेत आहे. साहित्यातून आलेल्या वर्णनातून विद्याधर आणि गंधर्व यांची वेगळाली ओळख होणे किंचित कठीण आहे. मात्र कलेमध्ये गंधर्व वाद्यासहित, अप्सरासमवेत दाखविले जातात म्हणून त्यांची ओळख सुकर होते. कांही वेळा हातात जलकुंभ घेतलेले गंधर्व कलेत आढळतात. कनोज येथे मिळालेल्या विष्णुमूर्तीच्या वरच्या

अंगास दोन जलकुंभ घेतलेला एक गंधर्व आकाशात उडत असलेला दिसतो.

**किन्नर वा किंपुरूष :**

खरे तर हे शब्दच प्रश्नार्थक आहेत -काय नर आहे काय? पुरूष आहे काय? असे ते प्रश्न आहेत. असे दिसते की मनुष्यासवे पशु वा पक्षी येथे अभिप्रेत आहे. रामायण, महाभारत या आर्षकाव्यात यांचे उल्लेख आहेत. पुराणात यांना नृत्य-गीत-प्रगल्भ असे संबोधिले आहे. एक प्रकारच्या वीणेला किन्नरी वा लघुकिन्नरी म्हणतात हे आपणास माहिती आहे. यावरूनही असे दिसते की यांचा वादनाशी संबंध असावा.

किन्नराचे शिल्पांकन तसेच चित्रांकन झालेले आढळते. इसवीच्या प्रारंभीच्या शतकातील किन्नर प्रतिमा मथुरा व अमरावती येथून उपलब्ध झाल्या आहेत. हे कधी अश्वमुखी असतात तर कधी मानवमुखी मात्र कमरेखालचा भाग पशू वा पक्ष्याचा असतो. पंखही असतात, आणि हातात एखादे वाद्य. कधी हे एकटे तर कधी पत्नीसह असतात. अजिंठे येथील लेणीत किन्नर मिथुन चित्रांकित आहे, तर वेरूळच्या कैलास लेण्यातील सभामंडपातील स्तंभावर हे मिथुन शिल्पांकित केलेले आहे. पंढरपूर येथील श्रीविठ्ठलाच्या देवळाच्या नव्याने उघडकीस आलेल्या पायऱ्यांच्या कठड्यांच्या एका बाजूस किन्नर व दुसऱ्या बाजूस किन्नरी आहे, दोघेही वादनात मग्न आहेत.

**अप्सरा :**

रंभा, मेनका, तिलोत्तमा, उर्वशी या अप्सरांचे उल्लेख संस्कृत साहित्यातून आल्यामुळे यांचा परिचय बहुतेकांना असतोवेदात मात्र उर्वशी या अप्सरेचाच फक्त उल्लेख आहे (७.३३.११; जोशी,२००१.६) निघण्टु प्रमाणे अप् + सृ किंवा अप् + सारिणी म्हणजे पाण्यातून उद्भूत झालेल्या असा अर्थ होतो. समुद्रमंथनाच्या कथेद्वारा आपणास माहिती आहेच की त्यांची उत्पत्ती सागरातून झालेली आहे. यांना गंधर्वाच्या पत्नी म्हणूनही मान्यता आहे. त्या नृत्यांगनाही होत. पुराणात यांचे उल्लेख आहेतच आणि हरिवंशात एकूण तीस अप्सरांची नांवे आली आहेत. इंद्राच्या सांगण्यावरून त्या पृथ्वीवर येत होत्या असा समज आहे.

**जय-विजय :**

विष्णूचे प्रतिहारी वा द्वारपाल म्हणून यांची योजना केलेली असते. ऋषींच्या शापामुळे यांना असुरांच्या जन्माला यावे लागले होते. पुढे विष्णूच्या नृसिंहादी अवतारांच्या वेळी यांचा उद्धार झाल्याचे सांगितले जाते. विष्णूच्या मूर्तीचे दोहो अंगास



हे दाखविले जातात, तसेंच विष्णुमंदिराच्या वा गाभाऱ्याच्या दोहो बाजूस हे उभे असतात. पंढरपूर येथील श्रीविठ्ठलाचे गाभाऱ्यात प्रवेशताना हे आढळतात.

**असुर :**

विष्णूशी संबंधीत काही असुर सर्वज्ञात आहेत. त्यांचे शिल्पांकनही पहाण्यास मिळते. हिरण्यकशिपूचा उल्लेख या संबंधात पहिल्या क्रमांकाने पहिला लागतो.नृसिंह अवताराच्या दृश्यात हा कधी विष्णूशी दोन हात करताना दाखविला जातो तर बहुधा विदरण प्रकारच्या नृसिंहमूर्तीच्या मांडीवर हा असहाय अवस्थेत आडवा पडलेला दिसतो. याने ब्रह्मदेवाकडून अनोखे वर मिळवले होते. त्यामुळे विष्णूला मोठ्या कल्पकतेने त्याचा निःपात करावा लागला होता.

**बली :**

वामनावताराच्या कथेतून व दृश्यातून हा आढळतो. देवांच्या हितासाठी विष्णूने त्रिविक्रमाचे रूप घेऊन दानशूर बलीस शब्दजालात अडकवून पाताळात डांबले. वेरूळ येथील दशावतार लेण्यात वामनाच्या हातावर दानोदक सोडत असलेला बली दिसतो. असेंच बाराव्या शतकातील शिल्प धर्मापुरी (जि.बीड) येथे केदारेश्वराचे मंदिरावरही आहे. दोन्ही शिल्पे कलेच्या दृष्टीने वाखाणणीय आहेत.

**रावण :**

मूर्तिशास्त्रानुसार शिवाच्या अनुग्रहमूर्तींपैकी एक असते रावणानुग्रहमूर्ती. वैष्णव प्रतिमासंबंधात रावणाचा विचार क्वचितच केला जातो. मात्र रामावताराचे वर्णन रावणाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. हा विद्वान ब्राह्मण होता पण वत्तीने असुर होता. गानकलेत प्रवीण होता. व्यक्तिमत्त्वाच्या अशा विविध पैलूमुळे त्याला दशमुखी आणि वीस हातांचा मानतात. तसा तो शिल्पातही आढळतो. काही ठिकाणी हा एकमुख व द्विभुज, चतुर्भुज, षड्भुज असाही दिसतो. विशेष म्हणतजे रावणाच्या तोंडापैकी एक तोंड गाढवाचे दाखवल्याचेही आढळते. अशा त्याच्या प्रतिमा इसवीच्या सहाव्या शतकापासून शिल्पांकित केलेल्या आहेत. मात्र त्याचा शिल्पसाहित्यात उल्लेख सापडत नाही.

रामकथा प्रसंगात तो अनेक ठिकाणी दिसतो. वेरूळच्या कैलास लेणीतील रामायणकथा पट्टिकात शूर्पणखेचें गाऱ्हाणे ऐकणारा, साधूच्या वेषात भिक्षा मागणारा, जटायूचे पंख छाटणारा व रामाशी लढताना दिसतो. गडचिरोली जिल्ह्यातील मार्कण्डी

येथेही रामायण संबंधीत प्रसंगात त्याचे शिल्पांकन झालेले आहे.

**ऋषी :**

विष्णुमूर्तींशी संबंधित दोन ऋषी म्हणजे नारद आणि तुंबरू. नारद हा ब्रह्माचा कनिष्ठ मानसपुत्र मानला जातो (मत्स्यपुराण ३.८; जोशी,२००१.४५). पुराणांनी नारदमुनीना विविध भूमिकात रंगवले आहे, कलहप्रिय, परमभागवत, दार्शनिक, भक्तिशास्त्रनिष्णात, संगीताचे आचार्य असे त्यांचे वर्णन मिळते. त्यांच्या हातात सदैव वीणा असते, ह्या वीणेचे नांव आहे महती. असे म्हणतात की अग्नी, ब्रह्मा, सोम आणि विष्णू यांनी क्रमाने षड्ज, ऋषभ, गंधार व मध्यम स्वरात गायन केले, नारदानी पंचम स्वर स्वीकारला.

नारदाचे वर्णन तुंबरू शिवाय पूर्ण होत नाही. ही जोडगोळी आहे. तुंबरू हा कश्यप व प्रधा यांचेपासून झालेला एक गंधर्व. इन्द्रसभेतील रत्नापैकी हे एक आहे. तुंबरू हा वीणावादनप्रवीण म्हणून मान्यता पावलेला गंधर्व होय. याच्या वीणेचे नाव कलावती वा तुंबरूवीणा. याने धैवत व निषाद हे दोन स्वर सिद्ध केले.

शिल्पशास्त्राप्रमाणे तुंबरूला घोड्याचे तोंड दाखवायचे असते. मागे हयग्रीवाचे वर्णन अश्वमुखी असेच केले आहे आणि हे दोघेही गायनाचार्य म्हणून मानले जातात.घोड्याचा व संगीताचा संबंध या रूपकाचा अर्थ लागल्याशिवाय कळणार नाही.

नारद-तुंबरू इसवीच्या पांचव्या शतकापासून गायनाशी संबंधित असल्याचे आढळते. मध्य व अर्वाचीन काळात काही वैष्णव मंदिरात ही जोडी शिल्पांकित केलेली आढळते. भोगस्थानक विष्णुमूर्तीत हे दोघे दाखविल्यास ती उत्तम परिवारी मूर्ती समजावी असे पांचरात्र ग्रंथात सांगितले आहे.

**पृथ्वी, समुद्र आणि नदी :**

यांचाही विष्णूशी वा त्याच्या अवतारांशी कोठे ना कोठे संबंध आलेला आहे. कधी यांना मानवरूपात तर कधी प्राकृतिक रूपात शिल्पांकित केलेले असते. पृथ्वी पंचमहाभूतापैकी एक असल्यामुळे तिची स्वतंत्रपणे उपासना अभिप्रेत आहेच पण उपदेवता वा लोकदेवता म्हणूनही तिचे पूजन केले जाते. पुराणांनुसार विष्णूचे पृथ्वीशी घनिष्ठ संबंध आहेत. भूदेवीच्या रूपात ती विष्णूपत्नीच होय. वेरूळ येथील क्र.१४ लेण्यात श्रीविष्णूच्या आजूबाजूस भूदेवी व श्रीदेवी दाखविल्या आहेत. दक्षिण भारतात अशा अनेक मूर्ती आहेत. वराह अवतारांत विष्णूने पृथ्वीला समुद्रातून वर



काढल्याचे सर्वांना माहितच आहे. सवत्स धेनू ही पृथ्वीचे प्रतीक मानले जाते. काही वेळा विष्णूच्या पायापुढे पृथ्वी स्त्री रूपात दाखविलेली असते. तिचे वर्णन 'पादमध्यगा' असे केले जाते. येथे ती महाश्वेता म्हणून ओळखली जाते.

समुद्राचे उल्लेख पुराणात आढळतातच. त्यांचे शिल्पांकनही कलेत दिसते. ते प्राकृतिक स्वरूपात वा मानव रूपात असते. इसवीच्या पांचव्या शतकातील विदिशेजवळील उदयगिरी लेण्यात सर्व प्रथम समुद्र दिसतो. तेथील महावराहनामक लेण्यात हातात जलकुंभ घेतलेला सालंकृत समुद्र आढळतो तसेंच लाटांच्यारूपातही वराहाच्या पायाशी तो दिसतो (हर्ले, गुप्त स्कल्प्चर्स, चित्र १३). जलकुंभधारी चार पुरूष दिसतात, ते चार समुद्राची प्रतीके असतात. शेषशायीच्या प्रतिमेत समुद्राचे शिल्पांकन असते.

नद्या वैष्णवमूर्तिंशीही संबंधित आहेत. गंगा-यमुना यांची शिल्पे तर विष्णूमंदिराच्या गाभाऱ्याच्या प्रवेशद्वाराशी असतातच. नवजात कृष्णास वसुदेव नंदाघरी नेऊन सोडतानाच्या प्रसंगात किंवा कालियादमन प्रसंगात यमुना शिल्पांकित केलेली असते. मकरवाहिनी गंगा व कूर्मस्थित यमुना उदयगिरी (म.प्र.) येथील लेण्यात सर्वप्रथम आढळतात. या दोन्ही स्त्रीरूपात समूर्त झालेल्या असून त्यांचे हाती घट आहे.

पद्मपुराणात उल्लेख आहे की इन्द्राच्या सभेत पंचवीस नद्या उपस्थित होत्या. नीलमतपुराणात कितीतरी नद्यांच्या वाहनांची नावे आली आहेत. उदाहरणार्थ गंगा-मकर, यमुना-कासव, सरस्वती-महिष, इरावती-हत्ती, सिंधू-वाघ, नर्मदा-मयूर इत्यादी पण आपणास प्रस्तुत अधिक खोलवर विचार अभिप्रेत नाही.

**कीर्तिमुख :**


वस्तुत: कीर्तिमुखाचा संबंध शिवाशी अधिक आहे. पद्मपुराणानुसार राहू जालंदराच्या रूपात शिवाला अपमानास्पद बोलतो, तेव्हां क्रोधदग्ध झालेल्या शिवाच्या कपाळातून एक भयंकर प्राणी जन्मतो. त्याने जालंदरावर हल्हा केला तेव्हां शिवाची याचना केल्यावर त्याची सुटका होते. या भयंकर प्राण्याने शिवाकडे खाद्य मागितल्यावर 'तू स्वत:लाच खायला लाग' असे त्याला सांगितले जाते. तो शिवाज्ञेप्रमाणे आपलेच हात-पाय खातो. फक्त तोंड उरते तेव्हां शिव त्याची आज्ञाधारकता पाहून त्याला थांबवतात व त्याला 'किर्तिमुख' म्हणून संबोधतात.

प्रारंभी सिंहमुखी, उग्र, वटारलेल्या डोळ्यांचा, केस पिंजारलेला असा हा


दाखविला जाई आणि शिवमंदिराच्या गाभाऱ्याच्या उंबरठ्यावर याचे शिल्पांकन केले जाई. कालांतराने या सिंहमुखाला दोन शिंगे जोडली गेली. डोळे बटबटीत व बाहेर आलेले, तोंडावाटे जिभ लवलवती असे याला दाखविले जाऊ लागले. कलेत एक रूपक म्हणून याचे स्थान निर्माण झाले. मध्ययुगापर्यंत याची लोकप्रियता वाढली. आता उंबरठ्यावरच केवळ नव्हे तर स्तंभांच्या मध्यभागी, वितानांच्या कोपऱ्यांत इतकेच काय तर देवतामूर्तींच्या पृष्ठशिळेवर वरच्या टोंकास कीर्तिमुख कोरले जाऊ लागले नि शिखरांच्या रहपगावर टोंकाशीही हे दिसू लागले आणि सर्व देव-देवता व त्यांची मंदिरे यावर याला स्थान प्राप्त झाले. याला 'ग्रास' असेही एक नाव मिळाले.

****





ब्रह्मेशानजनार्दनार्क



विश्वरूप



श्री व सरस्वतीसह विष्णू



विष्णू-लक्ष्मी आलिंगन मूर्ती



गजलक्ष्मी



एकनंशा-विष्णू व बलरामासह



गरुड



वैकुंठ



प्रद्युम्न अठरा हाताचा विष्णू (विश्वरुप?) हयग्रीव



बलराम रेवती




हयग्रीव



स्थानक विष्णू-लक्ष्मी



प्रद्युम्न



कुर्म



त्रिविक्रम



सरस्वती



लक्ष्मी

# मूर्तिशास्त्रीय परिभाषा

प्राचीन काळी मूर्ती जेव्हा घडविल्या जाऊ लागल्या तेव्हा अर्थातच त्यांची वैशिष्ट्ये वा व्यवच्छेदक लक्षणे ठरलेली नव्हती. कालांतराने दैवतशास्त्र विकसित झाले, संप्रदाय निर्माण झाले. त्यांनी आपापल्या अधिदैवतांची वैशिष्ट्ये, आयुधे आणि लांछने ठरविली. हळूहळू त्याचे शास्त्रच तयार झाले. त्यावरील अनेक ग्रंथ तयार झाले. मग मूर्तिकारांनी त्याप्रमाणे मूर्ती घडविण्यास प्रारंभ केला. मूर्तीच्या अवस्था कशा असाव्यात, त्यांच्या हाती कोणत्या वेळी कोणती आयुधे असावीत, त्यांचे भाव कोणते असावेत, उंची कुणाची किती असावी इत्यादींचे व्याकरणच ठरले म्हणा ना ! या सर्वासंबंधीचा विचार येथे अभिप्रेत नसला तरी वैष्णव देवताविषयीचा विचार करावा लागेल; म्हणजे मूर्तींची ओळख चटकन होऊ शकेल.

१) मूर्तीची बिंब, प्रतिबिंब, विग्रह, बेर, प्रतिमा ही पर्यायवाचक नांवे आहेत.

२) मूर्ति प्रकार : (१) चल, अचल, चलाचल

(२) दृश्य, अदृश्य, दृश्यादृश्य म्हणजेच व्यक्त, अव्यक्त, व्यक्ताव्यक्त

(३) आसन, स्थानक, शयन,यानक

(४) योग, भोग, वीर, अभिचार

(१) या प्रकारात एका जागेवरून दुसरीकडे नेता येणाऱ्या म्हणजे चल, तर गाभाऱ्यात वा अन्यत्र प्रतिष्ठापित केलेल्या म्हणजे अचल आणि काही सामान्यत: अचल पण उत्सव-महोत्सव प्रसंगी मिरवणुकीत इत्यादी नेता येणाऱ्या म्हणजे चलाचल मूर्ती येतात. यात पुन्हा उपप्रकार असतात. चल प्रकारच्या मूर्तींचे उपभेद असे :

| | | |
|---|---|---|
| (१) स्नपनबेर | - | अभिषेकासाठी |
| (२) बलिबेर | - | दैनिक पूजोपचारासाठी |
| (३) उत्सवबेर | - | उत्सवातल्या मिरवणुकीसाठी |
| (४) कौतुकबेर | - | प्रासंगिक पूजेसाठी |

अचलमूर्तींचेही काही उपप्रकार आहेत. ते मूर्तीच्या अवस्थेवर आधारीत असतात. या मूर्ती सामान्यत: पाषाणाच्या नि आकाराने मोठ्या असतात. त्यांना ध्रुवबेर वा मूलविग्रह म्हणतात. या उभ्या (स्थानक), बसलेल्या (आसन) वा पहुडलेल्या (शयन) असतात. यानक म्हणजे वाहनारूढही असतात. विष्णूची शेषशायी प्रतिमा म्हणजे

शयन प्रकारची मूर्ती. दक्षिणेत श्रीरंगम् व तिरूअनंतपुरम येथे शेषशायी विष्णूचे प्रचंड ध्रुवबेर गाभाऱ्यात आहेत. यातही स्थानकमूर्ती या समभंग, आभंग, द्विभंग, त्रिभंग, आणि देहुडापाद पद्धतीने उभ्या असलेल्या दाखवितात तसेच आसनमूर्ती या अर्धपर्यंक, ललित, प्रलंबपाद, उत्कटित, पद्म, वज्र, योग, सुखासन इत्यादी प्रकारच्या बसलेल्या अवस्थेत तसेच, महाराजलीला, वीर इत्यादी प्रकारात आढळतात. या सर्वांचे निर्देशन रेखाचित्रांचे द्वारे अन्य ठिकाणी केलेले आहे.

(२) व्यक्त प्रकारच्या मूर्ती म्हणजे सामान्यत: मानवी रूपातल्या मूर्ती. अव्यक्त म्हणजे प्रतीकात्मक, उदाहरणार्थ शालग्राम आणि व्यक्ताव्यक्त म्हणजे काही भाग दृश्य व कांही अदृश्य अशी मिश्र प्रकारची मूर्ती. उदाहरणार्थ मत्स्य व कूर्मावताराच्या प्रतिमा, ज्यात अर्धा भाग मासा वा कासवाचा व वरचे अर्धे शरीर मानवी, ज्याच्या हाती शंख, चक्रादी असतात.

(३) उपासकांच्या कामनापूर्तीसाठी मंत्रशास्त्राधारे केलेले विष्णुमूर्तींचे वर्गीकरण असे:

अ. योगमूर्ती : उपासना, ध्यानधारणा, अध्यात्मसिद्धी व नि:श्रेयस

ब. भोगमूर्ती : ऐहिक ऐश्वर्य, सुखसमृद्धीसाठी

क. वीरमूर्ती : सामर्थ्य प्राप्तीसाठी आणि

ड. अभिचारिकमूर्ती : जारणमारण, जादुटोणा इत्यादी (अशा प्रतिमा गावात स्थापायच्या नसतात.

## मूर्तींचे त्रिगुण :

सांख्यशास्त्रानुसार सत्त्व, रज व तम असे प्रकृतीचे तीन गुण आहेत. पुढे सांख्यांचा प्रभाव तांत्रिकांवरही पडला आणि त्यांनी आपल्या विविध देवतांना हे गुण दिले. पैकी विष्णुमूर्तींशी सात्त्विक गुणाचा संबंध आहे. योगारूढ स्थितीत अथवा ध्यानमग्न स्थितीत अशा मूर्ती असतात. श्रीव्यंकटेश आणि विठ्ठल तसेंच श्रीरंगम् येथील अनंतशयन विष्णू या प्रकारात मोडतात असे महादेवशास्त्री म्हणतात (१९८०.९७)

## हस्तमुद्रा :

पाषाणातील मूक मूर्तींना बोलके करण्याचे तंत्र कलाकारांना अवगत होते. हातांच्या व बोटांच्या विशिष्ट ठेवणीला मुद्रा म्हणतात. त्यावरून देवदेवतांच्या वेगळाल्या कृतींचा, ईप्सितांचा व भावांचा बोध व्हायचा असतो. काही महत्त्वाच्या मुद्रांचा विचार खाली केला आहे.



**अभय आणि वरद** या दोन वारंवार आढळणाऱ्या, देवत्व सिद्ध करणाऱ्या अशा हस्त मुद्रा आहेत. पैकी भक्तांना अभयाचे, संरक्षणाचे, पाठिंब्याचे आश्वासन देणाऱ्या अभयमुद्रेत कोपरापासून सामान्यत: उजवा हात खांद्याचे बाजूस उभा धरायचा असतो. बोटे अर्थातच ताठ ठेवायची असतात. तर वरदमुद्रेतील हात, प्राय: डावा हात तळहात उघडा ठेवून त्याची बोटे जमिनीकडे वळलेली अशा पद्धतीने धरलेला असतो.दान करण्याची, देण्याची कृती यातून प्रकटलेली असते.

**कट्यवलंबित मुद्रेत** हात कमरेवर ठेवलेला/ले असतात. पंढरीचा विठोबा असा उभा असतो किंवा श्रीबालाजीचा डावा हात कटीवर असतो.

**नमस्कारमुद्रा वा अंजलिमुद्रा** या दोन्हीही सर्वपरिचित आहेत. तर ध्यानमुद्रेत पद्मासनात ताठ बसून दोन्ही तळहात मांडीवर मध्यात एकावर एक उताणे धरायचे असतात.

**ज्ञानमुद्रा :** अंगठा आणि तर्जनी यांची टोके जूळवून आणि बाकीची बोटे मोकळी सोडून तळहात हृदयाशी धरायचा असतो.

**मौनमुद्रा :** उजव्या हाताची तर्जनी ओंठावर ठेवायची असते. विष्णूच्या मूर्ती अशाही असतात.

**व्याख्यानमुद्रा :** यात हाताचा अंगठा व तर्जनी यांचे कडे करून (बाकीची बोटे अर्थातच सुटी ) तळहात पहाणाऱ्याकडे करायचा असतो.

**चपेटदानमुद्रा :** उजवा हात डोक्याच्यावर, समोरील व्यक्तीवर चापट मारण्याच्या आवेशात उगारायचा असतो. सामान्यत: मारुती अशा अवस्थेत दाखविलेला असतो. अवतार मूर्तीत स्थौण नरसिंह असा दाखविला जातो. वेरूळ येथील १५ व १६ लेणीत असे शिल्पांकन आढळते.

**सूचीमुद्रा :** तर्जनीने एखाद्या वस्तुकडे किंवा व्यक्तीकडे अंगुलीनिर्देश करणे.

**सिंहकर्णमुद्रा वा कटकमुद्रा :** अंगठ्याच्या टोकास चारी बोटांची टोकें लावून तळहाताचे एक कडें तयार करणे.

## मूर्तीमापन :

बृहत्संहिता, वैखानसागम, प्रतिमालक्षणम् इत्यादी ग्रंथातून मूर्तींची उंची, रूंदी इत्यादीबद्दलचे विवेचन आलेले आहे. त्यात तालमान किती असावे वा उंची, रूंदी किती अंगुले असावी, मग अंगुल म्हणजे काय इत्यादींची चर्चा आलेली आहे. (बॅनर्जी, १९८५.३२५ व पुढे) मुखाची उंची हे परिमाण धरून मूर्तीची उंची ठरविणे

असे मूर्ती मापन  सर्वात सोपे ठरते. वेगळाल्या देवतांच्या मूर्तींचे तालमान खालील कोष्टकात दिले आहे.

| | | |
|---|---|---|
| दशताल | : | ब्रह्मा, विष्णू, शिव |
| नवताल | : | देवी, दैत्य, कुबेर व यक्ष |
| अष्टताल | : | मानव |
| चतुस्ताल | : | वामन आणि मुले इत्यादी |

****



# परिशिष्ट १

## पुरुषसूक्त

**सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात् ।**
**स भूमिं विश्वतो' वृत्वा ऽत्यतिष्ठद्दशाङ्गुलम्   ॥१॥**

१. अनंत मस्तके, नेत्र आणि पादयुक्त जगद्व्यापक परमेश्वर जगाच्या पलीकडे पसरला आहे.

**पुरुष एवेदं सर्वं यद्भूतं यच्च भव्यम् ।**
**उतामृतत्वस्येशानो यदन्नेनातिरोहति   ॥२॥**

२. भूत, वर्तमान आणि भविष्यकालीन जगत् परमेश्वरस्वरूप असून, प्राणिमात्रांच्या सुखदुःखाप्रीत्यर्थ परमेश्वर आपले मूळ स्वरूप सोडून जगामध्ये येतो. वस्तुतः ते त्याचे खरे रूप नव्हे.

**एतावानस्य महिमा ऽतो ज्यायाँश्च पुरुषः ।**
**पादे'ऽस्य विश्वा भूतानि त्रिपादस्यामृतं' दिवि   ॥३॥**

३. सृष्टिव्यापक आणि सृष्टीपेक्षाहि महान अशा परमेश्वरी माहात्म्याचा दृश्य जग हा केवळ एक अंशभाग असून, त्या माहात्म्याचे उर्वरित तीन भाग मानवी दृष्टीच्या अतीत असतात.

**त्रिपादूर्ध्व उदैत् पुरुषः पादो'ऽस्येहाभवत् पुनः ।**
**ततो विष्वङ् व्यक्रामत् साशनानशने अभि॥४॥**

४. अज्ञानमय संसारातील त्रिकालात्मक परमेश्वराचा चराचर सृष्टिव्यापी असा एक अंशभाग उत्पत्ति-लयाच्या चक्रामध्ये भ्रमण करीत राहतो.

**तस्माद्विराळजायत विराजो अधि पूरुषः ।**
**स जातो अत्यरिच्यत पश्चाद्भूमिमथो' पुरः   ॥५॥**

५. परमेश्वराने निर्मिलेल्या जगातील नवजात जीवांच्या नानाविध रूपांमधून पृथ्वीतील नानाविध प्राणी उत्पन्न झाले.

**यत् पुरुषेण हविषा देवा यज्ञमतन्वत ।**
**वसन्तो अस्यासीदाज्यं' ग्रीष्म इध्मः शरद्धविः   ॥६॥**

६. जीवरूपी हविर्द्रव्यांच्या साह्याने देवांनी केलेल्या यज्ञात वसंत, ग्रीष्म

आणि शरद ऋतू हे अनुक्रमे 'घृत', 'समिधा' आणि 'हविर्द्रव्ये' बनले.

**तं यज्ञं बर्हिषि प्रौक्षन् पुरुषं जातमग्रतः ।**
**तेन देवा अयजन्त साध्या ऋषयश्च ये ॥७॥**

७. या आद्य जीवनिष्पादित यज्ञामुळे सृष्ट्युत्पादक देव आणि सृष्टिसंरक्षक ऋषी उत्पन्न झाले.

**तस्माद्यज्ञात् सर्वहुत संभृतं पृषदाज्यम् ।**
**पशून् ताँश्चक्रे वायव्यां नारण्यान् ग्राम्याश्च ये ॥८॥**

८. देव आणि ऋषिनिष्पादित यज्ञामुळे दधि-दुग्धादि पोषणद्रव्ये आणि वायूपजीवी वन्य आणि गृह्य पशू जन्मले.

**तस्माद्यज्ञात् सर्वहुत ऋचः सामानि जज्ञिरे ।**
**छन्दांसि जज्ञिरे तस्मा यजुस्तस्मादजायत ॥९॥**

९. यज्ञामुळे ऋग्वेद, सामवेद, युजुर्वेद हे वेदत्रय आणि छंद उत्पन्न झाले.

**तस्मादश्वा अजायन्त ये के चोभयादतः ।**
**गावो ह जज्ञिरे तस्मात् तस्माज्जाता अजावयः ॥१०॥**

१०. यज्ञामुळे अश्व, धेनू, अज आदि दंष्ट्र पशू उत्पन्न झाले.

**यत् पुरुषं व्यदधुः कतिधा व्यकल्पयन् ।**
**मुखं किमस्य कौ बाहू का ऊरू पादा उच्येते ॥११॥**

११. परमेश्वरनिर्मित विराट पुरुष कसा जन्मला ? त्याचे मुख, हस्त, जंघा आणि पाय कोणते होते ?

**ब्राह्मणोऽस्य मुखमासी द्बाहू राजन्यः कृतः ।**
**ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत ॥१२॥**

१२. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य हे लोक विराट पुरुषाचे मुख, बाहू आणि जंघा आहेत आणि शूद्र लोक त्याच्या पायापासून उत्पन्न झाले.

**चन्द्रमा मनसो जात श्चक्षोः सूर्यो अजायत ।**
**मुखादिन्द्रश्चाग्निश्च प्राणाद्वायुरजायत ॥१३॥**

१३. विराट पुरुषाचे मन, नेत्र, मुख आणि प्राणापासून चंद्र, सूर्य, इंद्र आणि वायु उत्पन्न झाले.

**नाभ्या आसीदन्तरिक्षं शीर्ष्णो द्यौः समवर्तत ।**



**पदभ्यां भूमिर्दिशः श्रोत्रात् तथा लोकाँ अकल्पयन् ॥१४॥**

१४. विराट पुरुषाच्या नाभी, मस्तक, पाय आणि कर्णापासून अंतरिक्ष, स्वर्ग, भूमी आणि दिशा उत्पन्न झाल्या.

**सप्तास्यासन् परिधय स्त्रिः सप्त समिधः कृताः ।**
**देवा यद्यज्ञं तन्वाना अबध्नन् पुरुषं पशुम् ॥१५॥**

१५. देवांच्या यज्ञामध्ये विराट पुरुषरूपी जीवसृष्टी ही यज्ञीय पशू आणि सप्तछंद 'परिधी' बसले. बारा मास, पाच ऋतू, त्रैलोक्य आणि सूर्य हे एकवीस समिधा झाले.

**यज्ञेन यज्ञमयजन्त देवा स्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।**
**ते ह नाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः ॥१६॥**

१६. देवांनी सर्वस्वाचा यज्ञ करून केलेल्या यज्ञश्रेष्ठ जीवाच्या सत्कारामुळेच जगाची वृद्धी झाली. स्वर्गरूपी देवनिवासस्थान थोर लोकांना प्राप्त झाले.

(ऋ.१०.९०.१-१६)

****

# पुरुषसूक्त परिशिष्ट

पुरुषसूक्तानंतर पठण करावयाच्या प्रस्तुत सूक्तात विष्णुमाहात्म्य आणि वैष्णव तत्त्वज्ञान सूत्रमय भाषेत वर्णिले आहे.

**अतो' देवा अवन्तु नो यतो विष्णुर्विचक्रमे । पृथिव्याः सप्त धार्मभिः ॥१॥**

१. सात छंदांच्या साह्याने पृथ्वी व्यापून टाकणाऱ्या विष्णूच्या स्थानापासून अवतीर्ण होऊन देव आमचे रक्षण करोत.

**इदं विष्णुर्वि चक्रमे त्रेधा नि दधे पदम् । समूळ्हमस्य पांसुरे ॥२॥**

२. विष्णूने जगताचे आक्रमण करून तीन ठिकाणी आपले पद रोवले. त्याच्या धूसर तेजाने समस्त विश्व व्याप्त झाले.

**त्रीणि पदा वि चक्रमे विष्णुर्गोपा अदाभ्यः । अतो धर्माणि धारयं ॥३॥**

३. अविनाशी आणि रक्षणकर्त्या विष्णूने आपल्या तीन पदक्षेपांनी जग आक्रमिले. तेव्हापासून तो जगातील धर्माचा धारणकर्ता बनला.

**विष्णोः कर्माणि पश्यत यतो' व्रतानि पस्पशे । इन्द्रस्य युज्यः सखा ॥४॥**

४. हे स्तोत्यांनो, तुमची सारी कृत्ये बारकाईने निरीक्षण करणाऱ्या आणि इंद्राचा जिवलग सखा असणाऱ्या विष्णूचे पराक्रम तुम्ही अवलोकन करा.

**तद् विष्णोः परमं पदं सदा पश्यन्ति सूरयः । दिवीव चक्षुराततम् ॥५॥**

५. आकाशात उघडलेल्या दिव्य नेत्रांप्रमाणे तेजस्वी विष्णूच्या पदक्षेपाचा पराक्रम विद्वान भक्त कौतुकाने पाहातात.

**तद् विप्रासो विपन्यवो' जागृवांसः समिन्धते । विष्णोर्यत् परमं पदम् ॥६॥**

६. विष्णूच्या श्रेष्ठ स्थानास उद्देशून विद्वान, बुद्धिमान, जागरूक भक्त हविरन्न अर्पण करतात.

(ऋ.१.२२.१६-२१)

****



# परिशिष्ट २

## श्रीसूक्त

ॐ हिरण्यवर्णां हरिणीं सुवर्णरजतस्रजाम् ।
चंद्रां हिरण्मयीं लक्ष्मीं जातवेदो म आवह ॥१॥
तां म आवह जातवेदो लक्ष्मीमनपगामिनीम् ।
यस्यां हिरण्यं विंदेयं गामश्वं पुरुषानहम् ॥२॥
अश्वपूर्वां रथमध्यां हस्तिनादप्रबोधिनीम् ।
श्रियं देवीमुपव्हये श्रीर्मादेवी जुषताम् ॥३॥
कां सोस्मितां हिरण्यप्राकारामार्द्राज्वलंती तृप्तां तर्पयंतीम् ।
पद्मे स्थितां पद्मवर्णां तामिहोपव्हये श्रियम् ॥४॥
चंद्रां प्रभासां यशसा ज्वलंती श्रियं लोके देवजुष्टामुदाराम् ।
तां पद्मिनीमीं शरणमहंप्रपद्ये अलक्ष्मीर्मे नश्यतां त्वां वृणे ॥५॥
आदित्यवर्णे तपसोधिजातो वनस्पतिस्तव वृक्षोथ बिल्वः ।
तस्य फलानि तपासानुदंतु मायांतरायश्च बाह्या अलक्ष्मीः ॥६॥
उपैतु मां देवसखः कीर्तिश्च मणिना सह ।
प्रादुर्भूतोस्मि राष्ट्रेस्मिन् कीर्तिमृद्धिं ददातु मे ॥७॥
क्षुत्पिपासामलां ज्येष्ठामलक्ष्मी नाशयाम्यहम् ।
अभूतिमसमृद्धिंच सर्वा निर्णुद मे गृहात् ॥८॥
गंधद्वारां दुराधर्षां नित्यपुष्टां करीषिणीम् ।
ईश्वरीं सर्वभूतानां तामिहोमव्हये श्रियम् ॥९॥
मनसः काममाकूतिं वाचः सत्यमशीमहि ।
पशूनां रूपमन्नस्य मयि श्रीःश्रयतां यशः ॥१०॥
कर्दमेन प्रजाभूता मयि संभव कर्दम ।
श्रियं वासय मे कुले मातरं पद्ममालिनीम् ॥११॥
आपः स्रजंतु स्निग्धानि चिक्लीत वस मे गृहे ।
निच देवीं मातरं श्रियं वासय मे कुले ॥१२॥
आर्दां यः करिणी यष्टिं सुवर्णां हेममालिनीं ।

सूर्या हिरण्मयीं लक्ष्मीं जातवेदो म आवह ।।१३।।
आर्द्रां पुष्करिणीं पुष्टिं पिंगलां पद्ममालिनीम् ।
चंद्रां हिरण्मयीं लक्ष्मीं जातवेदो म आवह ।।१४।।
तां म आवह जातवेदो लक्ष्मीमनपगामिनीम् ।
यस्यां हिरण्यं प्रभूतं गावो दास्योश्वान् विंदेयं पुरुषानहम् ।।१५।।
य: शुचि: प्रयतो भूत्वा जुहुयादाज्यमन्वहम् ।
सूक्तं पंचदशर्चं च श्रीकाम: सततं जपेत् ।।
(पुढील सूक्त लक्ष्मीसूक्त या नावाने प्रसिद्ध आहे. ते श्रीसूक्ताला जोडूनच म्हणतात.)
पद्मानने पद्म ऊरू पद्माक्षि पद्मसंभवे ।
तन्मे भजसि पद्माक्षि येन सौख्यं लभाम्यहम् ।।
अश्वदायै गोदायै धनदायै महाधने ।
धनं मे लभतां देवि सर्वकामांश्च देहि मे ।।
पद्मानने पद्मिनि पद्मपत्रे पद्मप्रिये पद्मदलायनाक्षि ।
विश्वप्रिये विश्वमनोनुकूले त्वत्पादपद्मं मयि संनिधत्स्व ।।
पुत्रपौत्रं धनं धान्यं हस्त्यश्वा दिगवेरथम् ।
प्रजानां भवसी माता आयुष्मंतं करोतु मे ।।
धनमग्निर्धनं वायुर्धनं सूर्यो धनं वसु: ।
धनमिंद्रो बृहस्पतिर्वरुणो धनमश्विना ।।
वैनतेय सोमं पिब सोमं पिबतु वृत्रहा ।
सोमं धनस्य सोमिनो मह्यं ददातु सोमिन: ।
न क्राधो न च मात्सर्यं न लोभो नाशुभा मति: ।
भवंति कृतपुण्यानां भक्तानां श्रीसूक्तंजपेत् ।।
सरसिजनिलये सरोजहस्ते धवलतरांशुकगंधमाल्यशोभे ।
भगवति हरिवल्लभे मनोज्ञे त्रिभुवनभूतिकरि प्रसीद मह्यम् ।।
विष्णुपत्नीं क्षमां देवीं माधवीं माधव प्रियाम् ।
लक्ष्मीं प्रियसखीं देवींनमाम्यच्युतवल्लभाम् ।।
महालक्ष्मी च विद्महे विष्णुपत्नीच धीमहि ।
तन्नो लक्ष्मी: प्रचोदयात् ।।



श्रीर्वचस्वमायुष्यमारोग्यमाविधाच्छोभमानं महीयते ।
धान्यं धनं पशुं बहुपुत्रलाभं शतसंवत्सरं दीर्घमायु: ।।
प्रार्थना :
रूपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।
पुत्रान् देहि धनं देहि सर्वान् कामांश्च देहि मे ।।

****

# परिशिष्ट ३

## विष्णूचे एकोणचाळीस अवतार

सात्वत संहितेत विष्णूच्या एकोणचाळीस अवतारांची नोंद आहे. ती जशीच्या तशी अहिर्बुध्न्य संहितेत आली आहे, ती अशी:
१) पद्मनाभ, २) ध्रुव, ३) अनंत, ४) शक्त्यात्मन, ५) मधुसूदन , ६) विद्याधिदेव, ७) कपिल, ८) विश्वरूप, ९) विहंगम, १०) क्रोदात्मन, ११) बडवावक्त्र, १२) धर्म, १३) वागीश्वर, १४)एकार्णवशायीन, १५) कमठेश्वर, १६) वराह, १७) नरसिंह, १८) पीयूषहरण, १९) श्रीपती, २०) कांतात्मन, २१) राहुजित, २२) कालनेमिघ्न, २३) पारिजातहर, २४) लोकनाथ, २५)शांतात्मन्, २६) दत्तात्रेय, २७) न्यग्रोधशायिन, २८) एकश्रृंगतनु, २९) वामनदेह, ३०)त्रिविक्रम, ३१) नर, ३२) नारायण, ३३) हरि, ३४) कृष्ण, ३५) परशुराम, ३६) रामधनुर्धर, ३७) वेदविद्, ३८) कल्किन्, ३९) पातालशयन.

विशेष म्हणजे या यादीतील वागीश्वर (१३), लोकनाथ (२४) आणि शांतात्मन् (२५) ही नावे बुद्धाची असल्याचे महायानांच्या यादीवरून कळू शकते.

****

## वेंचक संदर्भ ग्रंथसूची


बॅनर्जी जितेन्द्रनाथ : १९८५ डेव्हलप्मेंट ऑफ हिंदू आयकानोग्राफी, दिल्ली

चित्राव सिद्धेश्वर : २००१ वैदिक सूक्तपाठ, पुणे ४

कुमारस्वामी,अे.के. : १९९४ दि ट्रान्सफॉर्मेशन ऑफ नेचर इन आर्ट, नवी दिल्ली

देगलूरकर गो.बं. : १९९७ बिंबब्रह्म आणि वास्तुब्रह्म,नागपूर

देगलूरकर धुंडामहाराज: १९८७ हरिपाठविवरण, पंढरपूर

गोपीनाथ राव टी.अे. : १९१६ इलेमेंटस् ऑफ हिंदू आयकानोग्राफी, मद्रास

जोशी नी.पु. : १९७९ भारतीय मूर्तिशास्त्र, नागपूर

जोशी नी.पु. : २००१ उपदेवता-एक स्वतंत्र अध्ययन, लखनौ

जोशी महादेवशास्त्री : १९८० भारताची मूर्तिकला, पुणे


जोशी महादेवशास्त्री : १९८९ पंचदेव उपासना, पुणे

खरे गणेश हरि : १९३९ भारतीय मूर्तिविज्ञान, पुणे

वैशाली वेलणकर : २००३ आयकानोग्राफी ऑफ विष्णू इन महाराष्ट्र (अप्रकाशित प्रबंध, मुंबई)




## हस्तमुद्रा




१. अभयमुद्रा २. वरदमुद्रा ३. कटकहस्त ४. लोलहस्त ५. सिंहकर्णमुद्रा
६. लोलहस्त ७. सिंहकर्ण ८. अर्धचंद्र ९. त्रिपताक १०. नमस्कारमुद्रा ११. कर्तरिमुख


## आयुधे



१. कुषाणकालीन गदा २. मध्यकालीन गदा ३. बंगालची गदा ४. गुप्तकालीन गदादेवी
५. मध्यकालीन शंख व कमळ ६. चक्रपुरुष ७-८. मध्यकालीन चक्र




## शंखाची ठेवण



१. नांगर २-८. कुषाणकालीन शंख धरण्याचे प्रकार
९. चक्र १०. विष्णूच्या हातातील फळ

## आसने




१. पद्मासन / वज्रपर्यंकासन २. सव्यललितासन ३. अर्धपर्यंकासन
४. प्रलंबपादासन ५. अर्धपर्यंकासन ६. उत्कुटिकासन ७. महाराजलीलासन





**गो. बं. देगलूरकर**
पीएच्. डी., डी. लिट्

नागपूर विद्यापीठ व पुणे येथील डेक्कन कॉलेज रिसर्च इन्स्टिट्यूट अभिमत विद्यापीठ येथे १९९३ पर्यंत अध्यापन. सांप्रत डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठाचे अध्यक्ष. महाराष्ट्रात विशेषत: विदर्भात अनेक ठिकाणी पुरातत्त्वीय उत्खनने. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदातून शोधनिबंधांचे वाचन, आमंत्रणावरुन लंडन, लॉस एंजेलीस, शिकागो इत्यादी ठिकाणी संशोधनानुषंगिक कार्य. इटली, इंडोनेशिया येथे अभ्यास दौरा. महाराष्ट्रातील बहुधा सर्व विद्यापीठ इतिहास प्राध्यापकांच्या इतिहास अधिवेशनांचे अध्यक्षपद. यादी व्याख्यानमाला, मुंबई विद्यापीठ; कुरूंदकर व्याख्यानमाला, नांदेड तसेच हैद्राबाद, अमळनेर, पुणे येथे व्याख्यानमाला गुंफिल्या.

कल्चरल हिस्ट्री ऑफ मराठवाडा, टेंपल आर्किटेक्चर ॲण्ड स्कल्प्चर ऑफ महाराष्ट्र, पोर्टेयल ऑफ दि वूमन इन दि आर्ट ऑफ दि डेक्कन, मेगॅलिथिक रायपूर, बिंबब्रह्म आणि वास्तुब्रह्म, सुरसुंदरी, देवगिरी, वेरुळदर्शन, मार्कंडी मंदिरे इत्यादी ग्रंथांचे लेखन.

मंदिर स्थापत्य, प्राचीनकला आणि मूर्तिशास्त्र हे अभ्यासाचे विशेष विषय. राजा केळकर संग्रहालय, पुणे; महाराष्ट्र, ग्रंथोत्तेजक मंडळ, पुणे: शारदानगर, सगरोळी या संस्थांच्या कार्यकारी मंडळाचे सभासद.

उपास्य देवताची प्रतिमा म्हणजे त्या देवतेविषयीच्या अपेक्षेचे प्रतीक! ऐश्वर्य, समृद्धी, शांती यांचे प्रतीक म्हणजे श्रीविष्णूची मूर्ती. साक्षात लक्ष्मी ज्याचे पाय चेपीत आहे, जो शांतपणे शेषनागावर पहुडला आहे अशा विष्णूच्या विविध प्रकारच्या, विविध रुपाच्या मूर्तींचा या ग्रंथात विचार केला आहे. आपल्या उपासनेत अशी मूर्ती असेल तर आपणासही शांती व समाधान लाभेल अशी भक्तांची कामना असते. म्हणून म्हणायचे 'ऐका हो तुम्ही भक्त भागवत! आपुलाले हित साध्य करा।'

येथे विष्णूच्या निर्गुण आणि सगुण रूपांचे वर्णन केले आहे. लेखकाची या संबंधातली भूमिका 'किंबहुना तुमचे केले। धर्मकीर्तन सिद्धी गेले। तेथे माझे जे उरले। पाईकपण' एवढीच आहे.

हरये नमः। हरये नमः। हरये नमः

